


म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.
REFBK-0028374

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
भू-प्रवास ७९२
दी. क्र. २८३७४
२५।३।९६
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

संदर्भ
भू-प्रवास
७९२
२८३७४
२५।३।९६

## मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

सूचना : खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे. तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (६) नुसार प्रतिदिनी २५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल. (किमान दंड १ रुपया घेतला जाईल.)

12 JUN 1996
13 JUL 1996
27 JUL 1996
17 DEC 1996
28 DEC 1996

(कृ.मा.पहा.)

१६०००/११-९५

आपला भारत महान

# भाताचे कोठार : आंध्र

रमेश मंत्री

REFBK-0028374

समांतर शिक्षण प्रकाशन

आपला भारत महान
पुस्तक क्र. ४

मुल्य :-
४५ रुपये.

अक्षर जुळणी :-
अमेय अक्षर जुळणी,
शुक्रतारा, संत जनाबाई मार्ग,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई ५७.
दूरध्वनी: ६११२४५७.

मुद्रक आणि प्रकाशक :-
राजीव मंत्री
समांतर शिक्षण प्रकाशन
शुक्रतारा, संत जनाबाई मार्ग,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई ५७.
दूरध्वनी: ६११२४५७.

मुखपृष्ठ :-
अनिल दाभाडे

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | आंध्रचा इतिहास | ५ |
| २. | निजामांची राजवट | २० |
| ३. | अखेरचा निजाम | ३० |
| ४. | प्रेक्षणीय हैद्राबाद | ३५ |
| ५. | नागार्जुनसागर आणि वरंगळ | ५५ |
| ६. | वरंगळ ते श्रीशैलम् | ६२ |
| ७. | विजयवाडा आणि तिरुपती | ७२ |
| ८. | राजमहेंद्री आणि विशाखापट्टम् | ८१ |
| ९. | सांस्कृतिक आंध्र | ८७ |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

## भाताचे कोठार : आंध्र

# १. आंध्रचा इतिहास

आंध्र राज्यात प्रचंड प्रमाणावर भात पिकतो म्हणून या प्रदेशाला भाताचे कोठार म्हणतात.

आंध्रच्या इतिहासात बहामनी घराणे महत्त्वाचे आहे. विजयनगर साम्राज्याच्या स्थापनेनंतर नऊ वर्षांनी १३४७ साली अल्लाउद्दीन जाफरखान बहामनी याने हे स्वतंत्र राज्य स्थापन केले. पावणे दोनशे वर्षे ते भरभराटीत होते, पण नंतर त्याचे तुकडे झाले. १५२६ मध्ये 'गोवळकोंडा' हा भाग कुतुबशहाकडे आला. 'अहमदनगर' निझामशहाकडे गेला आणि बिदरवर बरिदशहाचे राज्य आले. दिल्लीवर शहाजहान बादशहाचे साम्राज्य आले, तेव्हा गोवळकोंडाला दिल्लीचे मांडलिकत्व पत्करणे भाग पडले. त्यापूर्वी वर्षभरातच त्याने १६३४ साली आंध्रच्या किनाऱ्यावर ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीस व्यापारी सवलती दिल्या होत्या. औरंगजेब हा दक्षिणेचा सुभेदार होता. तेव्हा अबुलहासन तानाशहा हा गोवळकोंड्याच्या गादीवर होता. त्याला औरंगजेबची नेहमी भीती वाटत असे. औरंगजेबविरुद्ध छत्रपती शिवाजी महाराजच आपल्याला संरक्षण देऊ शकतील अशा विचाराने त्याने त्यांना हैद्राबादला येण्याचे निमंत्रण दिले. त्याप्रमाणे ७ मार्च १६७७ साली छत्रपती शिवाजी महाराज हैद्राबादला आले आणि तानाशहाने त्यांचे बादशाही स्वागत केले. यावेळी मादन्ना हा तानाशहाचा सेनापती होता व तो ब्राह्मण होता. तसेच त्याचा भाऊ अकन्ना हाही वरिष्ठ जागेवर होता. औरंगजेबला छत्रपती शिवाजी महाराजांच्या हैद्राबादभेटीची माहिती समजली तेव्हा त्याचा राग अनावर झाला. त्याने तानाशहाचा राजद्रोही पंतप्रधान मिर जमला याच्याशी संगनमत केले आणि मोठ्या सैन्यानिशी गोवळकोंड्यावर स्वारी करून मादन्ना व अकन्ना यांना ठार केले. त्याने गोवळकोंड्याचे राज्य मोगल साम्राज्याला जोडले. १६८२ साली औरंगजेब बादशहाच्या अधिकारात दक्षिण भाग आला. पंचवीस वर्षे

मुक्काम करूनही तो मराठ्यांना नामोहरम करू शकला नाही. अखेर १७०७ मध्ये अहमदनगरमध्ये त्याचे निराश अवस्थेत निधन झाले.

पोर्तुगीज, डच, फ्रेंच आणि इंग्रज यांनी भारताकडे प्रथम व्यापारासाठी आणि नंतर सत्तेसाठी नजर वळवली. हिचे आंध्रवर दूरगामी परिणाम झाले. १५०३ साली पोर्तुगीजांनी कोचीन येथे आपला व्हॉईसरॉय नेमला. १५१० मध्ये पोर्तुगीजांनी गोवा घेतला आणि १५११ मध्ये मलेशियावर ताबा मिळविला. त्यांना फ्रेंचांनी आव्हान दिले. फ्रेंचांनी पाँडेचरी येथे हातपाय पसरले. ब्रिटिशांनी इ. स. १६०० मध्ये ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना केली. भारताच्या समृद्धतेच्या बातम्या युरोपमध्ये पसरल्यामुळे तेथील देशांच्या महत्त्वाकांक्षा वाढू लागल्या. इंग्लंडमधील अनेक कंपन्यांनी भारताशी व्यापार करण्याची परवानगी मागितली आणि राणी एलिझाबेथने ती तत्परतेने दिली. १६०८ साली इंग्रज प्रथम सुरतमध्ये उतरले. इंग्रजांचे ग्लोब हे व्यापारी जहाज १६११ मध्ये मच्छलीपट्टम येथे आले. मसाले व कापड ही भारतात व्यापाऱ्याची त्यांना मुख्य आकर्षणे होती. इंग्रजांनी गोवळकोंडाच्या सुलतानाकडून व्यापारी सवलती मिळविण्याचे खूप प्रयत्न केले, पण त्याने नकार दिला. तेव्हा इंग्रजांनी नेलोरे जिल्ह्यात असमुगम येथे वखार उघडली. १६४० मध्ये त्यांनी मद्रासमध्येही व्यापारी केंद्र सुरू केले. १६८८ साली इंग्रजांनी पोर्तुगीजांकडून मुंबई बेट घेतले. त्यावेळी सबंध मुंबईचे वार्षिक भाडे फक्त दहा पौंड (दोनशे रुपये) ठरले होते ! १६९० साली औरंगजेबनेसुद्धा ब्रिटिशांना व्यापाराच्या सवलती दिल्या.

इंग्रजांनी दक्षिणेत हळूहळू आपल्या वखारींचे फार मोठे जाळे विणले. मुडियालम्, विशाखापट्टम, मच्छलीपट्टम, काकिनाडा, कोरिंका, गोलापलम् अशा अनेक ठिकाणी त्यांच्या वखारी भराभर वाढू लागल्या. आंध्रमधील वस्त्रोद्योगावर इंग्रजांनी पूर्ण ताबा मिळवून या भागाच्या आर्थिक नाड्या आपल्या हाती ठेवल्या. (इकॉनॉमिक डेव्हलपमेंट ऑफ आंध्र प्रदेश : रामन् राव.) १७०७ साली औरंगजेबचे निधन झाल्यावर दिल्लीची सत्ता कमकुवत झाली आणि नेहमीप्रमाणे अनेक सुभेदार स्वतंत्र होण्याचे मनसुबे रचू लागले. दक्षिणेचा सुभेदार मिर कमरुद्दीन खान ऊर्फ निझाम-उल-मुल्क हा त्यापैकीच एक होता. त्याने काही काळ दिल्लीच्या बादशहाची नोकरी केली, पण संधी साधून त्याने बंड पुकारले. तो सैन्यानिशी दक्षिणेत परत

आला. त्याने त्यावेळचा सुभेदार मुबारिक खान याचा पराभव करून हैद्राबाद घेतले. आपले वर्चस्व दाखविण्यासाठी दिल्लीने त्याला दक्षिणेचा सुभेदार म्हणून मान्यता दिली. पण ऑक्टोबर १७२४ मध्ये निजाम जवळजवळ स्वतंत्रच होऊन त्याने हैद्राबाद राज्य स्थापले, तेच पुढे निजामचे राज्य म्हणून प्रसिद्धीस आले. त्यावेळी निजामाच्या ताब्यात हैद्राबादबरोबरच आजचा आंध्र आणि तामिळनाडू व ओरिसाचेही काही भाग होते. १७३१ साली मराठ्यांनी निजामचा पराभव केला आणि त्यांच्यावर खंडणी बसवली. पहिल्या निजामाने १७२४ ते १७४२ पर्यंत राज्य केले.

निजाम-उल-मुल्कच्या निधनानंतर त्याचा नातू मुझफर जंग आणि मुलगा नसीरजंग यांच्यात वारसाबद्दल वाद झाला. अशा संघर्षाच्या वेळी परकियांना शिरकाव करून घेण्याची संधी मिळते. या वादात फ्रेंचांनी मुझफर जंगची बाजू घेतली आणि इंग्रजांनी नसीर जंगला पाठिंबा दिला. त्यात मुझफर यशस्वी झाला आणि त्याने पाँडेचरीला फ्रेंच गव्हर्नर डुप्ले याला कृष्णा नदीच्या खालील सर्व प्रदेशाचा व्हाईसरॉय म्हणून नेमून आपली कृतज्ञता व्यक्त केली. त्याने मच्छलीपट्टम आणि यनम ही गावेही फ्रेंचाना दिली, पण पाँडेचरीहून मुझफर जंग हैद्राबादकडे येत असतानाच कुडाप्पाच्या नबाबाने त्याचा खून केला. फ्रेंच जनरल बुशी याने ताबडतोब मुझफरचा भाऊ सलाबत जंग हा निजाम झाल्याचे जाहीर केले. नंतर बुशी हैद्राबादलाच ठाण मांडून बसला आणि १७५८ पर्यंत निजामाचे राज्य त्याच्याच तंत्राने चालत होते. त्याने निजामांवर दरमहा दोन लाख रुपये खंडणीही बसवली.

यावेळी लॉर्ड क्लाईव्ह याने बंगालवर ब्रिटिशांचे वर्चस्व प्रस्थापित केले होते. विजयनगरचा राजा आनंद गजपती याने फ्रेंचाच्या विरुद्ध ब्रिटिशांची मदत घेऊन विझगापट्टमला फ्रेंचांचा पराभव करून ते शहर ताब्यात घेतले. मग या संयुक्त सेनेने राजमहेंद्रीवर स्वारी करून तेथेही फ्रेंचांचा पराभव केला. तीच गत मच्छलीपट्टमचीही झाली. निजाम सलाबत जंगने आता ओळखले की फ्रेंच हे अस्तगंत होत आहेत आणि ब्रिटिशांचा सूर्य उगवता आहे, त्याने लगेच फ्रेंचांनी पंधरा दिवसात हैद्राबाद सोडण्याचे फर्मान काढले आणि ब्रिटिशांच्याबरोबर तह करून त्यांना आंध्रचा बराच भाग

तोडून दिला. (१७६२) याच सुमारास सलाबत जंगचा भाऊ निझाम अली याने सलाबत जंगला गादीवरून दूर करून सत्ता बळकावली. त्याने मराठ्यांच्या विरुद्ध ब्रिटिशांची मदत मागितली, पण त्यावेळी ब्रिटिश अनेक आघाड्यांवर लढत असल्याने त्यांनी ही नवी जबाबदारी घेतली नाही. पण ब्रिटिशांनी निजामाबरोबर वाटाघाटी करून १५ लक्ष रुपयांना उत्तरेकडील पागमे घेतले. तेव्हा निजामाच्या सैन्याने आपल्या वेतनाची थकबाकी मिळावी म्हणून बंड केले होते. त्याचा अचूक फायदा ब्रिटिशांनी घेतला. निजाम पैशाच्या अतिशय अडचणीत असल्याने त्याने त्या तहास नाइलाजाने मान्यता दिली. तशी त्याने दिली नसती तर सैन्याच्या बंडामुळे त्यांची सत्ता जाण्याची भीती होती. भारतातील इतर प्रदेशांप्रमाणेच आंध्रच्या इतिहासावरूनही हेच स्पष्ट दिसते की साम, दाम, दंड, भेद अशा सर्व उपायांनी ब्रिटिशांनी भारतातील राजे किंवा नवाब यांच्याकडून हळूहळू सत्तेची सूत्र आपल्या हाती घेतली.

पुढे म्हैसूरचा टिपू सुलतान बलिष्ठ होऊ लागला, तेव्हा ब्रिटिशांनी मराठे व निझाम यांच्याशी तह करून टिपूविरुद्ध फळी उभारली. १७९२ मध्ये या तिघांनी टिपूचा पराभव करून त्याचे अर्धे राज्य घेतले. मराठे आणि निजाम यांनी यावेळी ब्रिटिशांशी संगनमत केले असले तरी या तिघांचेही एकमेकांशी अंतस्थ संबंध चांगले नव्हते. प्रथम मोठा शत्रू नेस्तानाबूत करू आणि मग बाकीच्या दोघांना संपवू असा डाव तिन्ही पक्षांनी एकमेकांवर टाकला होता. खर्ड्याच्या लढाईत १७९५ मध्ये मराठ्यांनी निजामचा पराभव केला. मराठ्यांनी निजामावर युद्धभरपाई म्हणून दोन कोटी रुपये, चौथाई व सरदेशमुखी बसवली.

आता निजामाला पुन्हा ब्रिटिशांचे पाय धरण्यावाचून गत्यंतर नव्हते. त्याने ब्रिटिशांना रायलसीमा भाग देऊन सैन्य ठेवून घेण्याचा करार इ. स. १८०० मध्ये केला. निजाम अलीखान १८०३ साली निधन पावला. त्याच्या ४१ वर्षांच्या प्रदीर्घ कारकीर्दीत ब्रिटिशांनी आंध्रमध्ये आपले पाय पक्के रोवले आणि ब्रिटिशांच्या शिवाय आंध्रमध्ये पान हलू नये अशी बळकटी आपल्या कंपनीला आणली. निजाम अली खाननंतर त्याचा मुलगा शिकंदर हा गादीवर आला. त्याच्या कारकीर्दीत दुसरे मराठा युद्ध झाले. त्यात सिंदिया आणि भोसले यांना निजामाविरुद्ध चढाई केली होती. ब्रिटिशांनी

या युद्धात निजामाच्या वतीने भाग घेतला, पण प्रत्यक्षात ब्रिटिशांनीच ही लढाई लढली व मराठ्यांचा पराभव केला. निजामाचा प्रतिनिधी राजा महिपत राम याने अंगचुकारपणा करून निष्क्रियता दाखवली म्हणून या लढाईनंतर गव्हर्नर जनरल वेलस्ली याने निजामाला पुरवणी करार करायला भाग पाडले. यापुढे प्रत्येक लढाईत निजामाने ब्रिटिशांच्या नेतृत्वाखाली आपले सैन्य द्यावे असे महत्त्वाचे कलम या करारात घालण्यात आले. इतकेच नव्हे तर निजामाच्या दिवाणाची नेमणूक ब्रिटिशांच्या संमतीने होईल अशी तरतूद करून ब्रिटिशधार्जिणा मीर अलम यालाच दिवाण करण्यास ब्रिटिशांनी निजामाला भाग पाडले. म्हणजे प्रत्यक्षात निजाम हे ब्रिटिशांच्या हातातले एक बाहुले बनले. १८११ नंतर ब्रिटिश रेसिडेंट हाच जवळजवळ राज्यप्रमुख बनला.

थोड्याच काळात पामर अँड कंपनी या ब्रिटिश कंपनीकडे हैद्राबादचे सर्व अर्थव्यवहार सोपविण्यात आले. या कंपनीच्या संचालकांत त्यावेळच्या प्रमुख ब्रिटिश अधिकाऱ्यांचे नातेवाईक होते. पामर अँड कंपनीने हैद्राबाद सरकारला भरपूर लुबाडले. ही कंपनी वीस टक्के व्याजाने निजामाला कर्ज देऊन अफाट फायदा मिळवीत असे. निजाम सरकारच्या सर्व नोकरांचे पगारसुद्धा हीच कंपनी देत असे व त्यासाठी निजामावर कर्जाचा बोजा करून ठेवीत असे. पण मेटकाफ हा हैद्राबादचा रेसिडेंट झाल्यावर त्याने या अपप्रकारांना तातडीने पायबंद घातला. १८२९ मध्ये निजाम सिकंदर निधन पावला आणि त्याचा मुलगा नसीर उद्दौला गादीवर आला. निजामावर ब्रिटिशांनी इतके कर्ज करून ठेवले होते की त्याची परतफेड करणे अशक्य झाल्याने निजामाने ब्रिटिशांना वऱ्हाड देण्याच्या करारावर १८५१ साली सह्या झाल्या. १८५७ हे भारताच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचे वर्ष होते. उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, बिहार इत्यादी भागांत सैन्याने स्वातंत्र्यसमर पुकारले. त्यांचे पडसाद उत्तर हिंदुस्थानच्या मानाने दक्षिणेस कमी उमटले, तरी औरंगाबाद, हैद्राबाद, कडाप्पा, मच्छलीपट्टम इत्यादी ठिकाणी त्यांचा प्रभाव उठावदारपणे दिसून आला. हैद्राबादमध्ये या उठावाने विशेष आनंद झाला, कारण बहादूरशहा हा पुन्हा भारताचा बादशहा होण्याची शक्यता या भागातील मुसलमानांना चैतन्यदायी होती. या संघर्षात दुर्बल निजाम ब्रिटिशांशी एकनिष्ठ राहिला. तरी सर्वसामान्य

जनता ब्रिटिशांविरुद्धच होती. १७ जुलै १८५७ रोजी या रोहिल्यांच्या फलटणीच्या प्रमुखाने हैद्राबादच्या ब्रिटिश रेसिडेन्सीवर हल्ला केला, पण ब्रिटिशांनी ही रेसिडेन्सी पूर्णपणे सुसज्ज आणि सशस्त्र ठेवल्याने तराबाजचा पराभव झाला आणि त्याला जन्मठेपेची शिक्षा ब्रिटिशांनी फर्मावली. तो तुरुंगातून पळून गेला, पण त्याच्यावर गोळ्या झाडण्यात आल्या. लोकांना दहशत बसावी म्हणून त्याच्या मृत शरीरास हैद्राबादमध्ये जाहीरपणे फाशी देण्यात आली. (फ्रीडम स्ट्रगल इन आंध्रप्रदेश : एम. व्यंकटरंगय्या पृष्ठ १६१).

१८५७ च्या उठावानंतर ईस्ट इंडिया कंपनीकडून भारताचा कारभार काढून घेतला गेला आणि तो थेट राणी व्हिक्टोरियाच्या हाती देण्यात आला. राणीने जाहीरनामा काढून भारतीयांना अनेक आश्वासने दिली. त्यात भारतीय व युरोपियन नागरिक यांना समान वागणूक देणारे एक महत्त्वाचे कलम होते. आंध्रमध्ये पूर्वीच्या अनागोंदी व जुलमी मुस्लिम राजवटीपेक्षा ब्रिटिशांची राजवट बरी अशी सर्वसाधारण लोकांची भावना होती. कारण या भागात बहुसंख्य हिंदू होते. ब्रिटिशांचे अनेक दोष असले तरी त्यांनी हिंदूंच्या धर्मात ढवळाढवळ केली नाही. या त्यांच्या गुणाने आंध्रमधील लोक ब्रिटिशांना मानीत असत. कारण याबाबतीत त्यांना मुसलमानी राजवटीचे आलेले अनुभव अत्यंत कटू होते. राणीच्या जाहीरनाम्यात तर धार्मिक बाबतीत सरकार निपक्षपाती राहील असे आश्वासनच दिले होते. यावेळी आंध्रमध्ये गंजम, विशाखापट्टम, गोदावरी, कृष्णा, नेल्लोर, बेल्लारी, कुडाप्पा व कर्नूल हे आठ जिल्हे होते. शेती हा मुख्य व्यवसाय आणि भात हे मुख्य अन्न होते.

एकोणिसाव्या शतकात आंध्रमध्ये तीन मोठे दुष्काळ पडले. मात्र १८६५ चा दुष्काळ अवर्षणाने न पडता अमेरिकेतील यादवी युद्धामुळे पडला. हे विधान सकृद्दर्शनी विचित्र वाटते, पण वस्तुस्थिती अशी होती की अमेरिकेत यादवी युद्ध सुरू झाल्यावर तेथून इंग्लंडमध्ये येणारा कापूस थांबला, गिरण्या थंडावल्या. तेव्हा ब्रिटिशांनी भारतात वाटेल तो चढा दर देऊन कापूस खरेदी करायला सुरुवात केली. पैशाच्या हव्यासाने आंध्रमधील शेतकऱ्यांनी आपल्या शेतात भाताऐवजी कापूस पेरला, पण दरम्यान अमेरिकेतील यादवी युद्ध संपून इंग्लंडमध्ये पुन्हा अमेरिकन कापसाचा ओघ

वाहू लागला. ब्रिटिशांनी भारतीय कापसाकडे पाठ वळवली. त्याचा परिणाम असा झाला की आंध्रमधील कापसाला गिऱ्हाईक मिळेनासे झाले. कापूस मातीमोल झालेला आणि भाताचे पीक नाही अशा दुरावस्थेत आंध्रचा दुष्काळ सुरू झाला. त्यावेळी सालारजंग हे हैद्राबादचे पंतप्रधान होते. त्यांनी द्रुतगतीने शेती सुधारणा आणि महसूल सुधारणा केल्या आणि दुष्काळाला कसेबसे तोंड दिले. न्यायदान, शिक्षण व पोलिसखाते यातही सालारजंग यांनी अनेक सुधारणा केल्या.

१८७९ साली रंपा आणि रेकापल्ली या भागातील शेतकरी व आदिवासी यांनी अनेक नव्या जाचक करांविरुद्ध बंड केले. त्या भागातील मनसबदारही जुलमी होता आणि अधिकृत सरकारी करांशिवाय तो स्वत:चेही कर गावकऱ्यांवर लादीत असे. या सरकारविरोधी उठावाचा प्रभाव त्या भागातील पाच हजार चौरस मैलांवर इतक्या प्रकर्षाने पडला की ब्रिटिश सरकारने मद्रासहून मोठे सैन्य पाठवून हे बंड मोडून काढले. तेथील गावकऱ्यांच्या तक्रारीत तथ्य आढळल्याने त्यांनी जुलमी मनसबदाराला बडतर्फ करून लोकांचे असमाधानही कमी केले. या सुमारास आंध्रवर एका वेगळ्याच क्षेत्राची छाप पडू लागली. हे क्षेत्र म्हणजे पाश्चात्य शिक्षणाचे. १८६४ मध्ये मच्छलीपट्टणम् येथे इंग्रजी शाळा आणि १८७७ मध्ये राजमहेंद्री येथे कॉलेज सुरू झाल्याने लोकांचे लक्ष या नव्या ज्ञानाकडे वळले. आतापर्यंतच्या पारंपरिक शिक्षणापेक्षा इंग्रजीतून मिळणारे पाश्चात्य शिक्षण हे अगदी वेगळे आणि व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे असल्याने त्याची मोहिनी आंध्रच्या जनतेवर पडली. यावेळी श्री. वीरेशलिंगम् हे महान नेते आंध्रला मिळाले. 'भारताचे एक महान द्रष्टे नेते' असा सी. राजगोपालाचारी यांनी त्यांचा गौरव केला आहे.

आधुनिक आंध्रनिर्मितीचे श्रेय कंडुकुरी वीरेशलिंगम् यांच्याकडे जाते. इ. स. १८४८ ते १९१९ हा त्यांचा काळ होता. महाराष्ट्रात म. फुले यांनी जे महान समाजसुधारणेचे कार्य केले, तसेच वीरेशलिंगम् यांनी आंध्रमध्ये केले. राजमहेंद्री हे त्यांचे गाव. व्यवसायाने ते शिक्षक होते, पण त्या काळच्या आंध्रचा सर्वतोपरी उद्धार करण्याची अत्यंत मोठी गरज त्यांच्या लक्षात आल्याने त्यांनी अनेक इतर आघाड्यांवरही चैतन्यशील कार्य केले. महिलांना शिक्षण दिले पाहिजे या तत्त्वाचा त्यांनी केवळ प्रचारच केला

नाही, तर १८७४ साली पहिली मुलींची शाळा सुरू केली. विधवांचे पुनर्विवाह हे खडतर काम मग त्यांनी हाती घेतले. आंध्रमधील सनातन्यांनी त्यांना कडाडून विरोध केला. हा विरोध केवळ शाब्दिकच नव्हता, तर वीरेशलिंगम् यांना सनातन्यांनी मारहाणही केली, पण कोणत्याही विरोधाची पर्वा न करता वीरेशलिंगम् यांनी विधवा पुनर्विवाह संघटना स्थापन केली. त्याकाळी विधवा मुलींचे वडीलही आपल्या मुलीचा पुनर्विवाह करू इच्छित नव्हते. म्हणून या कार्याच्या प्रचारार्थ वीरशलिंगम् यांनी अनेक गावी दौरा काढला. १८८१ साली त्यांनी पहिला विधवा पुनर्विवाह घडवून आणला. त्या विवाहाच्या वेळी दंगली होण्याइतपत तंग वातावरण होते. म्हणून पोलीस बंदोबस्तात हा विवाह झाला. मात्र नंतर स्त्रियांना धैर्य येऊ लागले आणि थोड्याच काळात वीरेशलिंगम् यांनी वीस विधवा विवाह घडवून आणले. त्यांच्या या थोर कार्याला सर्वात अधिक उत्तेजन मिळाले ते महाराष्ट्रातून. महर्षी कर्वे, न्या. महादेव गोविंद रानडे, श्री. चंदावरकर इत्यादींनी त्यांना भक्कम पाठिंबा दिला.

मद्रास येथे १८९८ साली झालेल्या समाजसुधारणा परिषदेचे अध्यक्ष म्हणून वीरेशलिंगम् यांची निवड झाली. या परिषदेस न्या. रानडे हे हजर राहिले आणि त्यांनी वीरेशलिंगम् यांचा 'दक्षिणेचे ईश्वरचंद्र विद्यासागर' असे संबोधून गौरव केला. वीरेशलिंगम् यांनी आपल्या पत्नीस शिक्षण देऊन तिला इतर स्त्रियांना शिकविण्यास उद्युक्त केले. प्रौढ शिक्षणासाठी त्यांनी रात्रीचे वर्ग काढून दिवसभर काम करणाऱ्यांना विद्यादान केले. आपल्या कार्याच्या प्रसारासाठी 'विवेकवर्धिनी' हे वृत्तपत्र त्यांनी सुरू केले. आंध्रच्या साहित्यासही त्यांनी इतके मोठे योगदान केले की वीरशलिंगम् हे आद्य आंध्र साहित्यकार म्हणून मान्यता पावले आहेत. 'राजशेखर चरितम्' ही पहिली तेलगू कादंबरी त्यांनी लिहिली. विज्ञान व इतिहास या विषयातील पहिली तेलगू पुस्तके वीरेशलिंगम् यांची आहेत. महिलांसाठी लिहिणारे ते पहिले तेलगू लेखक आहेत. सर्वार्थाने ते आंध्रमधील सांस्कृतिक पुनरुत्थानाचे उद्गाते आहेत.

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांनी वीरेशलिंगम् यांच्या कार्याचे अचूक शब्दात असे मूल्यमापन केले आहे. 'वीरेशलिंगम् हे आधुनिक आंध्रचे सर्वश्रेष्ठ नेते आहेत. बहुतेकजण आपल्या काळात स्वतः प्रकाश निर्माण

करीत नाहीत किंवा त्या काळाचा प्रकाशही घेत नाहीत. मात्र जे महात्मे असतात ते त्या त्या काळाचा प्रकाश अंगी भिनवून घेतात व अधिक मोठा प्रकाश निर्माण करून समाजाला मार्गदर्शन करतात, समाजाला पुढे नेतात. वीरेशलिंगम् हे अशा महात्म्यांपैकी एक होते. ते काळाचे पाईक होते, तसेच नव्या युगाचे निर्मातेही होते.'

(स्वातंत्र्य : मद्रास. १९४८ पृष्ठ ८१).

महाराष्ट्राच्या व बंगालच्या राजकीय चैतन्याचा आंध्रवर केवढा प्रभाव होता, हे आंध्रच्या इतिहासात प्रा. ए. पी. राव यांनी या शब्दात दिग्दर्शित केले आहे. 'विसाव्या शतकाच्या आरंभी लोकमान्य टिळक मंडालेच्या तुरुंगवासात होते. अरविंद घोष यांनी पाँडेचरी येथे संन्यासाश्रम स्वीकारला होता आणि बिपिनचंद्र पाल हेही तुरुंगात होते. अशा वेळी चैतन्यशील मार्गदर्शन व कर्तृत्व यांच्या अभावामुळे आंध्रमधील राष्ट्रीय चळवळ ही मवाळांच्या हाती गेली.' (हिस्टरी ऑफ मॉडर्न आंध्र. पृष्ठ ८१).

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि विसाव्या शतकाच्या प्रारंभी अनेक तेलगू नियतकालिके सुरू होऊन त्यांनी समाजात एक वेगळेच कुतूहल व चैतन्य निर्माण केले. तेलगूतील पहिले नियतकालिक म्हणजे बेल्लारीहून १८५८ साली सुरू झालेले 'सत्यदूत.' ते ख्रिश्चन असोसिएशनने प्रसिद्ध केले, तरी त्यामुळे अनेक तेलगू नेत्यांनाही वृत्तपत्र काढण्याची स्फूर्ती झाली. १९०५ मध्ये वीस तेलगू नियतकालिके निघत होती. त्यात मुख्यतः साप्ताहिके व मासिके होती. राष्ट्रीय चळवळ पसरण्यास त्यांचा फार मोठा उपयोग झाला. त्या सर्वात मद्रासहून निघणाऱ्या 'हिंदू' या दैनिकाचा विशेष प्रभाव होता. 'कृष्णा पत्रिका, आंध्र प्रकाशिका, शशिलेखा, देशाभिमानी, रसिकोल्हासिनी' इत्यादी ताज्या दमांची वृत्तपत्रे होती. विशेष म्हणजे- 'आंध्र पत्रिका' हे वृत्तपत्र मुंबईहून प्रसिद्ध होऊन आंध्रमध्ये वितरित होत असे. मुंबईला काँग्रेसचे मोठे केन्द्र असल्याने ए. सी. पार्थसारथी यांच्या संपादकत्वाखाली मुंबईहून हे तेलगू वृत्तपत्र प्रसिद्ध होत असे. लोकमान्य टिळक यांनी ब्रिटिशांच्या विरुद्ध जे असंतोषाचे युद्ध पुकारले, त्याचा संदेश या वृत्तपत्राने तात्काळ आंध्रमध्ये पोहोचवून अपूर्व जागृती केली.

बंगालच्या ह्या फाळणीबरोबरच आंध्रमध्ये बंगालची 'वंदे मातरम्' ही चळवळ सुरू झाली. लोकांनी त्या चळवळीत स्वयंस्फूर्तीने प्रचंड भाग घेतला. 'वंदे मातरम्' चे बिल्ले लावल्याबद्दल राजमहेंद्रीच्या कॉलेजमधील एकंदर २२२ विद्यार्थ्यांपैकी १३८ ना प्रिन्सिपॉलने कॉलेजमधून काढून टाकले आणि दोन वर्षे परीक्षेस बसण्यास मनाई केली. यावरून या चळवळीची तीव्रता लक्षात येते. बिपिनचंद्र पाल यांनी आंध्रचा झंझावती दौरा केला आणि 'युवक स्वराज्य समिती' ही युवकांची संघटना स्थापन केली. देशाच्या स्वातंत्र्याबरोबरच तेलगू भाषकांच्या हिताविषयीही जागृती होत होती. त्यावेळी आंध्र हा मद्रास प्रांताचा भाग होता. सरकारी नोकऱ्या व इतर क्षेत्रांतही तेलगू भाषकांना न्याय मिळत नसल्याने आपला स्वतंत्र प्रांत असावा ही मागणी १९१२ पासून पुढे येऊ लागली. त्यासाठी स्वतंत्र आंध्र परिषद मे १९१३ मध्ये भरली. या परिषदेत असा निर्णय घेण्यात आला की स्वतंत्र आंध्रची मागणी योग्य असली तरी तिचा पाठपुरावा आताच न करता पुढील परिषदेने तिचा विचार करावा. १९१४ साली विजयवाडा येथे भरलेल्या दुसऱ्या आंध्र परिषदेत या मागणीला ठरावाच्या रूपाने मूर्त स्वरूप देण्यात आले. त्यापुढील वर्षी विशाखापट्टण येथे भरलेल्या तिसऱ्या परिषदेनेही या ठरावाचा जोरदार पुनरुच्चार केला. अ. भा. काँग्रेसमध्येही आंध्रचे प्रतिनिधी पुढे येत होते. श्री. पी. आनंदाचारूलु हे आंध्रमधील नेते १८९१ साली काँग्रेसचे अध्यक्ष झाले होते. १९१६ नंतर मद्रासहून ॲनी बेझंट यांचा प्रभाव काँग्रेसवर पडू लागला. १९१८ साली माँटेग्यु-चेम्सफर्ड सुधारणा जाहीर झाल्या. त्यांना आंध्रमध्ये तीव्र विरोध झाला. विजयवाडा हे पूर्वीपासूनच राजकीयदृष्ट्या जागृत शहर होते. विजयवाडा व कुडाप्पा येथे जाहीर सभा भरून या तथाकथित सुधारणांचा तीव्र निषेध करण्यात आला. पहिले महायुद्ध संपल्यावर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष विल्सन यांनी जगातील सर्व राष्ट्रांना स्वयंशासन मिळावे अशी घोषणा केल्याने भारतीय नेत्यांच्या आकांक्षा उंचावल्या. विजयवाडा काँग्रेस समितीने जाहीर सभेत अशी मागणी केली की काँग्रेसचे पुढील अधिवेशन लंडन येथे भरावे आणि लोकमान्य टिळक यांना त्या अधिवेशनाचे अध्यक्ष करावे.

१९१० साली म. गांधींनी काँग्रेसचे नेतृत्व करावयास सुरुवात केली.

१९४७ पर्यंत त्यांच्याच हाती काँग्रेसची सूत्रे राहिली. त्यांनी देशात अपूर्व एकी घडवून आणली. त्याच्या आदेशाप्रमाणे १९२१ साली आंध्रमध्येही असहकाराची चळवळ सुरू झाली. त्याच वर्षी विजयवाडा येथे अ. भा. काँग्रेस समितीची बैठक झाली. याच बैठकीत काँग्रेसचे तिरंगी निशाण मान्य झाले. या बैठकीनंतर म. गांधींनी आंध्रच्या किनारी भागात काकिनाडा, राजमहेंद्री, तलुल, मच्छलीपट्टण, नेलोर व इतर ठिकाणी भाषणे देऊन प्रचंड जागृती घडवून आणली. चिराला-पराला गावचा सत्याग्रह हा या देशातील अनेक दृष्टींनी अभूतपूर्व असा आहे. या दोन गावांचे एकीकरण करून तेथे नगरपालिका स्थापन करण्याचे ब्रिटिश सरकारने ठरवले. त्यामुळे त्या दोन गावाच्या पंधरा हजार नागरिकांवर जबर कर आले व नगरपालिकेचा कोणताही फायदा त्यांना मिळाला नाही. म्हणून त्यांनी करबंदी पुकारली. त्याबद्दल बारा लोकांना अटक झाली. त्यात एक स्त्री होती. ती भारतातील पहिली अटक झालेली महिला होती. म. गांधींनी या गावाला भेट दिली आणि अहिंसक करबंदीस पाठिंबा दिला. नगरपालिका होणे अशक्य व्हावे म्हणून गाववाल्यांनी घरे सोडावीत असा आदेश महात्माजींनी दिला, तेव्हा पंधरा हजारपैकी तेरा हजार पाचशे लोकांनी घरे खाली केली आणि अनेक हालअपेष्टा सोसूनही ते नदीकाठी राहू लागले. त्यांचे नेतृत्व गोपाळकृष्णय्या यांनी केले. ते इंग्लंडमध्ये शिकत असतानाही त्यांनी तेथील भारतीयांच्या चळवळीत महत्त्वाचा भाग घेतला होता व गांधीजींना भेटून त्यांचे शिष्यत्व पत्करले होते.

गुंतूर जिल्ह्यातील पलनाडू येथील जंगल सत्याग्रह हाही आंध्रच्या प्रगत इतिहासातील महत्त्वाचा टप्पा आहे. १९२१ साली त्या भागात अवर्षणामुळे गुरांना चारा मिळेनासा झाला. म्हणून आपली गुरे जंगलात चरण्यासाठी परवानगी मिळावी अशी लोकांनी सरकारला विनंती केली, पण सरकारने ती मान्य केली नाही. म्हणून जनतेने सरकारविरुद्ध कडक बहिष्कार पुकारला. सरकारी नोकरांना धान्य, तेल, कापड वगैरे विकण्याचे दुकानदारांनी बंद केले. कलेक्टर व डी. एस. पी. चौकशीसाठी आले, तेव्हा त्यांना भेटण्यास कोणीही गेले नाही. त्यांना अत्यावश्यक वस्तूही मिळाल्या नाहीत. सरकारी दवंडी पिटण्याचा कलेक्टरने हुकूम दिला तेव्हा दवंडी पिटण्यासाठी गावात ढोल, ताशा काही नाही असे त्याला सांगण्यात आले.

इतक्यात काँग्रेसचे दोन नेते गावाला भेट देण्यास आले. तेव्हा गावकऱ्यांनी ढोल, ताशे वगैरे वाद्ये वाजवून त्यांची मिरवणूक काढली आणि ती कलेक्टरचा जेथे मुक्काम होता, तेथून नेली. ते पाहून कलेक्टरला एवढा संताप आला की त्याने त्या दोन नेत्यांना अटक करून त्यांना एक वर्षाची शिक्षा फर्मावली. त्यामुळे लोक अधिकच चिडले आणि त्यांनी आपली गुरे चरण्यासाठी जंगलात सोडून दिली. जंगल अधिकाऱ्यांनी गाई-म्हशींना अटक केली. तेव्हा तीनशे लोकांच्या जमावाने अधिकाऱ्यांना घेराव घालून आपली गुरे सोडवून घेतली. पोलिसांनी केलेल्या गोळीबारात तीन गावकरी ठार झाले.

पेदानंदीपड व इतर अनेक ठिकाणीही करबंदीची चळवळ करून जनतेने सरकारला हैराण केले. अशा असंतोषाच्या वातावरणात सायमन कमिशनचा अहवाल जाहीर झाला. तेव्हा आंध्रमध्ये असंतोषाची आणखी एक लाट उठली. तिसपती, विजयवाडा, ललुस इत्यादी अनेक ठिकाणच्या नगरपालिकांनी सायमन कमिशनच्या निषेधाचे ठराव पास केले. सायमन कमिशनने मद्रासला भेट दिली, तेव्हा टी. प्रकाशम् यांच्या नेतृत्वाखाली तेथे कडक हरताळ पाळण्यात आला. पोलिसांनी निरपराध लोकांवर गोळीबार केला. त्यात एक स्वयंसेवक ठार झाला. त्याचे प्रेत पाहण्यास टी. प्रकाशम् त्या जागी गेले, पण पोलिस त्यांना जाऊ देईनात. तेव्हा टी. प्रकाशम् यांनी आपली छाती पुढे करून सांगितले, 'हिंमत असेल तर मला गोळी घाला, पण मी त्याचे प्रेत पाहणारच !' पोलिसांचा नाइलाज झाला. त्यांनी टी. प्रकाशन् यांना पुढे जाऊ दिले. तेव्हापासून टी. प्रकाशम्. हे 'आंध्र केसरी' म्हणून ओळखले जाऊ लागले.

आंध्रला मद्रास प्रांतात सापत्नभावाची वागणूक देण्यात येते म्हणून आंध्रला स्वतंत्र अस्तित्व असावे या मागणीला आंध्र विद्यापीठाच्या स्थापनेने १९२६ साली काहीसे मूर्त स्वरूप आले. विजयवाडा येथे हे विद्यापीठ स्थापन झाले. आंध्रच्या इतिहासात तेलंगमधील जनजागृतीस अनन्यसाधारण महत्त्व आहे. ११ नोव्हेंबर १९०१ रोजी महर्षी कर्वे यांच्या अध्यक्षतेखाली हैद्राबाद येथे सामाजिक परिषद भरली होती. या परिषदेचे कामकाज इंग्रजी, मराठी व उर्दूमधून चालले होते. त्या वेळी हैद्राबादचे एक वकील वेंकट रामाराव हे तेलगूमधून बोलू लागले तेव्हा त्यांना

लोकांनी बोलू दिले नाही. या प्रसंगाचा तेलगुभाषकांवर फार मोठा परिणाम झाला. त्याच रात्री 'तेलगु जन संगम' ही संस्था स्थापन करण्यात आली. तेलगू भाषेच्या राजधानीतच तेलगू भाषेला मज्जाव हा तेलगू भाषकांना मोठाच अपमान वाटला. स्वतंत्र तेलगू भाषक राज्य झाल्याशिवाय या अन्यायाचे परिमार्जन होणार नाही याची त्यांना तीव्र जाणीव झाली. त्या दृष्टीने आंदोलन सुरू झाले. १९३८ मध्ये हैद्राबाद कॉंग्रेसची स्थापना झाली. पण त्या कॉंग्रेसवर सरकारने बंदी घातल्याने सत्याग्रहाचे पर्व सुरू झाले.

१९४१ पासून आंध्रमहासभा ही डाव्या विचारसरणीच्या नेत्यांच्या हाती आली. कम्युनिस्ट पक्षाचे सभासद रवी नारायण रेड्डी यांची अध्यक्षस्थानी निवड झाली. १९४२ साली आंध्रसभेचे अधिवेशन वरंगळ येथे भरले, पण १९४६ साली हैद्राबाद राज्यात कम्युनिस्ट पक्षावर बंदी घालण्यात आल्याने सभेचे काम थंडावले. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. सरदार वल्लभभाई पटेल यांनी बहुतेक संस्थानिकांकडून भारतात सामील होण्याची संमती मिळवली, पण हैद्राबादच्या निजामाने आक्रमक धोरण स्वीकारून नकार दिला. सरदार पटेल यांनी निजामाशी जैसे थे करार केला. (२१ नोव्हेंबर १९४७), पण निजामाने आपण स्वतंत्र राष्ट्र आहोत असे मानून न्यूयॉर्कला शिष्टमंडळ पाठवले व हैद्राबादला स्वतंत्र राष्ट्राचा दर्जा द्यावा अशी युनोकडे १० सप्टेंबर १९४८ रोजी विनंती केली. सरदार पटेल यांनी ताबडतोब हैद्राबादला भारतीय फौजा पाठवल्या व १७ सप्टेंबर रोजी निजाम शरण आला. २३ सप्टेंबर रोजी निजामाने युनोकडील आपला अर्ज मागे घेतला. जनरल चौधरी यांना लष्करी गव्हर्नर नेमण्यात आले. ते डिसेंबर १९४९ पर्यंत त्या जागेवर होते. मग निजाम हे राज्यप्रमुख व श्री. वेलोदी हे आय. सी. एस. अधिकारी हे मुख्यमंत्री अशी निवडणुका होईपर्यंत व्यवस्था करण्यात आली. पुढे संस्थानचे भारतात विलीनीकरण झाले.

ऑगस्ट १९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाल्यावर तेलगू भाषकांना स्वतंत्र आंध्र मिळेल अशी त्या भागातील लोकांची अपेक्षा होती. २७ नोव्हेंबर १९४७ रोजी पंतप्रधान पं. नेहरू यांनी भाषावार प्रांतरचना तात्त्विकदृष्ट्या सरकारने स्वीकारली आहे असे जाहीर केले. मार्च १९४८ मध्ये पं. नेहरूंनी विशाखापट्टमला भेट दिली तेव्हा स्वतंत्र आंध्रच्या स्थापनेच्या विचारासाठी एक समिती नेमण्याचे त्यांनी आश्वासन दिले, पण घटनासमितीच्या

अध्यक्षांनी जून १९४८ मध्ये नेमलेल्या दार कमिशनने असा अहवाल दिला की, तूर्त कोणत्याही नव्या प्रांताची स्थापना करू नये. या अहवालाविरुद्ध देशात व विशेषतः आंध्रमध्ये इतका तीव्र असंतोष निर्माण झाला की, पं. नेहरू, वल्लभभाई पटेल आणि डॉ. पट्टाभी सीतारामैय्या यांची नवी समिति या प्रश्नाचा फेरविचार करण्यासाठी नेमण्यात आली. मद्रास सरकारनेही या विषयावर विभाजन समिती नेमली. आंध्र स्वतंत्र झाला तर मद्रास शहर मिळू नये हा या समितीचा मुख्य उद्देश होता. २६ जानेवारी १९५० रोजी भारताची घटना अमलात येऊन भारत हे गणराज्य म्हणून जाहीर झाले.

स्वतंत्र आंध्रच्या बाबतीत भारत सरकारने वर्षानुवर्षे चालढकल केल्याने जनतेत तीव्र असंतोष पसरला. स्वामी सीताराम यांनी स्वतंत्र आंध्रसाठी १५ ऑगस्ट १९५१ पासून आमरण उपोषण सुरू केले. पं. नेहरूंनी अशा घटनाबाह्य प्रकारांनी सरकारवर दडपण आणण्याच्या प्रयत्नाबद्दल असमाधान व्यक्त केले. स्वामी सीताराम यांच्या उपोषणाच्या ३५ व्या दिवशी आचार्य विनोबा भावे यांनी मध्यस्थी केली आणि स्वामी सीताराम यांना विनंती केली की सरकारला या प्रश्नावर शांतपणे निर्णय घेता यावा म्हणून त्यांनी उपोषण समाप्त करावे. त्या विनंतीस मान देऊन स्वामी सीताराम यांनी उपोषण समाप्त केले, पण सरकारने स्वतंत्र आंध्रच्या निर्मितीसाठी काहीच केले नाही. आपली फसवणूक झाली अशी आंध्रच्या लोकांची रास्त भावना झाली आणि जानेवारी १९५२ च्या निवडणुकीत त्यांनी काँग्रेसला चांगलाच धडा शिकवला. मद्रास राज्यातील ३७५ जागांपैकी काँग्रेसला फक्त १५२ जागा मिळाल्या. आंध्रमध्ये तर १४० जागांपैकी काँग्रेसला ४३ आणि कम्युनिस्टांना ४१ जागा मिळाल्या. या निवडणुकीत संजीव रेड्डी यांचाही पराभव झाला. कम्युनिस्ट पक्ष टी. प्रकाशम् यांच्या कामगार मजदूर प्रजापक्षाने संयुक्त आघाडी स्थापन केली, पण त्यांचे बहुमत असूनही राज्यपालांनी सी. राजगोपालाचारी यांना कौन्सिलर नेमले आणि मंत्रिमंडळ बनविण्यास सांगितले.

या धडधडीत अन्यायाविरुद्ध आंध्रमधील लोक चवताळून उठले. म. गांधीजींचे शिष्य पोट्टी सीतारामलु यांनी स्वतंत्र आंध्रासाठी १९ ऑक्टोबर १९५२ रोजी आमरण उपोषण आरंभले. त्यांच्या या उपोषणाकडे सबंध देशाचे लक्ष लागून राहिले होते. कारण स्वतंत्र आंध्रच्या निर्मितीवर

महाराष्ट्र, कर्नाटक इत्यादी इतर अनेक भाषक प्रांतांची निर्मिती अवलंबून होती. पूर्वी स्वामी सीताराम यांच्या उपोषणाच्या बाबतीत केंद्र सरकार उदासीन राहिले व या वेळीही केंद्र सरकारची दृष्टी सहानुभूतीची नव्हती. सबंध आंध्र प्रक्षुब्ध झाला असतानाच १५ डिसेंबर १९५२ रोजी पोट्टी सीतारामलु यांचे निधन झाले. त्याबरोबर प्रचंड भडका उडाला. लोकांनी रेल्वेस्टेशन्स, पोस्ट, कचेऱ्या, इतर सरकारी इमारती यांवर हल्ले करून जाळपोळ केली. १९ डिसेंबर १९५२ रोजी पं. नेहरूंनी लोकसभेत जाहीर केले की, मद्रास वगळून तेलगू भाषकांचे स्वतंत्र राज्य स्थापन केले जाईल. त्यासाठी वांछू कमिशनची नेमणूक करण्यात आली. १ ऑक्टोबर १९५३ रोजी पं. नेहरूंच्या हस्ते हैद्राबाद ही राजधानी असलेल्या आंध्र राज्याचे उद्‌घाटन झाले.

❑

# २. निजामांची राजवट

छत्रपती शिवाजी महाराजांनी इ. स. १६७७ मध्ये हैद्राबाद शहरास भेट दिली होती. अब्दुल हसन आणि शिवाजी महाराज यांची भेट ४ मार्च १६७७ रोजी दाद महालात झाली. मुधाळेकर घोरपडे यांना छ. शिवाजी महाराजांनी लिहिलेल्या पत्रात या भेटीची हकीकत वर्णिली आहे. ज्या दादमहालात ही भेट झाली, ती इमारत आता नष्ट झाली असून त्या ठिकाणी सध्या हायकोर्टची इमारत आहे. गोवळकोंड्याचे प्रधान अकण्णा-मादण्णा यांनी शिवाजी महाराजांना या मुक्कामात पाच मेजवान्या दिल्या होत्या. तसेच या मुक्कामात शिवाजी महाराजांनी केशव स्वामी भागानगरकर यांची कीर्तने ऐकली आणि त्यांना पुरस्कार देऊन त्यांचा सत्कारही केला होता. सभासदांच्या बखरीत या भेटीविषयी उल्लेख आहे.

१७६३ च्या राक्षसभवनाच्या लढाईत पराभव झाल्यावर निजामाने आपली राजधानी औरंगाबादहून हैद्राबाद येथे आणली. त्याच्याबरोबर अनेक नबाब, सरदार, दरकदार आले. त्यांनी शहरात मोठमोठे वाडे बांधले आणि हैद्राबादच्या सौंदर्यात व वैभवात मोलाची भर घातली. त्यांपैकी पायग्याचे अमीर सर्वश्रेष्ठ होते. त्यांची पन्नास लाखाची जहागीर होती. त्यांनी फालुकनामा, जहानुमा, अस्मानगड, बशीरबाग इत्यादी बांधून हैद्राबादची शान वाढवली. तसेच राजा रघुनाथदास यांच्या घराण्यातील सरदारांनी 'मालवाला पॅलेस' हा भव्य वाडा बांधला. निजामाच्या पदरी जे फ्रेंच सरदार होते त्यांनी गन फौंड्री काढली. तिला तोप का साचा किंवा तोफांचा कारखाना हे नाव होते. त्यांचे सैनिक ज्या भागात राहत असत, त्या भागास ट्रुप बझार हे नाव होते. आता त्याच भागात हैद्राबादचे मुख्य पोस्ट ऑफिस आणि एन. टी. रामाराव यांचे घर आहे. १८०६ साली इंग्रजांनी रेसिडेंटसाठी जी इमारत बांधली, ती रेसिडेन्सी किंवा कोठी या नावाने प्रसिद्ध आहे. त्यापूर्वी पंचवीसतीस वर्षे इंग्रज हैद्राबादमध्ये ये-जा करीत होते.

निजामांच्या पदरी अनेक हिंदू सरदार होते. चंद्रसेन जाधव हा बाळाजी विश्वनाथाच्या कारकीर्दीत निजाम उल्मुल्कच्या नोकरीत राहिला. चंद्रसेनच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा रामचंद्र हा सरदार झाला. त्याने नासिरजंगबरोबर दक्षिणेच्या लढाईत भाग घेतला होता. पानिपतनंतर १७६१ साली निजामाने मराठ्यांवर आक्रमण केले आणि पुण्यापर्यंत सैन्य नेले, पण या वेळी रामचंद्र जाधवाने निजामाचा धाकटा भाऊ मीरमोगल याच्याशी संगनमत करून अचानक मराठ्यांची बाजू घेतली. त्यामुळे निजामाची फजिती झाली आणि त्याने घाईघाईने पेशव्यांच्या बरोबर तह करून माघार घेतली. सुल्तानजी निंबाळकर हा मराठ्यांचा सरलष्कर खर्ड्याच्या लढाईनंतर १७२४ साली निजामाला मिळाला. त्याने खर्डी येथे मोठा किल्ला बांधला. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा हणमंतराव सरदार झाला. सरदार खडांगळे हाही निजामाचा एक मराठा सरदार होता, पण पुढे त्याने मराठ्यांशी संगनमत केल्याने निजामाने त्याची जहागीर जप्त केली. निजाम अली हा वऱ्हाडचा सुभेदार असताना विठ्ठल सुंदर हा मराठा सरदार त्याला मिळाला. १७५९ साली सलाबत जंगचा पराभव करून निजाम अलीने कारभार आपल्याकडे घेतला, तेव्हा त्याने विठ्ठल सुंदरला दिवाण केले. विठ्ठल सुंदराने जानोजी भोसले, गोपाळराव पटवर्धन असे अनेक सरदार मराठ्यांच्याकडून फोडून निजामांच्या गोटात आणले. राक्षसभवनाच्या लढाईत १७६३ मध्ये विठ्ठल सुंदर मारला गेला. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा नातू चिमणराजे याला सरदारकी देण्यात आली.

रंभाजीराव निंबाळकर हा खर्ड्याच्या लढाईत निजामाच्या बाजूने लढला होता. मोरोपंडित रायराजा हा नासिरजंगचा मुख्य सचिव होता. परभणी जिल्ह्यातील हैबतराव गोपाळ हे निजामाच्या माहिती खात्याचे मुख्य म्हणून काम करीत होते. त्याला राजराजेंद्र ही पदवी निजामाने दिली होती. हरबा पंडित नेमवंतवाले हा मुशीसल्मुल्कच्या वऱ्हाडच्या सुभेदारीच्या कारकीर्दीत निजामाच्या पदरी होता. म्हैसूरच्या तिसऱ्या व चौथ्या लढाईत तो निजामाच्या बाजूने लढाला होता. बाळाजी केशव पळनिटकर हा निजामांच्या चाकरीत असताना १७७३ साली निजाम अली आणि राघोबादादा यांच्यात बेदरजवळ लढाई झाली. या लढाईत निजामाच्या पिछाडीस हा पळनिटकर होता, असे अनेक मराठा सरदार निजामांच्या

पदरी होते, पण निजामाने त्यांच्यावर पूर्ण विश्वास टाकला नाही, कारण चंद्रसेन जाधव आणि सुल्तानजी निंबाळकर हे ऐनवेळी मराठ्यांना मिळाल्याने निजामाची त्रेधातिरपीट उडाली होती, हे निजाम विसरला नव्हता. त्यामुळे निजामाच्या पदरी असलेले मराठा सरदार हे अस्वस्थ आणि अनिश्चित परिस्थितीत कुचंबत असत. १८०० मध्ये इंग्रजांनीच निजामाला संरक्षण दिल्यावर या मराठा सरदारांची मातबरी उरली नाही. हैद्राबादमधील मराठा सरदारांची घराणी निस्तेज होऊन उताराला लागली.

निजामांची राजवट हा भारतीय इतिहासातील एक अतिशय उद्‌बोधक भाग आहे. अनेकदा तो भीषण आणि रक्तलांछितही झाला आहे, पण तो कधीही नगण्य किंवा उपेक्षित राहिला नाही. आसिफ जहा, निजाम उल्मुक याने निजामशाहीची स्थापना १७२४ मध्ये केली आणि ती सात पिढ्यांपर्यंत २२४ वर्षे टिकली. असिफ जहा हा बुऱ्हाणपूर आणि खुलदाबाद या गावाच्या मध्यभागी एका जंगलात भुकेला फिरत असताना त्याला एक साधू भेटला. आसिफने त्या साधूकडे अन्न मागितले. साधूने कुलचा नावाचा चपातीसारखा पदार्थ त्याला दिला. भुकेल्या असिफने चार कुलच्या खाल्ल्या. मग त्याला पश्चाताप झाला. त्याला वाटले की एका गरीब फकिराला आपण लुबाडले व त्याला अन्न कमी पडले; म्हणून त्याने 'पुरे' असे सांगितले. असिफला अजून भूक आहे हे त्या फकिराने ओळखले व 'आणखी खा' म्हणून झोळीतून बऱ्याच कुलच्या काढून दिल्या. असिफ याने एकंदर सात कुलच्या खाल्ल्या. तेव्हा साधूने त्याला आशीर्वाद दिला, ''तू राज्य मिळवशील आणि ते सात पिढ्या चालेल.'' आसिफची निजामशाही खरोखरच सात पिढ्या चालली. सातवा निजाम आरेमान अली, हैद्राबादवर राज्य करीत असतानाच १९४८ साली भारताचे उपपंतप्रधान सरदार वल्लभभाई पटेल यांनी सैन्य पाठवून निजामाशाही खालसा केली. ज्या सात कुलच्याने असिफ याला साक्षात्कार झाला त्यांची आठवण म्हणून त्याने निजामाच्या निशाणावर कुलच्याचे चित्र ठेवले. ते अजून चालू आहे.

असिफ म्हणजे उच्च आणि जहा म्हणजे पद किंवा जागा. असिफजहा म्हणजे उच्चपदस्थ. निजाम म्हणजे व्यवस्थापक. आसिफ जहाने निजाम उल्मुक हा किताब घेतला होता. त्या किताबाचा अर्थ देशाचा व्यवस्थापक असा आहे. मोगलांच्या काळात बादशहा, जहागीरदार, सरदार हे अशा

पदव्या किंवा किताब घेत असत. कधी कधी खुद्द बादशहाच त्यांची खैरात करी. अनेकदा एखाद्या व्यक्तीचे मूळ नाव मागे पडून ती व्यक्ती त्याच्या किताबावरून ओळखली जाई. उदाहरणार्थ शहाजहान या नावाने विख्यात असलेल्या बादशहाचे नाव शहाबुद्दीन होते. शहाजहान म्हणजे जगाचा अधिपती. ही त्याची पदवी होती. बाबर म्हणजे सिंह ही जलालुद्दीनची पदवी होती, पण इतिहासात तो बाबर या नावानेच मशहूर आहे. हुमायून म्हणजे भाग्यवान. ही नसीरुद्दीनची पदवी होती, पण आता सारे त्याला हुमायून या नावानेच ओळखतात. औरंगजेब बादशहा सर्वश्रुत आहे, पण त्याचे नाव मुहिमुद्दीन असे होते. सिंहासन सुशोभित करणारा या अर्थी औरंगजेब ही पदवी त्याने घेतली व त्याच नावाने तो ओळखला जातो. आलमगीर या नावानेही तो प्रसिद्ध आहे. आलमगीर म्हणजे जग जिंकणारा. ही त्याची पदवीच होती. नूरजहान ही जगप्रसिद्ध सम्राज्ञी, पण नूरजहान म्हणजे जगाचा प्रकाश, हा किताब होता. तिचे खरे नाव मेहरुन्निसा होते.

निजामशाहीचा संस्थापक निजाम उल्मुक असफजहा (पहिला) हा अत्यंत दूरदृष्टीचा होता. त्याने मृत्यूपूर्वी काही काळ मुलगा नासिरजंगास केलेल्या उपदेशात त्याच्या दूरदृष्टीचे प्रतिबिंब दिसते. तो म्हणतो, ''मराठे या देशाचे जमीनदार आहेत. त्यांना सर्वस्वी नाहीसे करणे शक्य नाही. त्यांच्याशी सल्ल्याने वागणेच योग्य आहे. राजा हा पृथ्वीचा एकमेव मालक नसून विश्वस्त आहे. त्याने सर्व पृथ्वी एकट्यानेच व्यापण्याचा अधाशीपणा करू नये. सर्व माणसे ईश्वरानेच निर्माण केली असल्याने त्यांना मारणे योग्य नाही. शिपाई लोकांचा वंश वाढावा म्हणून त्यांना घरी जाण्यासाठी सवड द्यावी. तू आपले आयुष्य प्रवासात रोज नवा मुलुख पाहत व नवे पाणी पीत तंबूच्या छायेत घालवावेस म्हणजे देशाचा बंदोबस्त व राज्यव्यवस्था सुरक्षित चालेल. एका माणसाकडे एकच काम द्यावे. साधुसंत जोडीत जावे. आपल्या सत्तेचा प्रभाव दाखविण्यासाठी दुसऱ्याचा मुलुख जिंकणे किंवा संपत्ती हरण करणे अन्यायाचे आहे.'' (निजाम-पेशवे संबंध. त्र्यं. शं. शेजवलकर)

निजाम उल्मुककडे ऐंशी हजार घोडेस्वार आणि दोन लाख पायदळ होते. इतका तो बलिष्ट होता. त्या वेळी उत्तरेत मराठा साम्राज्य स्थापण्याचे स्वप्न पेशवे पाहत होते. ही संधी साधून फ्रेंच आणि इंग्रज

दक्षिण किनाऱ्यावर आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करीत होते. निजाम उल्मुकच्या दरबारातील गुलाम हुसेन हा फ्रेंचधार्जिणा होता. त्याच्या मदतीने फ्रेंचांनी पाँडेचरीवर ताबा मिळविला होता आणि तेथे स्वतःचे चलनही (पाँडेचरी रुपया) सुरू केले होते. त्या वेळी मद्रासला रिचर्ड बेमन हा ब्रिटिश गव्हर्नर होता. त्याने निजामाचे महत्त्व जाणून त्याला मोठमोठे नजराणे पाठवून खूष ठेवले होते. ब्रिटिश आणि फ्रेंच या आधुनिक सत्तांशी निजाम उल्मुक हा समतोल सांभाळून कारभार करीत होता.

पहिला निजाम असिफ जहा हा कर्तबगार होता. त्याला ७८ वर्षांचे दीर्घ आयुष्य मिळाले. २१ मे १७४८ रोजी त्याचे बुऱ्हाणपूर येथे निधन झाले. त्याने हैद्राबाद शहराभोवती तटबंदी घालण्यास सुरुवात केली. पहिल्या निजामाचे निधन झाली, तेव्हा परकीय सत्ता भारतात हात-पाय पसरू लागल्या होत्या. असिफ जहाच्या निधनानंतर त्याच्या मुलांत आणि नातवंडातही राज्याबद्दल झगडे सुरू झाले. असिफचा दुसरा मुलगा नसिरजंग याला ब्रिटिशांनी पाठिंबा दिला. असिफ जहाचा नातू मुझफ्फरजंग याला फ्रेंचांनी पाठिंबा दिला. नसीरजंगचा विजय झाला, पण थोड्याच काळात त्याचा खून झाला. त्याच्यामागून मुझफ्फरजंग हा गादीवर आला, पण त्याचाही वर्षभरातच खून होऊन त्याचा मुलगा सलोबत जंग याने गादी बळकावली. १७६२ साली त्याचा भाऊ निजाम अलिखान याने त्याला पदच्युत करून बिदरच्या तुरुंगात टाकले. निजाम अलीखान याने मात्र दीर्घकाळ म्हणजे चाळीस वर्षे हैद्राबादचे राज्य केले. त्याच्यानंतर सिकंदर जहा गादीवर आला. त्या वेळी हैद्राबादची आर्थिक परिस्थिती अतिशय वाईट होती. विल्यम पामट अँड कंपनीकडून घेतलेल्या प्रचंड कर्जाच्या बोज्याखाली निजाम डबघाईला आला होता.

निजाम अली हा निजाम उल्मुकचा चौथा मुलगा (१७६१ ते १८०२). त्याने राक्षसभवन येथे पेशव्यांशी लढाई केली, पण त्या लढाईत त्याचा पूर्णपणे पराभव झाला. बारभाईच्या कारस्थानात त्याने तेरा लाखाची जहागिरी मिळविली. मराठ्यांशी त्याने दोन कोटी रुपयाची चौथाई देण्याचा करार केला, पण नंतर ही रक्कम देण्यास नकार दिला. त्यामुळे मराठ्यांनी त्याच्याशी लढाई केली. ती 'खर्ड्याची लढाई' या नावाने प्रसिद्ध आहे.

याही लढाईत निजामाचा पराभव झाला. टिपू सुलतानच्या विरुद्ध इंग्रजांना मदत केल्याबद्दल इंग्रजांनी निजामअलीस ५३ हजार रुपयांचा प्रांत दिला. इ. स. १८०० मध्ये निजाम अलीने इंग्रजांशी सहा हजार तैनाती फौजेचा करार केल्याने तो पूर्णपणे इंग्रजांचा अंकित झाला. इंग्रजांनी सहा हजार तैनात फौज निजामाच्या राज्यात ठेवली आणि त्याबद्दल निजामाने इंग्रजांना सालीना २४ लक्ष रुपये देण्याचे ठरले. मराठे, इंग्रज आणि नागपूरकर भोसले या तीन शत्रूंशी निजाम अलीला मुकाबला करावा लागला. कधी लढाई करून तर कधी तडजोड करून त्याने आपले राज्य राखले. नाना फडणवीस आणि दौलतराव शिंदे यांच्याशी एकाच वेळी परस्परविरोधी करारही त्याने केले होते. (१७९६).

सिकंदर जहाने २६ वर्षे राज्य केले आणि तो १८२९ साली मरण पावला. त्याच्या मागोमाग त्याचा मुलगा नसीर उद्दौला हा राज्यावर आला. त्याने सालारजंग या कर्तबगार पंतप्रधानाची १८५३ साली नेमणूक केली. सालारजंगने राज्याला आर्थिक स्थैर्य दिले आणि कारभारात अनेक सुधारणा केल्या. नसीर उद्दौला १८५७ साली मरण पावला. त्यावेळी उत्तरेत स्वातंत्र्ययुद्ध सुरू होते आणि त्याचा परिणाम दक्षिणेतही होऊन कारभार विस्कळीत झाला होता.

हैद्राबादचा सहावा निजाम मीर मेहेबूब अली म्हणजे एक रंगतदार व्यक्तिमत्त्व होते. अनेक विरोधी प्रवृत्तींचा त्याच्यात मिलाफ झाला होता. त्याने ४२ वर्षे हैद्राबादवर राज्य केले. त्याचा जन्म १८६६ चा, पण त्याचा बाप अफझल उद्दौला हा १८६९ सालीच निधन पावला आणि वयाच्या अवघ्या तिसऱ्या वर्षीच मीर मेहेबूब हा गादीवर आला ! पण त्याचे भाग्य असे की सालारजंग (पहिला) सारखा कर्तबगार दिवाण हैद्राबादमध्ये असल्याने निजामाचे वैभव सतत वाढत गेले. सर्व पदव्यांसह मीर मेहेबूबचे सबंध नाव असे पुकारले जाई : लेफ्टनंट जनरल, हिज हायनेस असफ जाह मुझफ्फर उल मुल्क, निजाम उद्दौला, नवाब सर मीर मेहेबूब अलिखान बहादूर, फतेहजंग, जी. सी. बी. जी. सी. एस्. आय. मुझफ्फर अल मुल्क म्हणजे जगज्जेता, निजाम उद्दौला म्हणजे विश्वाचा नियंता, फतेहजंग म्हणजे युद्धात जय मिळविणारा. अशा अनेक पदव्यांनी हा सहावा निजाम मंडित झाला होता. तो कवी होता, तसाच शिकारीही होता. वास्तविक

कविता ही कोमल मनाची खूण आहे. बंदुकीने वाघाला किंवा सिंहाला गोळी घालणे ही कविमनाच्या अगदी उलट प्रवृत्ती आहे, पण या दोन्ही प्रवृत्ती निजाममीर मेहेबूबमध्ये प्रकर्षाने होत्या. तो अत्यंत स्वाभिमानी आणि दुराग्रहीही होता. त्याने प्रजेच्या हिताचीही अफाट कामे केली. त्याला अफलातून निजाम म्हणणेच योग्य होईल.

अफलातून हा फार्सी शब्द अरबीतून आला आहे. अरबी भाषेत प्लेटो या विश्वविख्यात तत्त्वज्ञाचा अपभ्रंश असा होतो. त्याच भाषेत ॲरिस्टॉटलला अरस्तू या नावाने ओळखतात. मीर मेहेबूब या अफलातून निजामाच्या अनेक विलक्षण गोष्टी अद्यापही हैद्राबादमध्ये ऐकू येतात.

१८८४ साली निजाम मेहेबूब सज्ञान झाला, तेव्हा त्याला निजामाची वस्त्रे देऊन अधिकृतपणे सहाव्या निजामाने राज्य सुरू झाल्याची घोषणा करण्यासाठी व्हाईसरॉय दिल्लीहून हैद्राबादला आले. चार दिवस हा सोहोळा इतक्या वैभवाने साजरा झाला की स्वतः व्हाईसरॉयने म्हटले आहे की, ''या अत्यंत सुंदर अशा समारंभास हजर राहण्याचे भाग्य मला मिळाले याचा मला अभिमान वाटतो.''

१९०३ साली आठव्या एडवर्ड राजाच्या राज्यरोहण समारंभानिमित्त दिल्लीत दरबार भरविण्यात आला होता. त्या वेळी कर्दनकाळ या नावाने कुविख्यात असलेला लॉर्ड कर्झन हा व्हॉईसरॉय होता. त्याने दिल्ली दरबारात जमलेल्या सर्व संस्थानिकांनी आपल्या पुढे मान तुकवावी म्हणून एक युक्ती केली. व्हॉईसरॉय सर्व संस्थानिकांना क्रमाक्रमाने हार घालतील असे जाहीर केले. त्या वेळी लॉर्ड कर्झन अशा प्रकारे उभा राहिला की, हार घालून घेणाऱ्या संस्थानिकाला त्यासाठी मान वाकवावीच लागे. सर्व संस्थानिक या युक्तीला बळी पडले, पण हैद्राबादचा निजाम मेहबूब जेव्हा लॉर्ड कर्झनपुढे उभा राहिला तेव्हा त्याने मान न झुकवता हारासाठी आपली तलावार पुढे केली. लॉर्ड कर्झन म्हणाला, ''हार गळ्यात घालण्यासाठी आणला आहे.'' त्यावर निजाम मेहेबूब खानने उत्तर दिले, ''मान आज आहे तर उद्या नाही. निष्ठेची खरी निशाणी तर तलवारच आहे. या तलवारीला हार घालावी.'' निजाम ताठ उभा राहिला होता आणि लॉर्ड कर्झन गोंधळात पडला होता, पण असा अधिक वेळ घालविला तर त्याबद्दल चर्चा होईल म्हणून लॉर्ड कर्झन याने तलवारीलाच हार घातला

आणि हा प्रसंग निभावून नेला.

हैद्राबादमध्ये बाबा शरफुद्दीन दर्गा नावाचा दर्गा होता. निजाम मेहेबूब या बाबा शरफुद्दीनचा भक्त होता. तो दरसाल या दर्ग्यात एक अन्नछत्र घालीत असे. या अन्नछत्राचा असा नियम होता की तेथे पंगतीत बसून कोणीही कितीही खावे, पण जाताना अन्न घरी नेऊ नये. एकदा तेरा वर्षांच्या एका मुलाला अन्नछत्रात जेवून जाताना सदऱ्याखाली थोडेसे अन्न लपवून नेताना पोलिसांनी पकडले. तो मुलगा रडत म्हणाला, ''माझी मोठी बहीण गरोदर आहे. आम्ही गरीब आहोत. गरोदर असल्याने माझी बहीण जेवण्यासाठी अन्नछत्रापर्यंत येऊ शकत नाही. म्हणून तिच्यासाठी मी हे अन्न नेत आहे.'' पोलिसांनी ही गोष्ट निजाम मेहेबूब यांस सांगितली. ते ऐकून निजाम गहिवरला. त्याने हुकूम दिला की रोज त्या बाईला बाळंतपणापर्यंत चांदीच्या ताटातून जेवण पाठवावे आणि शेवटच्या दिवशी ते चांदीचे ताट तिच्याकडेच राहू द्यावे.

हैद्राबाद शहरातून मुसा नदी वाहते. २८ सप्टेंबर १९०८ रोजी या नदीला अचानक महापूर आला. त्याआधी सतत तीन दिवस भयंकर मोठा पाऊस पडत होता. पुराचे पाणी दोन्ही काठावरच्या घरात शिरले. दहा हजारावर लोक बुडून मरण पावले आणि एक लाख लोक निराश्रित झाले. या वेळी निजाम मेहेबूबने प्रजेसाठी जे जे शक्य होते ते सर्व केले. दोन दिवस तो स्वतः पावसापाण्यातून लोकांच्या साहाय्यासाठी फिरत होता. त्याने शहराच्या सर्व भागात मिळून १४ मोठे भटारखाने सुरू केले आणि सर्वांना मोफत अन्न दिले. शिवाय अंथरुणे, पांघरुणे, कपडे यांचीही खैरात केली. पाच लाख रुपये तातडीची मदत दिली आणि भारतातून दहा लाख रु. गोळा केले. पूर आल्यापासून पंधरा दिवस दररोज सहा लक्ष लोकांना त्याने जेवण दिले. मृतांचे अंत्यसंस्कार आणि आजारी लोकांना औषधोपचार ही प्रचंड कामे होती. त्यासाठीही निजामाने आपले हजारो लोक कामाला लावले. निजाम कडवा मुसलमान, पण मुसा नदीची पूजा केल्यानंतर पूर ओसरेल म्हणून हिंदू पुजाऱ्यांनी सांगितले तेव्हा स्वतः निजाम पूजेसाठी बसला आणि एका हिंदू पुरोहिताने पूजा सांगितली. प्रजेविषयी या वेळी निजामाचे जे प्रेम दिसून आले त्याला तोड नाही. त्या वेळी हैद्राबादची लोकसंख्या चार लाख होती. त्यापैकी एक चतुर्थांश

लोकांना पुराचा तडाखा बसला होता. जे लोक या पुरातून वाचले त्यांच्या पुनर्वसनाचे कार्य नंतर अनेक वर्षे चालले होते. सुमारे चारशे विवाह या पुराआधी ठरले होते, पण पुरपरिस्थितीमुळे आता ते होऊ शकत नव्हते. निजामास ही बातमी कळली. तेव्हा त्याने हे सर्व चारशे विवाह सरकारी तिजोरीतील रकमा खर्चून साजरे केले. निजाम मेहेबूबच्या अफाट लोकप्रियतेमुळे ब्रिटिश सरकारही त्याच्याशी कधी वैमनस्याने वागू शकले नाही.

निजाम मेहेबूब खान याला भाषा व साहित्य यांच्याविषयी प्रेम होते. त्याने अनेक उर्दू शायरांना उत्तरेतून आपल्या दरबारी बोलावून घेतले. तो स्वतः कवी असल्याने त्याला इतर कवींच्याविषयी बरोबरीच्या नात्याने जिव्हाळा वाटत असे. त्यांना निजाम मेहेबूबने कधीही आश्रितांसारखे वागविले नाही. त्याने फार्सीऐवजी उर्दूला राजभाषेचा दर्जा दिला. निजामाच्या दरबारची भाषा १८८४ पर्यंत फार्सी होती. त्या वर्षी ती उर्दू करण्यात आली. उर्दूमध्येही दक्षिणी उर्दू आणि उत्तरेकडील उर्दू असा फरक होता. उत्तरेकडील उर्दू ही अधिक प्रतिष्ठित भाषा मानली जात असे. ही भाषा दिल्ली, आग्रा, लखनौ या भागातील कवींनी राजमान्यतेला नेली होती. मिर्झा गालीब, मीर आरजू मोमीन, नजर अकबरांबादी, शौक लखनवी अशा थोर शायरांनी तिला प्रतिष्ठा आणली होती. दक्षिणेकडील उर्दू ही एलियपूर, औरंगाबाद, हैद्राबाद, अहमदनगर या भागात प्रचलित होती. गोवळकोंड्याचा सुलतान महमद अली, महमद कुतुबशहा, तानाशाहा, गव्वासी असे मशहूर शायर या भागात होते. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात दक्षिणेकडील उर्दू मागे पडून दक्षिणेतही उत्तरेकडील उर्दूचा प्रभाव पडला. या काळात उत्तरेकडील अनेक प्रतिभावंत कवी हैद्राबादला आले. त्यात कविश्रेष्ठ दाग, देहलवी, हसरत, मोहानी, जलाल मणिकपूरी, फानी बदायुनी इत्यादींचा समावेश होता. वहीउद्दीन सलीम आणि अब्दुल हक हे भाषापंडित आले. तसेच कादंबरीकार रतननाथ सरकार आणि हादी रूसवा आणि विनोदी लेखक फतहतुल्ला बेग यांनीही उत्तरेतून हैद्राबादला स्थलांतर केले. १९१७ सालीच ओस्मानिया विद्यापीठाने उर्दू ही अधिकृत भाषा केली. त्यामुळे उर्दूच्या अभ्यासाला मोठीच चालना मिळाली. उर्दू काव्याचे समीक्षक डॉ. अब्दुल लतीफ आणि

सरबही हे मान्यता पावले. बाहेरून आलेल्या कवींप्रमाणे खुद्द हैद्राबादचे रुबाईकर्ते अमजद सिकंदर वली वज्द, साहेबजादा मैकेश व मुहिद्दीन यांनीही लोकप्रियतेचे शिखर गाठले. निजाम मेहेबूबच्या कलाप्रेमाचा आश्रय त्याच्यानंतरही चालू राहिला. नाटक ही इस्लाम धर्माला निषिद्ध अशी कला असल्याने उत्तरेत उर्दू नाटक मूळ धरू शकले नाही, पण हैद्राबादमध्ये इंग्रजी नाटकांच्या वाचनामुळे सुशिक्षितांना नाटकाबद्दल रुची निर्माण झाली. कॉलेजमधून शेक्सपियर, शॉ, गटे, चेकॉव्ह यांच्या नाटकांचे प्रयोग होऊ लागले. हळूहळू इंग्रजी नाटकांप्रमाणेच उर्दू नाटके करण्यासही विद्यार्थी व प्राध्यापक यांनी सुरुवात केली. १९२५ साली अशी नाटके प्रथम झाली. अजीज अहमद यांचे (कॉलेज के दिन) हे नाटक याचे उत्तम उदाहरण आहे. 'होशे के नाखून' या नावाने बर्नार्ड शॉ यांच्या 'वुडोअर्स हाऊस' या नाटकाचे रूपांतरही उर्दू रंगभूमीवर हैद्राबाद येथे सादर करण्यात आले. उस्मानिया विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी गटेच्या 'फाऊस्ट' या नाटकाचा उर्दू अनुवादही रंगमंचावर सादर केला. अनुवादावरून उर्दू नाटककार स्वतंत्र नाट्यकृतीकडे वळले. या नाटककारांत अकबर वफाकानी, फजल रहमान, मखदुम मुहिमुद्दीन यांची नावे घेता येतील. या नाटककारांनी सरंजामशाहीविरुद्ध बंड पुकारून नाटकांना आधुनिक विचारांची जोड दिली. सेतु माधव पगडी यांनी म्हटले आहे की १९३० ते १९४७ या काळात हैद्राबादमधील विविध संस्थानी पन्नासवर उर्दू नाटके रंगमंचावर आणली. त्यामुळे उर्दू रंगभूमी समृद्ध झाली. ख्वाजा मुइनुद्दीन यांना नंतर पाकिस्तानचे प्राईड ऑफ परफॉर्मन्स हे पारितोषिकही मिळाले. ही सर्व सहावा निजाम मीर मेहेबूब याने साहित्य व भाषा यांना दिलेल्या चालनेची फळे आहेत. त्याच्यामुळे भारतातील सांस्कृतिक क्षेत्रात हैद्राबादची स्वतंत्र नजाकत राहिली आहे.

❑

# ३. अखेरचा निजाम

हैद्राबादची किंग कोठी म्हणजे जगातील सर्वात श्रीमंत अशा निजामाचं निवासस्थान. या निजामाची संपत्तीच नव्हे, तर त्याची बिरुदावलीसुद्धा छाती दडपून टाकणारी. निजामाचं नाव पुकारायचं तर ते असं पुकारलं जात असे : 'हिज एक्झल्टेड हायनेस असीफ जाह, मुझफ्फर उलमुल्क निजाम उलमुल्क निजामौद्दौला, फत्तेजंग, रुस्तुम ए दौरान, अरस्त-ए-झमन, सिपाह सालार, नाईट ग्रँड क्रॉस ऑफ द ब्रिटिश एम्पायर.' ब्रिटीश अमदानीत यात 'यार-ओ-वफादार' म्हणजे ब्रिटिशांचे एकनिष्ठ मित्र या बिरुदाचीही भर होती. निजामाच्या अमलात हैद्राबाद राज्याच्या सर्व शैक्षणिक संस्थांत अशी प्रार्थना होत असे : 'ता अब्द खालिक-ए-आलम यह रियासत रखे। तुझको उस्मान बसद्-ए-इजलाल रखे' म्हणजे 'आपलं साम्राज्य यावच्चंद्रदिवाकरौ राहू दे.' पण शाळकरी मुलांच्या या प्रार्थनेचा अल्ल्यावर काहीच परिणाम झाला नाही. एके काळी निजामाचं राज्य ८३,००० चौरस मैल प्रदेशावर पसरलेलं होतं. त्या समृद्ध आणि विस्तीर्ण राज्याचा कारभार किंग कोठी नावाच्या अगदी साध्या दिसणाऱ्या, पिवळसर रंगाच्या इमारत समूहातून चालविला जात असे. किंग कोठी ही एकच इमारत नाही. अनेक लहान-मोठ्या वाड्यांचा तो समूह आहे. त्यात पोर्चेस आहेत, कर्मचाऱ्यांच्या खोल्या आहेत, सरदार-दरकदारांची निवासस्थाने आहेत, जनानखाने आहेत, निजाम आणि त्यांच्या कुटुंबियांचे बंगले आहेत. या सर्वांच्या भोवती विटांची भिंत आहे. त्यावर गिलावा करून पिवळसर रंग दिला आहे. आता हा गिलावा अनेक ठिकाणी पडून रंगही विटका झाला आहे. मुख्य दरवाजा एका पडद्याने नेहमी बंद असतो. निजाम मीर ओस्मान यांनी ओस्मानिया विद्यापीठासाठी १४०० एकर जागा दिली. ३५ हजार कामगारांना विद्यापीठ उभारणीचा रोजगार दिला आणि कोट्यवधी रुपयांच्या देणग्या दिल्या. त्यातील एकाच इमारतीला १९३९ साली ३ कोटी ६० लक्ष रु. खर्च आला. ओस्मान सागरवर त्यांनी ५४ लक्ष रु. खर्च केले आणि हिमायत सागरसाठी ९२ लक्ष रु. दिले.

सातवा निजाम ओस्मान अलीखान याचा जन्म १८८५ सालचा. तो १९११ साली गादीवर आला. म्हणजे तो निजाम झाला, तेव्हा अगदी योग्य अशा सव्वीस वर्षांचा होता.

हैद्राबाद हे स्वतंत्र मुस्लिम राष्ट्र व्हावे यासाठी निजाम वर्षानुवर्षे अविरत खटपट करीत होता. भारतात इतरत्र बॅ. जिनांच्या नेतृत्वाखाली मुस्लिम लीग निर्माण झाली, पण मुसलमान असूनही निजामाने या संघटनेस हैद्राबादमध्ये मज्जाव केला. त्याऐवजी त्याने हैद्राबाद राज्यात इत्तेहादुल मुसलमीन ही संघटना स्थापन करण्यास उत्तेजन दिले. १९२६ साली या निजामाने व्हाईसरॉयला खलिता लिहून कळविले की, आतापर्यंतचे निजाम आणि ब्रिटिश यांच्यातील सर्व करार बरोबरीच्या नात्याने झाले आहेत. म्हणजेच हैद्राबादच्या निजामाचे सार्वभौमत्व ब्रिटिशांनी मान्य केले आहे. म्हणून आपल्याला 'हिज मॅजेस्टी' असे संबोधण्यात यावे व हे बिरूद वापरता आले पाहिजे, असे निजामाने याच खलित्यात व्हाईसरॉयला कळविले होते. हैद्राबाद हे स्वतंत्र्य राष्ट्र आहे हे गृहित धरूनच या निजामाने अनेक सुविधांची पूर्तता केली होती. बँक ऑफ इंग्लंडच्या धर्तीवर त्याने हैद्राबाद बँकेचा स्वतंत्र कारभार ठेवला. त्या काळी भारतीय रुपयाचा पौंडाचा स्वतंत्र दर होता, तर अश्रफी या निजामीच्या चलनाशी बँक ऑफ इंग्लंडचा पौंडाशी वेगळा दर होता. ज्या काळी परराष्ट्रातील गुंतवणुकीची इतर भारतीय संस्थानिकांना कल्पनाही नव्हती, त्या काळात ओस्मान अलीने इराण, इंग्लंड, कॅनडा, स्वित्झर्लंड, फ्रान्स, इटली इत्यादी अनेक राष्ट्रांत गुंतवणूक केली होती. त्याचे कोट्यावधी पौंड व डॉलर्स या राष्ट्रांत पेरले गेले होते. निजामाची एकंदर रोकड तीन अब्ज होती. त्यांपैकी दोन अब्ज रुपये त्याने परदेशात गुंतविले. होते. भारतात जशी आय. सी. एस. ही वरिष्ठ सरकारी नोकरांची व्यवस्था होती तशी निजामाने हैद्राबाद सिव्हिल सर्व्हिस सुरू केली होती. निजामाने आपले गुप्तहेर इंग्लंड, अमेरिका, युरोप वगैरे भागात पाठवून हैद्राबादला स्वतंत्र राष्ट्र म्हणून मान्यता मिळविण्यासाठी तेथील लोकमत आपल्या बाजूने वळविण्याची कोशीस केली होती. भारतीय भाषेत मेडिकल, इंजिनियरिंग वगैरे शाखांतील पदव्या देणारे भारतातले पहिले विद्यापीठ-ओस्मानिया विद्यापीठ हे निजामाने १९१८ साली सुरू केले. इतकेच नव्हे, तर जगप्रसिद्ध केंब्रिज

विद्यापीठाच्या केंब्रिज संस्था चालू केल्या आणि वरिष्ठ श्रेणीतील बुद्धिमान प्रशासक निर्माण केले. हैद्राबाद संस्थानची रेल्वे, पोस्ट आणि तार व्यवस्था स्वतंत्र होती. इतकेच नव्हे, तर भारतातील हवाई वाहतूक जेव्हा बाल्यावस्थेत होती, तेव्हाच निजामाने हैद्राबादची स्वतंत्र विमानव्यवस्था चालू करण्याची तयारी ठेवली होती. त्याने उद्योगधंद्यांच्या वाढीला उत्तेजन दिले. हैद्राबादच्या केंब्रिज संस्थेतून अली यावर जंग यांच्यासारखे अनेक जागतिक कीर्तीचे मुत्सद्दी निर्माण झाले.

अ. भा. काँग्रेसची शाखा हैद्राबादमध्ये निघू शकली नाही. अशा शाखेला परवानगी देण्याविषयी अर्ज आला असता निजामाने स्पष्ट केले की, हैद्राबाद हे स्वतंत्र राष्ट्र आहे. अर्थातच भारत हे येथे परराष्ट्र आहे. परराष्ट्रातील कोणत्याही राजकीय संघटनेला येथे परवानगी मिळणार नाही. अशा रीतीने हैद्राबाद हे स्वतंत्र राष्ट्र आहे याची जाणीव सर्वांना करून देण्याची एकही संधी निजामाने दवडली नाही.

१९४७ साली भारतीय स्वातंत्र्याच्या वाटाघाटींची किल्ली माउंटबॅटन यांच्या हाती आहे हे समजल्याबरोबर निजामाने या वाटाघाटींसाठी आपला वकील हा माउंटबॅटन यांच्याच गोटातला असावा अशी धूर्त तरतूद केली. त्याने त्यासाठी सर वॉल्टर मॉक्टनची नेमणूक केली आणि त्यासाठी पाण्यासारखा पैसा खर्च केला. सर मॉक्टन हे माउंटबॅटन घराण्याचे अधिकृत वकीलच होते. लॉर्ड माउंटबॅटन यांच्याच वकिलाला निजामाच्या वतीने त्यांच्याशी वाटाघाटी करायला बसवून निजामाने मुत्सद्देगिरीची बाजी मारली होती.

निजामाने स्वतंत्र राष्ट्र म्हणून हैद्राबादचा पुकारा करण्याची योजना किती बारकाईने आखली होती हे पाहिले तर त्याच्या बुद्धिमत्तेची विशेष ओळख पटते. स्वतंत्र हैद्राबाद करायचे तर त्याकरिता आंतरराष्ट्रीय लोकमत आपल्या बाजूने हवे याची त्याला जाणीव होती. त्याने मध्य आशियातील अरब राष्ट्रांची या स्वातंत्र्याला सहानुभूती मिळवली होती. तुर्कस्थान, इराण, सौदी अरेबिया, इजिप्त इत्यादी राष्ट्रांत त्याने आपले प्रतिनिधी पाठवून या राष्ट्रांची अनुकूलता घेतली होती. अरब राष्ट्राचा कौल त्याने मिळविला, तर त्यात विशेष नव्हते. कारण एका धर्माच्या निशाणाखाली ते एकत्र येऊ शकत होते. पण त्याने अमेरिका, कॅनडा,

अर्जेंटिना, रशिया, इंग्लंड या देशांतही आपले प्रतिनिधी पाठवून स्वतंत्र हैद्राबादची बाजू मांडण्यात आणि त्यांची सहानुभूती मिळविण्यात यश मिळविले होते. सोव्हिएत रशियाला युनोमध्ये नकाराधिकार असल्याचे ओळखून निजामाने युनोत स्वातंत्र्याचा अर्ज करण्यापूर्वीच रशियाला कोट्यवधी रुपयांच्या शस्त्रास्त्रांची ऑर्डर दिली होती आणि भारतीय कम्युनिस्ट पक्षालाही अर्थसाहाय्य देऊन ठेवले होते. लक्झेंबर्गसारखे लहान राष्ट्रही स्वतंत्र राहू शकते, तर हैद्राबादसारखे अवाढव्य संस्थान स्वतंत्र राष्ट्र म्हणून का राहू शकत नव्हते हा त्याचा सवाल होता. हैद्राबादचा प्रश्न युनोत नेण्यापूर्वीच पंधरा वर्षे निजामाने युनोच्या प्रमुख सभासद राष्ट्रांचा कावेबाज अनुनय करण्यास सुरुवात केली होती हे त्याच्या द्रष्टेपणाचेच लक्षण मानले पाहिजे. रशियाबरोबरच झेकोस्लोव्हाकियातही निजामाने शस्त्रास्त्रांची मागणी नोंदली होती या दोन देशांत या कामासाठी त्याने तीन कोटी पौंड इतकी अवाढव्य रक्कम गुंतवली होती. निजामाचे हे सर्व राजकारण अखेर फसले हे खरे असले तरी आपले ध्येय गाठण्यासाठी त्याने किती पद्धतशीर आखणी आणि कृती केली होती हे यावरून दिसून येते.

पण सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कणखर चढाई पुढे हार खाऊन निजामाने पराभव पत्करला. जगातील सर्व श्रीमंत, अत्यंत धूर्त, आंतरराष्ट्रीय संबंध बांधण्यात वाकबगार आणि ब्रिटिश व भारतीय सत्तेबरोबर वर्षानुवर्षे टक्कर देणारा शेवटचा निजाम ओस्मान अलीखान याचे १९६७ साली निधन झाले. त्यावेळी त्याचा प्रमुख वारस आणि नातू मुकरम झा हा तेहतीस वर्षांचा होता.

ज्या किंग कोठीतून हैद्राबादचा कारभार चालत होता, ती जरी अगदी साधी असली तरी निजामाचे खरे वैभव ‘फालुकनामा’ या राजवाड्यात दिसते. दोन हजार फूट उंचीवरील हा राजवाडा वैभव आणि विलास यांनी खच्चून भरला आहे. ‘फालुकनामा’ याचा अर्थ ‘स्वर्गातील वाटा’ असा आहे. पैगामच्या पाचव्या अमिराने १८८३ साली हा बांधला आणि सर्व प्रकारच्या उंची फर्निचरची आणि ऐषआरामाची त्यात सोय केली. निजामाने १९०२ साली हा विकत घेऊन त्यात अनेक प्रकारच्या समृद्धीची भर घातली. इंग्लंडच्या राणीच्या विंडसर पॅलेसच्या धर्तीवर एका नामवंत इटालियन वास्तुशिल्पकाराने तो बांधला आहे. संगमरवरी जिने, मखमली

पडदे, सोने, चांदी, पाचूच्या मौल्यवान वस्तू आणि बादशाही फर्निचर यांनी हा फालुकनामा खचून भरला आहे. निजामाचे शाही पाहुणे या प्रासादात राहतात. इंग्लंडचे राजे पाचवे जॉर्ज, प्रिन्स ऑफ वेल्स, लॉर्ड माउंटबॅटन, गव्हर्नर जनरल राजगोपालाचारी, राष्ट्राध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद अशा श्रेष्ठ दर्जाच्या व्यक्ती या राजवाड्यात राहून गेल्या आहेत. या वाड्यात एक रोझवुडचे टेबल इतके मोठे आहे की, त्यावर शंभर लोकांना मेजवानी देता येईल. स्टेन ग्लासच्या काचा, कटग्लासचे प्याले इत्यादींमुळे या वाड्यातील वातावरण व्हिक्टोरियन काळातील इंग्लिश राजवाड्यासारखे झाले आहे. जगातील अनेक देशांतील उत्तमोत्तम कलात्मक वस्तूंचा या राजवाड्यातील संग्रह कलाप्रेमींच्या डोळ्यांचे पारणे फेडतो.

❑

# ४. प्रेक्षणीय हैद्राबाद

हैद्राबादमधील प्रेक्षणीय स्थळात सालारजंग वस्तुसंग्रहालय हे अग्रगण्य आहे. पूर्वी या संग्रहालयाची व्यवस्था स्थानिक अधिकाऱ्यांकडे होती, पण नंतर पार्लमेंटने विधेयक संमत करून सालारजंग म्युझियम ही राष्ट्रीय महत्त्वाची संस्था ठरवली. सालारजंग हे हैद्राबादच्या निजामाचे प्रमुख सरदार. या घराण्यातील पाच सालारजंग निजामाचे पंतप्रधान झाले. त्यापैकी तिसरे सालारजंग हे कलाप्रेमी होते. अगदी तरुणपणी म्हणजे वयाच्या अवघ्या तेविसाव्या वर्षी ते निजामाचे पंतप्रधान झाले, पण अडीच वर्षांनीच त्यांनी या पदाचा राजीनामा दिला आणि कलात्मक वस्तू जमविण्याच्या आपल्या छंदात आपले उर्वरित आयुष्य व्यतीत केले. त्यांची कलासक्ती आणि ध्येयनिष्ठा यांचेच फळ म्हणजे हैद्राबादचे सालारजंग वस्तुसंग्रहालय. ते स्वतः साहित्यिकही होते.

सालारजंग यांनी देशोदेशीहून जमविलेल्या श्रेष्ठ कलात्मक वस्तूंचा संग्रह दिवाणदेवडी या त्यांच्या वाड्यात १९५१ मध्ये वस्तुसंग्रहालय म्हणून जाहीर करण्यात आला. १९६१ साली भारतीय संसदेने तो राष्ट्रीय संस्था म्हणून मान्य करणारा ठराव केला. मुसी नदीच्या काठी आजच्या वास्तूत हे संग्रहालय १९६८ साली आणले गेले. महाराष्ट्राचे एक राज्यपाल अलीयावर जंग हे याच सालारजंग घराण्यातील होते. महाराष्ट्राचे दुसरे राज्यपाल लतीफ यांच्या पत्नी याही याच परिवारातील आहेत. या वस्तुसंग्रहालयात तळमजल्यावरचे पहिले दालन काउंटस् गॅलरी हे आहे. त्यात तिसरे सालारजंग यांच्या परिवारातील प्रमुख व्यक्तींची मोठी तैलचित्रे आहेत. सालारजंग यांना ठिकठिकाणी मिळालेली स्मृतिचिन्हे येथे पाहावयास मिळतात. १८७६ साली एडवर्ड अल्बर्ट यांनी दिलेले चांदीचे मोठे पात्र, १८७७ च्या दिल्ली दरबारमध्ये उपस्थिती ठेवल्याबद्दल मिळालेले उर्दू मानचिन्ह, कैसर-ई-हिंद हा किताब इत्यादींचा यात समावेश आहे. सालारजंग यांच्या शालेय जीवनाशी निगडित अशा काही वस्तूही (पुस्तके, वह्या वगैरे) येथे आहेत. कट ग्लासचे पेले व इतर वस्तू आकर्षक आहेत.

त्याशिवाय शाही डायनिंग टेबल व खुर्च्या, चहाचे सेटस् वगैरे आहेत.

'इंडियन कलेक्शन्स' नावाचे जे दालन आहे त्यात दगडाच्या व ब्राँझच्या मूर्ती, चांदीच्या कलात्मक वस्तू, जरीचे व इतर कापड, तैलचित्रे, हस्तिदंती वस्तू, लाकडाचे कोरीव काम असलेल्या वस्तू इत्यादींचा समावेश आहे. उत्साही गाईड या सर्व वस्तूंचा बारीकसारीक तपशील सांगत असतो. भारतीय वस्तूंच्या या दालनात एक शेषशायी विष्णूची मूर्ती आहे. ती तेराव्या शतकातली आहे. कलमकारी नावाची आंध्रची विशिष्ट शैली आहे. या शैलीतील चित्रे काढलेली वस्त्रे येथे पाहायला मिळतात. नागार्जुन कोंडा येथे केलेल्या उत्खननात सापडलेल्या काही मूर्ती दुसऱ्या शतकातील इक्ष्वाकु वंशाच्या राजाच्या कारकीर्दीतील आहेत. विष्णू, श्रीकृष्ण, बलराम, भूदेवी इत्यादींच्या पल्लव व चोला कालातील ब्राँझच्या सुबक मूर्ती या दालनात आहेत. त्याशिवाय पडद्यावर रंगविलेली चित्रे, रासक्रीडेची चित्रे, पिचवारी शैलीतील चित्रकलेचे नमुने या दालनात आपले लक्ष वेधून घेतात. म्हैसूर राज्यातून आणलेल्या पार्श्वनाथ व महावीर यांच्या काळ्या दगडातील मूर्ती बाराव्या शतकातील जैन मूर्तिकलेचे उत्कृष्ट नमुने आहेत.

चौथ्या दालनात एक भव्य गरूडमूर्ती आहे. ती अठराव्या शतकातील आहे. या कक्षाचे नाव 'मायनर आर्टस् ऑफ साऊथ इंडिया' असे आहे, पण एवढ्या मोठ्या मूर्तीला मायनर आर्ट विभागात का टाकले आहे ते समजत नाही. या विभागात ब्राँझ आणि हस्तिदंताच्या वस्तू आहेत. दक्षिणेत रथकार किंवा रथ तयार करणारे खास लोक होते. त्यांनी तयार केलेले अनेक लाकडी रथ या विभागात आहेत. काही दगडी रथही येथे आहेत. मंदिरांची कलाकुसर म्हणून देवदेवता, यक्ष, किन्नर आणि हत्ती, घोडे वगैरे प्राणी दगडात कोरण्याची कला दक्षिण भारतात अत्युच्च कोटीला गेली होती, तिचे प्रत्यंतर या कक्षात येते. सुती, रेशमी व जरीच्या कापडाबद्दल भारत महोंजोदरो कालापासून जगप्रसिद्ध आहे. सालारजंग वस्तुसंग्रहालयातील सहाव्या दालनात याची प्रचीती येते. या विभागात उत्कृष्ट नक्षीच्या साड्या, शाली, अंगरखे, डगले, चोळ्या इत्यादी प्रेक्षणीय आहेत. विशेषतः स्त्रियांना हे दालन खास आकर्षक वाटेल. अठराव्या व एकोणिसाव्या शतकातील काश्मिरी शाली उल्लेखनीय आहेत.

इतर काही दालनात हस्तिदंती वस्तू असल्या तरी येथे हस्तिदंती वस्तूंसाठी एक खास दालन आहे, ते पाहण्यासारखे आहे. हस्तिदंतावर अत्यंत बारीक व रेखीव नक्षी व मूर्ती कोरलेल्या येथे पाहावयास सापडतात. हस्तिदंताची चटई तर आपले चटकन लक्ष वेधून घेते. टेबले, खुर्च्या असे हस्तिदंताचे मोठे फर्निचरही मोहक आहे. म्हैसूरचा एक हस्तिदंती दिवा अतिशय आकर्षक असून तो एकोणिसाव्या शतकातील आहे. चीन व जपानमधील हस्तिदंती बुद्ध मूर्तीही येथे आहेत.

चित्रकलेच्या दालनात राजा रविवर्म्याची दोन चित्रे आहेत. 'केरळ ब्यूटी' आणि 'स्टोलन इंटरव्ह्यू' ही त्याची चित्रे रविवर्म्याच्या खास शैलीची प्रातिनिधिक आहेत. नंदलाल बोस, अवनिंद्रनाथ टागोर, विनोद मुकर्जी इत्यादींची चित्रे बंगाली शैलीची वैशिष्ट्ये दाखवितात. त्याशिवाय आधुनिक चित्रकारांपैकी बेंद्रे, हेब्बर, हुसेन, के. एस. कुलकर्णी इत्यादींच्या उत्तम चित्रकलेचे नमुनेही या दालनात आहेत. मिनिएचर पेंटिंग्जचे वेगळे दालन आहे. त्यात चौदाव्या व पंधराव्या शतकातील सूक्ष्म चित्रे आहेत. काही जैन व काही राजस्थानी शैलीतील मिनिएचर्स विशेष लक्षात राहतात. जहांगीर व शहाजहान यांना या प्रकारच्या चित्रकलेत विशेष रस होता. त्यांच्या काळातील मुस्लिम व फारशी शैलीतील चित्रेही खास उल्लेखनीय आहेत. युरोपियन आर्ट गॅलरी या विभागात इंग्लंड, इटाली, फ्रान्स इत्यादी देशांतील नामांकित चित्रकारांच्या गाजलेल्या कलाकृती आहेत. त्यापैकी काही मूळ तर काही प्रतिकृती आहेत. अनेक पाश्चात्य पुतळेही या विभागात आहेत. त्यात बेनझोनी या इटालियन शिल्पकाराने तयार केलेली टिबेकांची मूर्ती आहे. आमच्या गाईडने सांगितले की ही मूर्ती सालारजंग यांनी १८७६ साली पंधरा हजार पौंडांना विकत घेतली होती.

सालारजंग वस्तुसंग्रहालयातील एक प्रसिद्ध मूर्ती म्हणजे एकाच अखंड लाकडात कोरलेली पूर्ण पुरुष उंचीची दुहेरी मूर्ती. समोरच्या बाजूने ती मेफिस्टोफेलिसची दिसते. त्या मूर्तीच्या मागे एक आरसा ठेवलेला आहे. त्या आरशात त्याच मूर्तीची मागची बाजू ही विनयाने लावलेल्या मार्गारिटची दिसते. एकतिसाव्या दालनात शस्त्रास्त्रे आहेत. शहाजहान, औरंगजेब, बादशहा इत्यादींच्या काळातील तलवारी, ढाली, चिलखते, जंबिये वगैरे येथे आहेत. सालारजंग यांची रत्नजडित तलवारही येथे आहे.

तसेच टिपू सुलतानाचे पिस्तुलही आहे. जहांगीरचा खंजीर आणि नूरजहानची फळे कापण्याची सुरी या विभागात पाहता येते. तेहतीस व चौतीस क्रमांकांची दालने नेपाळ, तिबेट, ब्रम्हदेश, चीन, जपान, कोरिया इत्यादी देशांतील वस्तूंसाठी राखून ठेवण्यात आली आहेत. मध्यपूर्वेच्या विभागात पर्शियन गालिचे आहेत. त्यात १५८६ चा शहा अब्बासच्या कारकीर्दीतील मोठा व उत्तम नक्षीचा गालिचा विशेष लक्षात राहण्यासारखा आहे. चांदी व बिद्रीच्या भांड्यांच्या दालनात चांदीवर केलेली उत्कृष्ट नक्षी पाहावयास मिळते. बिद्री येथील कलात्मक वस्तू प्रसिद्धच आहेत. त्यांचे काही निवडक नमुने या कक्षात आहेत. त्याशिवाय इजिप्त व सीरियाचा विभाग, अरेबिक व पर्शियन हस्तलिखितांचा विभाग इत्यादी समृद्ध विभाग पाहण्यात चार तास सहज चांगले जातात.

या वस्तुसंग्रहालयातील एक प्रसिद्ध वस्तू म्हणजे ब्रिटिश ब्रॅकरे मोठे घड्याळ. एक पुरुषाहून अधिक उंचीच्या या घड्याळात अशी यांत्रिक व्यवस्था आहे की दर तासाला त्याच्या वरचा भाग उघडतो, त्यातून एक इसम हातोडा घेऊन येतो आणि जेवढे वाजले असतील तितके ठोके मारून तो परत आत जातो. दर तासाच्या ठोक्याच्या वेळी हे घड्याळ पाहण्यास प्रेक्षकांची तुफान गर्दी जमते. दरसाल सुमारे दहा लाख लोक या वस्तुसंग्रहालयास भेट देतात.

निजामांचे विलासी जीवन आणि त्यांच्या प्रजेचे कंगाल जीवन यांचे एक विचित्र मिश्रण या शहरात आहे. निजाम व त्याचे अमीर-उमराव हे विलासाच्या एका टोकाला आणि आपल्या श्रमातून त्यांचे ऐषआरामी जीवन चालविणाऱ्या श्रमिक, भुकेल्या सामान्य जनांचे जीवन दुसऱ्या टोकाला असा हा प्रकार आहे. एक पोहण्याचे तलाव असणाऱ्या पंचतारांकित बादशाही हॉटेलापासून रस्त्याच्या कडेला फूटपाथवर शेगडी पेटवून पन्नास पैशांत काचेच्या ग्लासातून चहा देणाऱ्या फेरीवाल्यापर्यंत सारे प्रकार इथे आढळतात. भव्य मशिदी, उंच मनोरे, मोडकळीस आलेल्या जुन्या-पु ण्या ऐतिहासिक वास्तू, उस्मानिया विद्यापीठासारखी भव्य, पांढऱ्या दगडाची, अवाढव्य, आडवी इमारत, नदीजवळच्या सखल भागातील झोपडपट्टी, उघडे बकाल नाले, ऑटो व सायकल रिक्षांची असह्य गर्दी, वातानुकूलित परकीय बनावटीच्या गुळगुळीत लांबलचक

मोटारी यांचा एक प्रचंड गोपालकाला म्हणजे हैद्राबाद. चित्रपटवेड्या रसिकांनी झुम्मड केलेल्या चित्रपटगृहांची रेलचेल आणि गच्च भरलेली व्हिडीओ पार्लर्स आणि कर्कश किंचाळणाऱ्या ट्रान्झिस्टर्स-कॅसेटस्. उग्र वासांची मुसलमानी अत्तरे आणि सकाळ-संध्याकाळी मशिदीतून येणारे प्रार्थनांचे उच्चरव. मुसा नदीच्या काठची बकाल वस्ती आणि शहरात सर्वत्र हवेत पसरलेली धूळ.

हैद्राबाद हे एक शहर नाही. शिकंदराबाद-हैद्राबाद असे हे जुळे शहर आहे. खरे तर ही दोन्ही शहरे गोवळकोंडा राजधानीतून विकसित झाली. तेव्हा हैद्राबादचा तलास घेण्यापूर्वी गोवळकोंड्याचा मागोवा घेतला पाहिजे. हैद्राबादपासून अकरा किलोमीटर्सवर गोवळकोंडा हा प्रसिद्ध किल्ला आहे. त्याचे जुने नाव मानकल असे होते. सुलतान महंमद शहा बहामनी यांच्या कारकीर्दीच्या काळात वरंगळच्या काकतीय वंशातील राजा गणपतीने बाराव्या शतकात हा भव्य आणि भक्कम किल्ला बांधला. संरक्षणाच्या दृष्टीने परिपूर्ण असे भारतात जे काही किल्ले आहेत, त्यात गोवळकोंड्याचा समावेश होतो. गोल्ल (गुराखी) आणि कोंडा (पहाड) या दोन शब्दांपासून गोवळकोंडा हा शब्द बनला आहे. ज्या पहाडावर गुराखी आपली गुरे चारीत होते तो पहाड असा त्याचा अर्थ आहे. काकतीय राजा कृष्णदेव याने १३६३ साली बिदरच्या बहामनी वंशातील मोहंमद शहा याला हा किल्ला एका करारान्वये दिला. मोहंमद शहाने या किल्ल्याचे नाव मोहंमदनगर असे ठेवले. मोहंमद शहांच्या निधनानंतर पाच सुभेदार स्वतंत्र झाले आणि बहामनी राज्य पाच भागांत विभागले गेले. गोवळकोंड्याचा सुभेदार सुलतान कुली यानेही स्वातंत्र्य पुकारले आणि कुतूबशाही वंश इ. स. १५१८ मध्ये प्रस्थापित केला. त्यानंतरच्या शंभर वर्षांत गोवळकोंड्याचे सात सुलतान झाले.

गोवळकोंडा किल्ल्यावरची वस्ती वाढू लागली, तेव्हा साहजिकच राहण्यासाठी जागा अपुरी पडू लागली. किल्ला व राजधानी म्हटल्यावर घोडे, हत्ती, तोफा, लष्कर, बाजारबुणगे असा प्रचंड विस्तार आलाच. या वाढत्या वस्तीसाठी जागेचा शोध घेत असतानाच चौथा सुलतान महंमद कुली याला हैद्राबाद सापडले. मुसा नदीवरचे हे गाव तेव्हा चिंचलम हे खेडे होते. त्या बाजूला महंमद शिकारीसाठी गेला, तेव्हा गर्द हिरव्या झाडांच्या

कोंदणात त्याला एक रूपसुंदर नर्तकी दिसली. तो तिच्या प्रेमात पडला. तिचे नाव भाग्यमती होते व ती हिंदू होती. महंमद शहा तिला भेटण्यासाठी वारंवार चिंचलम येथे येऊ लागला आणि मग तेथेच आपली राजधानी करावी, असे त्याला वाटले. त्याने भाग्यमतीशी विवाह केला आणि चिंचलमचे नाव बदलून भाग्यनगर असे केले. हिने मुसलमान धर्माचा स्वीकार केल्यावर महंमद शहाने तिचे नाव हैदर महल असे ठेवले आणि राजधानीचे नाव हैद्राबाद झाले. कुतूबशाही वंशातील सुलतानांनी १७० वर्षे राज्य केले. पहिल्या तीन सुलतानांनी गोवळकोंडा किल्ल्याचे तट मातीचे होते ते काढून त्याऐवजी बळकट दगडी तट व बुरूज बांधले.

गोवळकोंड्याची व्यापाराबद्दलची ख्याती बाराव्या व तेराव्या शतकांपासून होती. जगप्रसिद्ध प्रवासी मार्कोपोलो याने इ. स. १२९२ साली गोवळकोंड्याला भेट देऊन त्यावर लिहिले आहे, पण गोवळकोंड्याला राजेशाही वैभव प्राप्त झाले, ते मात्र कुली कुतूब अलमुल्कच्या कारकीर्दीपासून. अबदुल्ला कुतूबशहा हा गोवळकोंड्याचा सहावा सुलतान होता. इ. स. १६५६ मध्ये औरंगजेबने गोवळकोंड्यावर पहिली स्वारी केली, पण तीत त्याला यश मिळाले नाही. गोवळकोंड्याचा सातवा सुलतान तानाशाहा याने औरंगजेबविरुद्ध फळी उभारण्याच्या प्रयत्नास शिवाजी महाराजांना बोलावले होते. त्या निमंत्रणाचा स्वीकार करून शिवाजी महाराजांनी गोवळकोंड्याला भेटही दिली होती. अब्दुल हसन तानाशाहा हा गोवळकोंड्यावर राज्य करीत असतानाच औरंगजेबाने १६७७ साली पुन्हा स्वारी करून किल्ल्याला आठ महिने वेढा दिला. तरीही तानाशाहा शरण येईना. तेव्हा औरंगजेबने किल्लेदाराला आमिष दाखवून फितूर करून घेतले आणि किल्ल्याचा दरवाजा उघडायला लावले. औरंगजेबच्या सैन्याने तानाशाहाचा पराभव करून त्याला अटक केली. पुढे तो कारावासातच निधन पावला.

मंहमद कुलीच्या कारकीर्दीत मुसा नदीवर मोठा पूल बांधण्यात येऊन गोवळकोंड्याचा विकास हैद्राबादमध्ये होऊ लागला. १५९१ साली हैद्राबादची राजधानी म्हणून विकास करण्याच्या योजना अमलात आल्या. चारमिनार हे या राजधानीचे मध्यवर्ती केंद्र होते. तरीही एक दुर्गम किल्ला म्हणून गोवळकोंड्याचे महत्त्व संरक्षणाच्या दृष्टीने कमी झाले नाही. या

किल्ल्याचा घेर सात मैल असून त्याला ५४ फूट उंचीची दगडी भिंत आणि नऊ प्रवेशद्वारे होती. तसेच किल्ल्यावरून तोफा डागण्यासाठी ८७ बुलंद बुरूजही होते. त्यापैकी काहींची आता पडझड झाली आहे. किल्ल्याच्या मुख्य प्रवेशद्वाराला बाला हिसार असे नाव आहे. हा किल्ला लांबून पाहिल्यावरही त्याची आपल्यावर छाप पडते. कारण तो जमिनीपासून चारशे फूट उंचावरील ग्रॅनाईटच्या एका टेकडीवर उभा आहे. किल्ल्याभोवती खोल असा खंदक आहे. बाहेरच्या बाजूला फत्ते दरवाजा किंवा विजयी दरवाजा आहे. त्यानंतर सुमारे हजार वारावर बाला हिसार दरवाजा आहे. टेकडीच्या निम्म्या चढावावर तिसरी भिंत किंवा तट आहे. त्या भिंतीपलीकडे किल्ल्याचा सर्वात जुना भाग आहे.

साउंड गेट या नावाचा जो दरवाजा आहे, त्या गेटजवळ टाळी वाजवली तर पाचशे फुटांवर असलेल्या दरबार हॉलपर्यंत तिचा आवाज जातो. आजही आपला गाईड या टाळीचे प्रात्यक्षिक करून दाखवतो. संकटकाळी सुलतानाला सूचना देण्यासाठी या टाळीचा उपयोग करण्यात येत असे. तसेच दरबार हॉलमध्ये टाळी वाजवली तर तिचा आवाज सात किलोमीटर्स लांब जातो. प्रवेशद्वाराजवळ जी प्रचंड तोफ दिसते, ती इंग्लंडची राणी व्हिक्टोरिया हिने १८७३ साली निजामाला भेट म्हणून दिली होती. बाला हिसार गेटवर जी नक्षी आहे, तिच्यात हिंदू पुराणातले प्राणी दाखविले आहेत. त्यावरून या दरवाजाच्या बांधकामात हिंदूंचा वाटा होता हे स्पष्ट दिसते.

राणीने नजर केलेल्या तोफेवर तिचा मोनोग्रॅम आहे. पन्नास ते सत्तर किलो वजनाचे गोळे या तोफेतून फेकले जात असत. तसे दगडी गोळे आजही तेथे दिसतात. जवळच शस्त्रागार आहे. ही इमारत तिच्या अनेक कमानींमुळे लक्षात राहते. शस्त्रागारानजीक उंटांचे तबेले आहेत. तसेच येथे दोन हौद आहेत, त्यापैकी एकात गरम व दुसऱ्यात थंड पाणी ठेवीत असत. कुतूबशाही घराण्यातील लोकांना निधनानंतर त्यांचे दफन करण्यापूर्वी येथे स्नान घालण्याची पद्धत होती.

नगिना बाग नावाची बाग आहे, ती अब्दुल रझाक लारी या सुलतानाच्या सेनापतीच्या लढाईशी संलग्न आहे. औरंगजेबचे सैन्य किल्लेदाराच्या विश्वासघातामुळे किल्ल्यात शिरले, तेव्हा अब्दुल रझाक लारी

अत्यंत शौर्याने लढला व तेथे निधन पावला. त्याच्या अंगावर अनंत जखमा झाल्या होत्या. त्यांची गणती करता येत नव्हती म्हणून या उद्यानाला नगिना हे नाव पडले. (न गिना = नगिना). या बागेजवळच शाही वाडा आहे. अर्थात आज तो भग्नावस्थेत आहे. हा भाग म्हणजे गोवळकोंड्याचा विशेष उत्सुकता वाढविणारा भाग आहे. जनानखाना व सराई यातील कलाकुसर प्रेक्षणीय आहे. मोठमोठी दालने, दिवाणखाने, कारंजी यांची कलात्मकता व वैभव त्या काळच्या बादशाही जीवनाची आजही कल्पना देतात. हा भाग इतका कलात्मक व समृद्ध आहे की साधे जीवन जगणारा औरंगजेब इथे राहायला तयार झाला नाही. त्याला ही व्यर्थ चैन वाटली. त्याने गोवळकोंड्यावरच्या मुक्कामात एका साध्या इमारतीत तळ ठोकला होता. या राजवाड्याच्या वैभवाच्या काळात या ठिकाणी जमिनीवर उंची पर्शियन गालिचे व छतावर भव्य झुंबरे होती. तेव्हा त्याची शोभा अनेक पटीने वाढलेली असेल यात शंका नाही.

हबशी कमानी नावाच्या ज्या दोन कमानी बाला हिसार दरवाजाजवळ आहेत, त्यातून लंगरगृहाकडे रस्ता जातो. या कमानीवरच्या खोल्यात हबशी (अबिसीनियांचे) चौकीदार पाहऱ्यासाठी ठेवलेले होते. किल्ल्यावर रामदास कोठी या नावाची जी भक्कम दगडी इमारत आहे, ते त्या वेळचे कारागृह. मदण्णा हा त्या काळी मंत्री होता. त्याचा पुतण्या रामदास हा तहसीलदार म्हणून काम करीत असल्याने त्याने सरकारी रकमेचा अपहार केला व त्यातून मंदिराचा जीर्णोद्धार केला. त्याने ही रक्कम जरी चांगल्या कार्यासाठी वापरली असली, तरी अपहार तो अपहारच. त्याला अटक झाली आणि या तुरुंगात बारा वर्षे ठेवण्यात आले. तशाही अवस्थेत रामदासाने भिंतीवर राम, लक्ष्मण व हनुमान यांच्या मूर्ती कोरल्या. बारुदकोठी नावाची जी इमारत आहे ती दारूगोळा ठेवण्याचे कोठार होते. टेकडीवर अगदी वरच्या टोकाला बारादारी ही दोन मजली इमारत आहे. ती चढून जाण्यास ३६० पायऱ्या आहेत. 'तानाशाहा की गद्दी' या नावाने ही इमारत पूर्वी ओळखली जात असे. बारादारीची इमारत समुद्रसपाटीपासून बावीसशे फूट उंच असल्याने येथे शीतल हवा वाहते. तसेच आसपासचे फार रमणीय असे विहंगम दृश्य दिसते. पंचवीस ते तीस मैलांच्या परिघाचे सुभग दर्शन येथून घडते व किल्ला चढून आल्याच्या श्रमाचे सार्थक होते.

शिकंदराबाद-हैद्राबादमधील मशिदी, मिनार, आधुनिक उंच इमारती, मीर आलम तलाव, उस्मानिया विद्यापीठ यांच्या चिमुकल्या प्रतिकृती टेबलावर मांडून ठेवल्यासारखे हे दृश्य दिसते.



## गोवळकोंड्याचा किल्ला

गोवळकोंडा किल्ल्याला जे अनेक दरवाजे होते, त्यापैकी एका दरवाजातून मक्केला गेलेले यात्रेकरू येत असत व त्यांचे तेथे भव्य स्वागत होत असे. या दरवाजाला मक्का दरवाजा असे नाव होते. बंजारा दरवाजातून भटके विमुक्त लोक येत असत. दरवाजातसुद्धा वर्णभेद असे. पटेल मुसा नावाच्या बुरुजावर सोळा फूट लांबीची जी तोफ दिसते ती औरंगजेबाने येथे आणली होती. या तोफेवर कुतूबशहाचे फर्मान तेलगू व पर्शियन भाषेत कोरलेले आहे. किल्ल्याला दुर्गकुंडातून पाणीपुरवठा होई. त्यासाठी दगडी पन्हाळी व नळ यांची उत्तम कार्यक्षम व्यवस्था होती. किल्ल्यावर जी जामा मशीद आहे ती हबशी कमानीजवळ मध्यवर्ती भागात आहे. हिच्या कमानी पंधरा फूट उंचीच्या आहेत. ही जामा मशीद म्हणून ओळखली जाते. सुलतान कुली याने इ. स. १५१८ मध्ये ही मशीद बांधली. राजमहालाखाली एक विस्तीर्ण मैदान आहे. त्याला जिलुखाना-त-अली असे नाव आहे. कुतूबशाहीमध्ये राजवाड्यांच्या झरोक्यात राजा बसत असे आणि त्याचे सैन्य या मैदानात परेड घेऊन राजाला सलामी देत असे. अंबरखाना नावाची जी पडिक इमारत आहे, ती पूर्वीची शाही तिजोरी

होती. ती १६४२ साली बांधल्याचा शिलालेख तेथे आहे. अब्दुल कुतूबशहाच्या कारकीर्दीत ही इमारत बांधली गेली. इब्राहीम कुतूबशहाची मशीद येथून काही अंतरावर आहे. ती बरीचशी भग्नावस्थेत आहे, पण पूर्वीच्या तिच्या भव्यतेची त्या अवशेषावरूनही कल्पना येते.

या किल्ल्यावरच्या एका इमारतीचे नाव आहे 'अश्रूखाना'. मोहरमच्या दहा दिवसांत शोक करण्यासाठी या इमारतीचा वापर करण्यात येत असे. किल्ल्यापासून अर्ध्या किलो मीटरवर कुतूबशाही मकबरे आहेत. या वाटेवर कटोरा हौद नावाचा प्रचंड दगडी हौद आहे. हा जगातील सर्वात मोठा हौद आहे, असे गाईड सांगतो. इब्राहीम कुतूबशहाने इ. स. १५६० साली हा बांधला. त्याच्यासाठी हा हौद गुलाबपाण्याने भरला जात असे. इब्राहीम बागेतील मकबऱ्यावर देखणी नक्षी आहे. तसेच प्रत्येक मकबऱ्यावर सुलतानाचे नाव व इतर तपशील दिला आहे. चौथा सुलतान महंमद कुली कुतूबशहा याची मुलगी हयरा बक्षी बेगम हिचाही मकबरा येथे आहे. सहाव्या सुलतानाची हिंदू पत्नी प्रेमावती हिने पुढे मुसलमान धर्म स्वीकारला. तिचीही कबर या ठिकाणी आहे.

कुतूबशाही घराण्याच्या कारकीर्दीत गोवळकोंडा हे हिऱ्यांच्या खरेदी-विक्रीचे एक महत्त्वाचे जागतिक केंद्र होते. मात्र त्यावेळी या भागात हिऱ्यांच्या खाणी खोदल्या गेल्या नव्हत्या. पर्शियाहून आयात केलेल्या मोत्यांचाही येथे मोठ्या प्रमाणावर बाजार भरत असे. टॅव्हर्नियर या फ्रेंच प्रवाशाने १६४५ साली लिहिले आहे की गोवळकोंड्याजवळच्या कारवान या ठिकाणी हिऱ्याला पैलू पाडण्याच्या कामावर हजारो कारागीर काम करीत होते. कोहिनूर हा जगप्रसिद्ध हिरा कृष्णा नदीच्या किनारी असलेल्या कोल्लूर येथील खाणीत इ. स. १६५६ साली सापडला. सुलतान अली कुतूबशहाच्या कारकीर्दीत मीर जुमला याने कोहिनूर हा हिरा शहाजहान बादशहाला नजर केला. त्यावेळी कोहिनूरला पैलू पाडलेले नव्हते व त्याचे वजन ७८७ कॅरेट होते.

१६६५ साली टॅव्हर्नियरने औरंगजेबच्या जामदारखान्यात कोहिनूर हिरा पाहिला होता. महंमद शहाच्या कारकीर्दीत नादिर शहाने हा हिरा इराणला नेला. नादिर शहा इ. स. १७४७ साली निधन पावला. तेव्हा त्याचा नातू शहारुख याच्याकडे कोहिनूर हिरा गेला. त्याने काबूलच्या शहा अहमद

शहाला तो हिरा भेट म्हणून दिला. त्याच्याकडून वंश परंपरेने तो हिरा त्याचा मुलगा शहा झमन याच्याकडे आणि नंतर त्याचा भाऊ सुलतान सुझा याच्याकडे गेला.


इ. स. १८१२ साली झमन व सुझा हे सहकुटुंब लाहोरला गेले असता त्यांची आणि पंजाबचा शेवटचा राजा महाराज रणजितसिंग यांची भेट झाली. त्यांनी तो हिरा रणजितसिंग यांना भेट म्हणून दिला. १८३९ साली रणजितसिंग यांचे निधन झाले. त्यावेळी कोहिनूरची किंमत तज्ज्ञांनी दहा लाख स्टर्लिंग (सुमारे दोन कोटी रुपये) केली होती. ब्रिटिशांनी १८४९ साली पंजाब खालसा केला. त्यावेळी लॉर्ड लॉरेन्स याने कोहिनूर हिरा ताब्यात घेतला आणि तो राणी व्हिक्टोरियाला नजर केला हा हिरा अजूनही इंग्लंडच्या राजाच्या मुकुटात आहे. लंडनच्या भेटीत टॉवर ऑफ लंडनमध्ये तो सुरक्षित काचेच्या मागे ठेवलेला आहे. गोवळकोंडा येथील खाणीत निजाम डायमंड सापडला होता. तो २७७ कॅरेटचा होता. तसेच ग्रेट टेबल डायमंड आणि होप डायमंड हे जगप्रसिद्ध हिरे याच खाणीतील आहेत. चारमिनारच्या आसपास आजही मोत्यांचा मोठा व्यापार चालतो. मात्र हिरे व हिऱ्यांना पैलू पाडणे यांचे केंद्र आता गुजरातेत सुरत येथे गेले आहे.

आंध्र सरकारच्या माहिती-पुस्तिकेत हैद्राबादचा उल्लेख पूर्वेकडील बुडापेस्ट असा करण्यात आला आहे. शिकंदराबाद व हैद्राबाद यांच्यामध्ये असलेल्या हुसेन सागरला 'ब्ल्यू डॅन्यूब'ची उपमा त्याच पुस्तिकेत देण्यात आली आहे. हैद्राबाद हे 'कॉम्पोजिट' (संमिश्र) कल्चरचे शहर आहे, असेही म्हटले आहे. वास्तविक दिल्ली, मुंबई, कलकत्ता, मद्रास अशी भारतातील सर्व मोठी शहरे संमिश्र संस्कृतीचीच आहेत. कारण त्या शहरात व्यापार उदीम मोठ्या प्रमाणावर चालत असल्याने अनेक प्रांतांचे, धर्मांचे व पंथांचे लोक तेथे आकर्षिले जातात. हैद्राबाद म्हटले की आपल्याला निजाम आठवतो आणि चारमिनार ही प्रसिद्ध इमारत आठवते. हैद्राबाद हे चारशे वर्षांचे जुने शहर आहे. रोमच्या दोन हजार वर्षांच्या तुलनेने चारशे वर्षांचा इतिहास म्हणजे फार दीर्घ नव्हे. समुद्रसपाटीपासून १७७६ फूट उंचीच्या पठारावर हे शहर शंभर चौरस मैल पसरलेले आहे. मुसा नदीवर अनेक पूल बांधले असल्याने अशाच प्रकारच्या लंडन व पॅरिस या शहरांची आठवण येते. हैद्राबादची स्थापना कुली कुतूबशहा याने १५९१ साली केली. त्यापूर्वी

१५६२ मध्ये हुसेन शहा वाली याने हुसेन सागर हा तलाव बांधला होता.

सुलतान महंमद कुली हा गोवळकोंडाचा राजा कवीही होता. हैद्राबाद शहराची स्थापना करताना त्याने देवाची प्रार्थना केली, ''या शहरात शांतता आणि समृद्धी नांदो. सागरात अनेक प्रकारचे मासे राहतात. तसेच या शहरातही अनेक धर्मांचे व पंथांचे स्त्री-पुरुष सुखात राहावेत.'' त्याच्या या प्रार्थनेला देवाने साद दिली. या शहरात देशांतल्या सर्व भागांतून लोक आले. स्थानिक संस्कृतीत त्यांनी आपापल्या संस्कृतींची भर घातली. इतिहासातील अनेक प्रवाशांनी व बखरकारांनी या शहराची प्रशंसा केली आहे. औरंगजेबाच्या दरबारातील तवारीखकार महंमद साकी याने म्हटले आहे, ''स्वर्गीय शांतता आणि ऐहिक वैभव यांचा हा मनोहर संगम आहे. या शहराची लोकसंख्या कल्पनेपलीकडची आहे आणि येथील भव्य इमारती आपली मती गुंग करतात. येथील फुले आणि वृक्ष यांची तुलना हिरे आणि पाचू यांच्याशीच करता येईल.'' कुतूबशहाच्या कारकीर्दीत जगप्रसिद्ध फ्रेंच प्रवासी टॅव्हर्नियर याने हैद्राबादला भेट देऊन लिहिले आहे, ''या शहरातील सरदार व दरकदार रोज गस्त घालतात. या सरदारांच्या हाताखाली प्रत्येकी पाच ते सहा हजार घोडेस्वार असतात. तसेच दहा-बारा हत्तीही त्यांच्या अखत्यारीखाली असतात. हत्तींनंतर उंटांचे स्वार येतात. प्रत्येक सरदाराकडे तीस ते चाळीस उंट असतात. त्यानंतर घोडेस्वार व पायदळ असते.'' विल्यम मेथॉड या युरोपियन प्रवाशाने तीनशे वर्षांपूर्वी हैद्राबादचे असे वर्णन केले आहे, ''आरोग्यदायक हवा आणि मुबलक पाणी यामुळे हे भारतातील सर्वोत्कृष्ट शहर आहे.''

हैद्राबादवर सात निजामांनी राज्य केले. त्यांच्या कारकीर्दीतील हैद्राबाद हे भारतातील सर्वात मोठे संस्थान होते आणि निजाम हा जगातील सर्वात धनाढ्य माणूस आहे अशीही त्याची ख्याती होती. निजामांच्या काळात निजाम सागर, तुंगभद्रा तलाव, उस्मान सागर, हिमायत सागर अशा अनेक तलावांची बांधणी झाली. उस्मानिया विद्यापीठ निघाले. शिक्षणाचा प्रसार झाला. उर्दू भाषेला राजाश्रय मिळाला. इंग्लंड आणि स्कॉटलंड या दोन्हींच्या एकत्र क्षेत्रफळाइतके हैद्राबाद संस्थानचे क्षेत्रफळ होते. १ नोव्हेंबर १९५६ रोजी आंध्रची स्थापना झाल्यावर हैद्राबाद ही या नव्या राज्याची राजधानी झाली. लंडनचे प्रतीक बिग बेन, न्यूयॉर्कचे स्वातंत्र्यदेवतेचा



चारमिनार

पुतळा तसे चारमिनार हे हैद्राबादचे प्रतीक आहे. ही भव्य कलाकुसरीने समृद्ध असलेली इमारत महंमद कुली कुतूबशहा याने १५९१ साली बांधली. सुदैवाने आजही ही इमारत चारशे वर्षे ऊन, पाऊस, वारा यांचा मारा सहन करूनही सुस्थितीत आहे. पायाकडे ही इमारत प्रत्येक बाजूला वीस मीटर्स लांबीची आहे. या चौकोनी इमारतीच्या कमानी अकरा मीटर्स रुंदीच्या आहेत. त्यांची उंची जोत्यापासून वीस मीटर्स आहे. पायापासून चोवीस मीटर्सवर छत आहे. त्याहीवर वीस मीटर्स उंच मनोरे जातात. छताच्या पश्चिम बाजूला लहानशीच, पण अत्यंत सुंदर अशी मशीद आहे. मिनारांवरही उत्तम नक्षी कोरलेली आहे. मशिदीसमोरच्या उघड्या जागेवर लोक शुक्रवारी नमाज पढत असत. काही इतिहासकारांच्या मते शहरात पाणीपुरवठा करता यावा व चारमिनार इतक्या उंचीवरून तो करणे सुलभ होईल, अशा अंदाजाने त्याची बांधणी करण्यात आली होती. पण इतक्या उंचावर पाणी नेण्याची काही व्यवस्था येथे दिसत नाही. चारमिनारवरून हैद्राबाद शहराचे सुंदर विहंगम दृश्य पूर्वी दिसत असे. मी दोन वेळा ते पाहिलेही आहे, पण अलीकडे चारमिनारवर आतील जिन्याने चढून जाण्याची सवलत बंद करण्यात आली आहे.

चारमिनारजवळच तितकीच सुप्रसिद्ध असलेली जामी मशीद आहे. हैद्राबादमध्ये बांधली गेलेली ही पहिली मशीद. महंमद कुली कुतूबशहा याने ती १५८९ साली बांधली. त्यानंतर शिकंदर जा याने १८०३ साली या मशिदीचा जीर्णोद्धार केला. चारमिनारपासून शंभर यार्ड अंतरावर असलेली मक्का मशीद ही हैद्राबादमधील सर्वात मोठी मशीद आहे. मक्का येथील ग्रँड मॉस्कच्या धर्तीवर ही बांधली गेली आहे. सुलतान महंमद कुतूबशहा याने या मशिदीच्या बांधकामास सुरुवात केली, तेव्हा आठ हजार गवंडी व मजूर या कामावर होते. ही प्रचंड आकाराची मशीद बांधण्यास ७७ वर्षे लागली. मोगल बादशहा औरंगजेब याने १६९४ साली ती पूर्ण केली. या मशिदीचे प्रार्थना दालन २३ मीटर्स उंच, ६७ मीटर्स लांब आणि ५४ मीटर्स रुंद आहे. मशिदीच्या छताला १५ भव्य कमानींचा आधार आहे. या दालनाच्या दोन्ही टोकांना अष्टकोनी उंच स्तंभ आहेत. ते एकाच ग्रॅनाईट दगडातून खोदले असून त्यावर कमानींची गॅलरी आहे. भारतातील ही एक अत्यंत मोठी मशीद असून तिच्यात दहा हजार लोक एकाच वेळी प्रार्थना

करू शकतात.

या मशिदीच्या पायाभरणीच्या वेळी सुलतान महंमद कुतूबशहाने अनेक मौलवींना बोलाविले. त्याने सांगितले की ज्याने आतापर्यंत एकदाही प्रार्थना चुकवली नाही त्याने पुढे यावे म्हणजे त्याच्या हस्ते मशिदीची पायाभरणी होईल. एकही मौलवी, साधुसंत पुढे आला नाही, तेव्हा स्वतः कुतूबशहानेच पायाभरणी केली. कारण वयाच्या बाराव्या वर्षापासून त्याने एकही प्रार्थना चुकवली नव्हती. त्याने या मशिदीचे नाव 'बतुल अतिक' असे ठेवले. त्याने मक्केहून काही विटा आणून त्या या मशिदीच्या मध्यवर्ती कमानीत रचल्या असल्याचे सांगण्यात येते. या मशिदीच्या दक्षिणेस अतिक अली राजांच्या कबरी आहेत. या मशिदीच्या प्रांगणात एक काळ्या रंगाचा दगड आहे. त्या दगडावर जो कोणी बसेल तो हमखास पुन्हा हैद्राबादला भेट देतो अशी समजूत आहे. त्यामुळे हैद्राबाद शहर दाखविणारे गाईड प्रवाशांना या दगडावर बसवतात आणि पुढील बिदागीची तरतूद करतात !

चारमिनार परिसरातील प्रवाशांच्या कुतूहलाची आणखी एक बाब म्हणजे लाडबाजार. येथे विविध रंगांचे खडे, त्यांच्या बांगड्या, मोती, मोत्यांचे दागिने मिळतात. त्यामुळे महिला प्रवाशांचे हे एक खास आकर्षण आहे. हैद्राबाद हे पूर्वीपासून मोत्यांच्या बाजाराबद्दल प्रसिद्ध आहे. चीन, जपान व इतर अनेक देशांतून येथे किमती मोती येत. शहाजहानची राणी मुमताज हिला खास तिच्या डोळ्यांच्या रंगाच्याच मोत्यांच्या बांगड्या हव्या होत्या. त्या याच लाड बाजारातील नबाब अली व रजब अली या व्यापारी बंधूंनी पुरवल्या, तेव्हा शहाजहानने त्यांना जहागीर बक्षीस दिली. आजही लाड बाजारातील पाचशे दुकानांतून वर्षाला एक कोटी रुपयांच्या मोत्यांची व खड्यांच्या बांगड्यांची देशात व परदेशांत विक्री होते.


हैद्राबाद ही निजामी राजांची राजधानी असल्याने येथे मशिदी भरपूर आहेत. खैराटाबाद मशीद ही सुलतान महमंद कुतूबशहांची मुलगी मासाहेबा हिने आपल्या शिक्षकासाठी १६२० साली बांधली. या मशिदीच्या प्रवेशद्वारास तीन कलात्मक कमानी असून मनोऱ्यावरही उत्तम नक्षी काढलेली आहे. कुलसुमपुरा मशीद ही कुतूबशाही शैलीचा उत्कृष्ट नमुना आहे. मियाँमिश्क मशीद १६७८ साली मलीक मियाँमिश्क या अबिसीनियन वास्तुशिल्पकाराने बांधली. या मशिदीजवळच एक सराई आणि स्नानगृह

आहे. अशा अनेक मशिदी पाहून जर तुम्हाला त्यातील तोच-तोपणाचा कंटाळा आला असेल, तर फालुकनामा या निजामाच्या खास वाड्याचा परवाना मिळवा. तो सर्वसामान्य प्रवासी प्रेक्षकांना खुला नाही, पण खास कारणासाठी किंग कोठी या निजामाच्या निवास-कम-कचेरीतून परवाना मिळू शकतो. फालुक नामा याचा अर्थ 'स्वर्गातला तारा' असा असून तो बांधण्यात स्वर्गसुखे पृथ्वीवर आणावीत हाच उद्देश दिसतो. पैगामचा पाचवा अमीर नवाब विकार-उलमुल्क याने १८८३ साली हा वाडा बांधला. निजामाने तो १९०२ साली विकत घेऊन सर्व तऱ्हेचे ऐषआराम व उंची फर्निचर व इतर सोयी तेथे केल्या. दोन हजार फूट उंचीवरील टेकडीवर बांधलेला हा राजवाडा म्हणजे विलासातील अखेरचा शब्द ठरावा अशी निजामांची धारणा होती, पण दुर्दैवाने हा स्वर्गातला तारा अपयशी ठरला. विंचवासारखा आकार असलेल्या या राजवाड्याने अनेकांना नांगी मारली.

फालुकनामा राजवाडा ज्या इटालियन तज्ज्ञाने बांधला, तो मायदेशी जाण्यास निघाला असताना बोटीतच मरण पावला. ज्या विकार-उल-मुल्कने हा वाडा बांधला, त्याला विषयप्रयोग करण्यात आला. ज्या निजामाने हा वाडा विकत घेतला त्याला वाड्यातच अपघात होऊन त्याच्या मेंदूला जब्बर दुखापत झाली. दहा दिवस तो बेशुद्ध होता व नंतर निधन पावला. राजवाड्याचा हा पायगुण पाहून पुढील म्हणजे सातव्या निजामाने तेथे राहण्याचा विचार रद्द केला आणि केवळ बड्या पाहुण्यांच्या वास्तव्यासाठी तो राखून ठेवला. म्हणजे काही बरे-वाईट झाले, तर त्या पाहुण्यांचे होऊ दे, पण आपण शाबूत राहू. इंग्लंड राजे पाचवे जॉर्ज, त्यांची पत्नी मेरी, प्रिन्स ऑफ वेल्स, माउंटबॅटन, गव्हर्नर जनरल राजगोपालाचारी, राष्ट्राध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद असे बडे पाहुणे या फालुकनाम्यात वास्तव्य करून सुखरूप गेले आहेत. वाडा सांभाळण्याचा अवाढव्य खर्च परवडेनासा झाल्याने त्याचे राष्ट्रीय वस्तुसंग्रहालयात रूपांतर करून तो भारत सरकारच्या स्वाधीन करावा ही सूचना सध्या निजामाच्या विचाराधीन आहे.

इंग्लंडच्या राणीच्या विंडसर पॅलेसच्या धर्तीवर फालुकनामा बांधला गेला

आहे. स्टेन ग्लासच्या काचांमुळे आपण एखाद्या गॉथिक चर्चमध्ये आल्यासारखे वाटते, पण आतील विलासी व भारी फर्निचर, इटालियन मार्बल पुतळे व इतर शोभेच्या वस्तूंमुळे हे चर्च नसून शाही निवास आहे हे लगेच लक्षात येते. संगमरवरी जिने, लाकडी कोरीव काम केलेली टेबले व कपाटे, मखमली पडदे, कोरीव काम केलेले लेदर फर्निचर यांची आपल्यावर छाप पडते. डायनिंग सेट चांदीचा आहे. शिवाय सोने, चांदी, पाचू इत्यादींच्या किमती वस्तू मुबलक प्रमाणात आहेत. काही वर्षांपूर्वी येथील काही वस्तू चोरीला गेल्यापासून तेथील दक्षता वाढविण्यात आली आहे. शंभर लोकांना एकाच वेळी मेजवानी घेता येईल असे विस्तृत रोजवुडचे टेबल आणि बेल्जियम कट ग्लासेस यावरून या वाड्याच्या समृद्धीची कल्पना येते.



**बिर्ला मंदिर**

हैद्राबादमधील इतर प्रेक्षणीय इमारतींत आंध्र प्रदेश विधिमंडळ,

हायकोर्ट, हॉस्पिटल, सेंट्रल लायब्ररी, बिर्ला प्लॅनेटोरियम इत्यादींचा समावेश आहे. सुमारे तीनशे फूट उंचीच्या निलाद्री टेकडीवरील बिर्ला मंदिर ही आणखी एक प्रेक्षणीय वास्तू. हिला धार्मिक महत्त्व तर आहेच, पण त्याचबरोबर कलात्मक महत्त्वही आहे. बिर्ला यांनी दोन कोटी रुपये खर्चून बांधलेले हे पांढरे शुभ्र संगमरवरी व्यंकटेश्वर मंदिर त्याच्या स्वच्छतेमुळे व उत्कृष्ट कोरीव कामामुळे दीर्घकाल लक्षात राहते. हे मंदिर बांधण्यास दहा वर्षे लागली आणि त्याच्या उभारणीसाठी राजस्थानमधून सत्तर टन संगमरवरी दगड आणला होता. तिरूपती येथील बालाजीच्या मूर्तीसारखीच या मंदिरातील व्यंकटेश्वर मूर्ती आहे. बालाजी व व्यंकटेश्वर ही एकाच देवाची नावे आहेत. रात्रीच्या वेळी हे मंदिर प्रकाशमान करण्यात येते. तेव्हा ते अत्यंत सुंदर दिसते. लांबून तर ते एखाद्या परिकथेतील हिऱ्याप्रमाणे चमकताना दिसते.

आंध्र प्रदेश विधिमंडळाची कलात्मक इमारत ही मूळ टाऊन हॉल म्हणून १९१३ साली पूर्ण केली गेली. निजाम महेबूब खान यांच्या ४० व्या वाढदिवसानिमित्त नागरिकांनी निधी जमा करून १९०५ साली ही इमारत बांधली. ही बांधण्यास आठ वर्षे लागली. या इमारतीची शैली खास हैद्राबादची आहे. आंध्र प्रदेशच्या स्थापनेनंतर या इमारतीचा वापर विधिमंडळाच्या बैठकीसाठी व कचेरीसाठी करण्यात येऊ लागला. भारतातील बहुतेक मोठ्या शहरी प्राणीसंग्रहालये आहेत, पण हैद्राबाद येथील नेहरूपार्क हे प्राणीसंग्रहालय विशेष प्रेक्षणीय आहे. पांढरे वाघ हे दुर्मिळ प्राणी येथे मोठ्या कुंपणामागे मुक्त विहार करताना दिसतात. सोनेरी माकडेही वैशिष्ट्यपूर्ण आहेत. सिंह, हत्ती, अस्वल, उंट वगैरे इतर प्राणीसंग्रहालयात दिसणारे प्राणी येथेही आहेत, पण विविध रंगी पक्षी हे या संग्रहालयाचे खास आकर्षण आहे. निजामाचा मंत्री मीर आलम याने १८०६ साली हे संग्रहालय स्थापन केले. जवळच किशनबाग मंदिर आहे. राजा रघुराम खत्री याने १८२२ साली हे मंदिर बांधले. हे कृष्णाचे मंदिर आहे. या मंदिरांसाठी दरसाल आठ हजार रुपये उत्पन्न येणारी जहागीर निजामाने दिली आहे. हैद्राबादचा मलकापेट रेसकोर्स १८७९ साली सुरू झाला. जुलै ते ऑक्टोबर या काळात येथे अश्वशर्यती होतात. माळवा पॅलेस हा चारमिनारजवळील राजवाडा १८४५ साली राजाराम प्रसाद लालबहादूर

याने बांधला.

नेहरू प्राणीसंग्रहालयाजवळ मीर सागर हा तलाव आहे. दुसऱ्या सालारजंगचे आजोबा मीरा आलम याने सैन्याकडून १८०६ साली हा तलाव खोदून घेतला. त्यानंतर दोन वर्षांनी १८०८ साली मुसी नदीला अचानक व भयंकर मोठा पूर आला. त्यात वीस हजार घरे आणि हजारो लोकांचा नाश झाला. एका रात्रीत १७ इंच पाऊस पडला आणि मुसी नदीचे पाणी भराभर अकरा फूट चढले. हा हैद्राबाद शहरावर झालेला निसर्गाचा सर्वात मोठा आघात होता. निझामिया वेधशाळा आणि बिर्ला प्लॅनेटोरियम या विज्ञान क्षेत्रातील दोन संस्था हैद्राबादमध्ये व जवळपास आहेत. १९०१ साली नवाब झाफर जंग यांनी इंग्लंडहून १५ इंची दुर्बीण आणली. निजामाने या दुर्बिणीसह वेधशाळा स्थापन करण्याची परवानगी दिली. १९६८ मध्ये ही वेधशाळा रंगापूर येथे हलविण्यात येऊन हिची वाढ करण्यात आली. आता ही वेधशाळा उस्मानिया विद्यापीठाच्या नियंत्रणाखाली आहे. आशियातील सर्वात मोठी दुर्बीण या वेधशाळेत आहे. हवामानाचे अंदाज, आकाशनिरीक्षण अशी अनेक वैज्ञानिक कामे येथे होतात. स्वतःची वेधशाळा असलेले उस्मानिया विद्यापीठ हे भारतातील एकमेव विद्यापीठ आहे. बाग-ए-आम म्हणजे सार्वजनिक उद्यान हे १८६४ साली तयार करण्यात आलेले भव्य उद्यान म्हणजे हैद्राबादचे एक भूषण आहे. रेमंडची कबर आणि शिकंदराबाद येथील मडेकचर्च हीही प्रेक्षणीय स्थळे आहेत. सरूर नगर भागातील एका टेकडीवर तेवीस फूट उंचीचे ग्रॅनाईटचे स्मारक रेमंड म्हणून ओळखले जाते. मायकेल जोॲकिम मारी रेमंड हा निजामचा विश्वासू फ्रेंच सहकारी होता. तो युद्धतज्ज्ञ व साहसी प्रवासी होता. वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षी रेमंड हा पाँडेचरीस आला. तेथून तो हैद्राबादला आला व निजामचा विश्वासू लष्करी अधिकारी झाला. वयाच्या अवघ्या ४२ व्या वर्षी १७९८ साली रेमंड निधन पावला. त्याच्या स्मारकावर 'जे आर' एवढीच साधी अक्षरे कोरलेली आहेत.

उस्मानिया विद्यापीठ हे हैद्राबादचेच नव्हे, तर भारताचे एक भूषण आहे. उस्मानिया विद्यापीठ स्थापन करावे, असे फर्मान निजामाने १९१८ सालीच काढले. हे विद्यापीठ जगातील एक अत्यंत भव्य आणि महत्त्वाकांक्षी विद्यापीठ व्हावे, अशी निजामाची इच्छा होती. त्यासाठी

त्याने चौदाशे एकर जागा दिली. हैद्राबादचे दोन अग्रगण्य वास्तुशिल्प कलाकार नवाब जैन यार जंग आणि सय्यद अल्ली राझा यांना परदेशातील विद्यापीठांचा अभ्यास करण्यासाठी निजामने इंग्लंड, फ्रान्स, तुर्कस्थान, अमेरिका व जपानला पाठविले. त्यांनी जाफर या बेल्जियन वास्तुशिल्पकाराची या कामासाठी शिफारस केली. जाफर हा १९३३ साली भारतात आला. त्याने अनेक शहरांना भेट देऊन मुस्लिम वास्तुशिल्पकारीचा अभ्यास केला. हैद्राबादच्या संस्कृतीशी सुसंगत असा मुस्लिम वास्तुशिल्पकलेचा या विद्यापीठासाठी त्याने आराखडा तयार केला. १९३४ साली निजामच्या हस्ते कोनशिला समारंभ झाला. या विद्यापीठाच्या इमारतीसाठी पस्तीस हजार कुशल व अकुशल कर्मचारी काम करीत होते.

उस्मानिया विद्यापीठाची पहिली इमारत कॉलेज ऑफ आर्टस् अँड कॉमर्सची आहे. ग्रॅनाईटची ही भव्य इमारत म्हणजे उस्मानशाही वास्तुकलेचा उत्कृष्ट नमुना आहे. ही ग्रॅनाईटची भक्कम इमारत आहे. या इमारतीचा विशेष असा की तीत हिंदू, मुस्लिम, अरब, गोथिक व मूरिश शैलींचा संमिश्र उपयोग करण्यात आला आहे. १९३९ साली ही इमारत पूर्ण झाली व तिला चार लाख रुपये खर्च आला. त्यानंतर इतर शाखांच्या इमारती व टागोर प्रेक्षागृह यांची उभारणी झाली. मोठी क्रीडांगणे, उद्याने, भरपूर मोकळ्या जागा, यामुळे या विद्यापीठाचा आसमंत अतिशय मनोहर व आकर्षक झाला आहे. कला, विज्ञान, शिक्षण, कायदा, इंजिनियरिंग, वैद्यक, (पाश्चात्य, आयुर्वेदिक व युनानी), तंत्रशास्त्र इत्यादी बरोबरच इस्लामी संस्कृतीचा अभ्यास हे उस्मानिया विद्यापीठाचे एक वैशिष्ट्य आहे. रशियन, फ्रेंच, जर्मन इत्यादी परकीय भाषाही येथे शिकविल्या जातात. वृत्तपत्र व्यवसाय, इलेक्ट्रॉनिक्स, व्यवस्थापन, लष्करी तंत्रज्ञान, नाट्यशास्त्र इत्यादींचेही स्वतंत्र विभाग आहेत. या विद्यापीठाच्या नियंत्रणाखाली १७० महाविद्यालये आणि सव्वा लाख विद्यार्थी आहेत.


❑

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्र-प्रविष्ट ०९२
क्र. २८३०४
२५।३।९६
ग्रंथ शाखा

# ५. नागार्जुनसागर आणि वरंगळ

आंध्रमधील नागार्जुनसागर हे अनेक दृष्टींनी महत्त्वाचे स्थळ आहे. हैद्राबादपासून दीडशे किलो मीटर्स अंतरावर हे धरण आहे. सतराशे वर्षांपूर्वी येथे विजयपुरी नावाची संपन्न नगरी होती. ती इक्ष्वाकू राजांची राजधानी होती. आज या ठिकाणाजवळच ज़गातील सर्वात उंच असे मेसनरी धरण आहे. त्याचे नाव नागार्जुनसागर धरण. सव्वाशे मीटर्स उंच असलेले हे धरण, त्याच्या नजीकचा विस्तीर्ण जलाशय आणि धरणाच्या दरवाजातून धो धो वाहणारे अवाढव्य पाणी पाहून छाती धडधडून जाते. आचार्य नागार्जुन या बौद्ध धर्माच्या तपस्व्याच्या नावावरून या धरणाला नागार्जुन हे नाव दिले आहे. बौद्ध धर्मातील माध्यमिक पंथांचे ते पुरस्कर्ते होते. कृष्णा नदीवरील•हा जलविद्युत प्रकल्प भारतातील अशा प्रकारच्या जुन्या प्रकल्पांपैकी एक आहे. या धरणाजवळील एका ग्रॅनाईट स्तंभाच्या वरच्या टोकाला जो पूर्ण कुंभ आणि कमलपुष्प आहे, ते बौद्ध धर्माचे प्रतीक आहे, तसेच नागार्जुनाची प्रतिमाही येथे कोरली आहे. स्तंभाच्या चार बाजूंवर भारतातील किसान व बैलजोडीचे चित्र कोरले आहे. दहा डिसेंबर १९५५ रोजी पं. जवाहरलाल नेहरू यांनी या धरणाचा कोनशिला समारंभ केला, तेव्हा त्यांनी दिलेला संदेश येथे कोरला आहे. पं. नेहरू म्हणतात, ''नागार्जुनसागर धरणाचा हा पायाभरणी समारंभ हे मला एक पवित्र धार्मिक कृत्य वाटते. भारतातील मानवतेच्या मंदिराची ही कोनशिला आहे. भारतात सर्वत्र जी नवी मंदिरे आम्ही बांधणार आहोत, त्यांचे हे प्रतीक आहे.''

भारतातील अनेक नद्यांना पावसाळ्यात भयंकर पूर आल्याने अपरिमित मानवहानी व वित्तहानी होत असे, काही प्रमाणात अजूनही होते. पावसाळ्यात विनाशी होणाऱ्या या नद्या उन्हाळ्यात कोरड्या ठणठणीत पडत. म्हणून त्यांच्यावर धरणे घालून पाणी अडवून त्यांचे तीन प्रमुख उपयोग करण्यात आले. पाणी नियंत्रित केल्याने पुराने होणारे नुकसान टळले. या पाण्याचा उपयोग शेती व पिण्यासाठी वर्षभर होऊ लागला व या



नागार्जुनसागर व धरण

पाण्याच्या झोताच्या साहाय्याने वीज उत्पादन केली जाऊ लागली. नागार्जुनसागर हे या कल्पकतेचे उत्कृष्ट उदाहरण आहे. त्यांची साकल्याने कल्पना यावी म्हणून या धरणाची प्रतिकृती करण्यात आली असून ती मॉडेल रूममध्ये ठेवण्यात आली आहे. कृष्णा नदीच्या उगमापासून बाराशे किलो मीटर्स अंतरावर हे धरण बांधण्यात आले आहे. दोन उंचवट्यांमधून जेथे नदी वाहते, तेथे ह्या टेकड्यांच्या आधारावर धरण बांधले जाते, तसेच ते येथेही बांधण्यात आले आहे. हे धरण संपूर्णपणे दगडी आहे. पाच कोटी चाळीस लक्ष घनमीटर इतके अवाढव्य हे बांधकाम आहे. नदीच्या पात्राखाली चौदा मीटर या धरणाचा पाया खोदण्यात आला आहे. या धरणाची रुंदी पायाजवळ पंचाऐंशी मीटर असून वर ते निमुळते होत टोकाला त्याची रुंदी फक्त नऊ मीटर आहे. कारण टोकाला पाण्याचा दाब फार कमी असतो. उलट तळाला सर्व पाण्याचे वजन पडल्याने दाब फार मोठा असतो. पाणी साठविण्यासाठी धरणापासून मागे ऐंशी मीटर जागा आहे. भाक्रा धरणापेक्षा सत्तावीस टक्के अधिक पाणी नागार्जुनसागरमध्ये साठवले जाते. या जलाशयातून दोन कालवे काढण्यात आले असून त्यांच्या

साहाय्याने आंध्रप्रदेशमधील पंधरावीस लक्ष हेक्टर जमिनीला पाणी मिळते.

कृष्णा नदीवर या ठिकाणी धरण बांधावे ही कल्पना नवी नाही. १९०३ सालीच ही योजना मांडण्यात आली होती, पण तिला लागणारा अफाट खर्च करणे त्या वेळी शक्य नव्हते. भारत सरकारचे मंत्री डॉ. के. एल. राव यांनी या योजनेला पुन्हा चालना दिली. १९५३ साली नवा अंदाज करण्यात आला आणि तो केंद्र सरकारने मंजूर करून १९५५ साली प. नेहरूंच्या हस्ते पायाभरणी झाली. चौदा वर्षांनी १२५ मीटर्स उंचीचे हे महत्त्वाकांक्षी धरण बांधून झाल्यावर आता त्याच्या जलाशयात साडेअकरा दशलक्ष घनमीटर पाणी राहू शकते. या क्षमतेचा हा जगातील तिसऱ्या क्रमांकाचा जलाशय असून कोयनेच्या जलाशयाच्या चौपट ही क्षमता आहे. या धरणातून पाणी सोडण्याचा बोगदा १२६० मीटर लांब आणि आठ मीटर व्यासाचा आहे. पं. नेहरू कालवा या नावाने ओळखणाऱ्या या बोगद्यातून दर सेकंदाला सहाशे घनमीटर पाणी सोडण्यात येते.

धरण पाहण्यासाठी एका लिफ्टमधून धरणाच्या पहिल्या टप्प्यावर प्रथम उतरविले जाते. आपण यावेळी धरणाच्या पोटात शिरलेले असतो. मग नागार्जुनसागरच्या दुसऱ्या टप्प्यावर लिफ्टने पुन्हा खाली आणण्यात येते. तेथे इन्स्पेक्शन गॅलरी आहे. या वेळी ड्रेनेज गॅलरीतून जलाशयाच्या बाजूला पॉवर हाऊस दिसते. तेथे काही वेळ थांबून लिफ्टने परत जलाशयावर येता येते. दरवाजातून सोडलेले पाणी शंभर फूट उंचीवरून खाली कोसळत असतानाचे दृश्य भयचकित करणारे, पण मनोहर दिसते.

नागार्जुनकोंडा हे अगदी आगळेवेगळे वस्तुसंग्रहालय पाहण्यासाठी लाँचमधून जावे लागते. या वस्तुसंग्रहालयाचा इतिहास असा आहे की, नियोजित धरणाच्या परिसरात अनेक ऐतिहासिक महत्त्वाच्या मूर्ती व इतर शिल्पे होती. मुख्यतः ही बौद्ध धर्मीयांची शिल्पे होती. ती पाण्याखाली बुडून जाऊ नयेत म्हणून त्यांचे जतन एखाद्या वस्तुसंग्रहालयात करून मगच धरणाचे पाणी सोडावे अशी मागणी भारतातील व इतर अनेक देशांतील बौद्ध धर्मीयांनी केली. या रास्त मागणीचा विचार करून भारत सरकारने नागार्जुनकोंडा या उंचवट्यावर एक अद्ययावत वस्तुसंग्रहालय बांधले आणि धरणाच्या परिसरातील सर्व मूर्ती, इतर शिल्पे व अवशेष गोळा करून त्यात ठेवले. हे ठिकाण धरणापासून अकरा किलो मीटर्सवर आहे. पाण्याने

वेढलेल्या बेटावरील या वस्तुसंग्रहालयाला अतिशय नयनमनोहर पार्श्वभूमी लाभली आहे.

इसवी सनाच्या तिसऱ्या शतकात या भागात बुद्ध धर्माचा फार मोठा प्रसार झाला होता. विजापुरी इक्ष्वाकू वंशाचे राजे बुद्धधर्मीय होते. नागार्जुनकोंडा येथील मोठा स्तूप हा महाचैत्य म्हणून तेव्हा प्रसिद्ध होता. त्यामुळे दूरदूरवरून बुद्धभिक्षू या ठिकाणी येत. अर्थातच बुद्ध शिल्पकला ही विकसित होत गेली आणि येथे अनेक बुद्ध मूर्ती व त्या पंथांच्या शिल्पकलेचे नमुने आढळू लागले. नागार्जुनकोंडा येथील महाचार्य स्तूपात भगवान बुद्धाचे अवशेष ठेवले आहेत असे बुद्धभक्त मानीत असल्याने तर हे मोठेच तीर्थक्षेत्र झाले. १९२६ पासून पाच वर्षे येथे उत्खनन झाले आणि त्यात बौद्ध कलेचे अनेक उत्कृष्ट नमुने सापडले. त्यानंतर १९५४ ते ६२ या आठ वर्षात केलेल्या दुसऱ्या उत्खननातही अमूल्य ठेवा सापडला. नागार्जुनकोंडा येथील वस्तुसंग्रहालय हे बौद्ध विहारासारखे आहे. १९६६ साली शिक्षणमंत्री छगला यांच्या हस्ते या संग्रहालयाचे उद्घाटन झाले. या टेकडीला नागार्जुन कोंडा हे नाव पडण्याचे कारण असे की, आचार्य नागार्जुन यांचे वास्तव्य येथे होते आणि त्यांचे निर्वाणही येथेच झाले.

महाचैत्य स्तूपात एक चांदीचा छोटा स्तूप आहे. त्यात भगवान बुद्धाचे अवशेष होते. हा बुद्धधर्मीयांना परमवंदनीय असा भाग आहे. त्याला धातुगर्भ असे म्हणतात. सध्या अवशेष सारनाथ येथे आहे. या वस्तुसंग्रहालयात बुद्धाची उभी मूर्ती आहे, पण तिचा उजवा हात नष्ट झाला आहे. या मूर्तीजवळ स्तूप, विहार आणि चैत्यगृह होते. या वस्तुसंग्रहालयात अनेक बुद्धमूर्ती, काही नक्षीचे दगडी अवशेष, संगमरवरी शिल्पे, नाणी व बुद्धाच्या जीवनातील प्रसंग कोरलेली शिल्पे आहेत. मध्यप्रदेशामधील सांची येथील स्तूपाजवळही असेच एक वस्तुसंग्रहालय मी पाहिले होते, त्याची आठवण झाली. गौतमबुद्धाने पत्नीचा त्याग केल्यानंतर पत्नी यशोधरा आणि पुत्र शोक करीत असल्याचे एक कोरीव चित्र आहे. हिंदू धर्मातील देवदेवतांचे काही अवशेष येथे आहेत. ते इक्ष्वाकू कालानंतरचे असावेत. त्यात अश्वमेघ यज्ञाचे कुंड, सुब्रह्मण्यम् स्वामींची मूर्ती, अष्टभुजादेवीची मूर्ती वगैरेंचा समावेश आहे. रोमची काही नाणीही येथे आहेत. या भागाचा तिसऱ्या शतकात रोमशी व्यापार होता, हे ही

नाणी व रोमची घाटाची भांडी यावरून सिद्ध होते.

हैद्राबाद वरंगळ अंतर १४८ किलो मीटर्स आहे. येथे काझीपेठ, हणमकोंडा आणि वरंगळ ही गावे एकमेकांत मिसळलेली अशी आहेत. वरंगळ आणि हणमकोंडा ही तर सिकंदराबाद-हैद्राबादसारखी जुळी गावेच आहेत. वरंगळ किल्ला आणि सहस्रस्तंभ मंदिर ही प्रेक्षणीय स्थळे आहेत. रुद्रदेव हा काकतीय राजा या भागावर राज्य करीत होता, तेव्हा हणमकोंडा ही त्याची राजधानी होती. त्याच्या कारकीर्दीत एकदा एका मोठ्या दगडाला धडकून एक बैलगाडी उलटली आणि तो दगडही उखडला गेला. त्या दगडाखाली एक स्वयंभू शिवलिंग सापडले. त्या दगडाला तेलगू भाषेत ओर्जुगल्ल म्हणतात. रुद्रदेव राजाने हे शिवलिंग हा महादेवाचा आपल्याला आशीर्वाद आहे असे मानले आणि तेथे शिवमंदिर उभारले. तसेच आपली राजधानीही हणमकोंडाहून त्या ठिकाणी नेली. त्या दगडाचे ओर्जुगल्ल नाव पुढे अपभ्रंश होऊन वरंगळ झाले आणि तीच रुद्रदेवची राजधानी झाली.

किल्ला म्हणून ज्या भागाचा उल्लेख होतो, तो भाग म्हणजे एका मोठ्या पटांगणात अनेक दगडी अवशेष मांडून ठेवलेला माळ आहे. त्याच्याभोवती उंच दगडी तोरणे आहेत. या जागी किल्ला होता. तो असा पडलेला आहे: किल्ल्याचे काही भाग सापडले ते भारत सरकारच्या पुरातत्त्व खात्याने या ठिकाणी व्यवस्थित मांडून ठेवले आहेत.

काकती या देवीचे पूजक म्हणून काकतीय हे नाव या वंशातील राजांना पडले. ते मूळ जैन पंथीय होते, पण नंतर शिवसरणांच्या प्रभावाने ते शैवपंथीय झाले. गुंडुराजू हा काकतीय वंशाचा संस्थापक राजा होता. त्याचे राज्य म्हणजे वरंगळ जिल्ह्याचा एक तालुका एवढेच होते. बेटाराजू हा काकतीय राजा हणमकोंडा येथून राज्य करू लागला, तेव्हा त्याने हे राज्य बरेच वाढवले. प्रोताराजू आणि रुद्रदेव यांच्या कारकीर्दीत काकतीयांचे साम्राज्य झाले. रुद्रदेव हा महापराक्रमी होता. त्याने इ. स. ११६८ मध्ये येथे बळकट किल्ला बाधंला. हणमकोंडा येथील सहस्त्रस्तंभ मंदिरही रुद्रदेवानेच बांधले, पण देवगिरीच्या राजाने केलेल्या स्वारीत रुद्रदेव मारला गेला. त्याचा भाऊ महादेव याने आपल्या तीन वर्षांच्या अल्प कारकीर्दीत यादवांचा सूड घेण्याचा केलेला प्रयत्न असफल होऊन तोही ठार झाला. गणपतीदेव या काकतीय राजाने ११९९ पासून १२६२ अशा प्रदीर्घ

कारकीर्दीत साम्राज्य वाढवून बळकट केले आणि यादवांची मुलगी सोमलादेवी हिच्याशी लग्न करून एक संभाव्य शत्रू मित्र केला.

वरंगळचा किल्ला भग्नावशेषांच्या स्वरूपात मैदानात एखाद्या खुल्या वस्तुसंग्रहालयासारखा अस्ताव्यस्त पसरला आहे. चार बाजूंच्या चार कमानी मात्र मजबूत व अविच्छिन्न स्वरूपात उभ्या आहेत. भग्नावस्थेतील दगडी हत्ती, मूर्ती, अर्धेमुर्धे स्तंभ, मंदिराचे तुकडे, हत्ती किंवा घोडे कोरलेले स्तंभ इथे दयनीय अवस्थेत वारा, ऊन, पाऊस खात पडलेले आहेत. महानुभव पंथांचे संस्थापक चक्रधर स्वामी यांनी वरंगळला वास्तव्य केले होते. चार खांबांची नक्षीदार तोरणे मात्र कलात्मक असून लक्षात राहण्यासारखी भव्य व उत्कृष्ट नक्षीची आहेत. मार्कोपोलो या इटालियन प्रवाशाने १२९३ साली या किल्ल्यास भेट देऊन त्याच्याबद्दल प्रशंसापर उद्‌गार काढले आहेत.



**वरंगळचे भग्नावशेष**

या खुल्या वस्तुसंग्रहालयाजवळच एक मंदिर आहे. ते शंभुलिंगेश्वरांचे आहे. तेथे पाच नंदी आहेत. त्यांपैकी दोन मोठे व तीन लहान आहेत, मंदिरात शिवलिंग आहे. ते सात फण्यांच्या शेषांच्या डोकीवर आहे. या मंदिराच्या आवारात आसपास उत्खननात सापडलेल्या काही मूर्ती ठेवलेल्या आहेत. मंदिराजवळ दोन तोफा आहेत. त्या अर्धवट वापरलेल्या अवस्थेत

आहेत. परत येताना जुन्या किल्ल्याचा जो थोडा भाग शाबूत आहे, तो पाहायला मिळतो. या किल्ल्याला दोन तटबंदी आहेत. बाहेरची मातीची असून आतील दगडी आहे. बाहेरचा मातीचा तट अनेक ठिकाणी पडला असून त्याची एकंदर लांबी एकोणीस किलो मीटर्स आहे. आतील दगडी तटही बराच भग्नावस्थेत असून त्याची लांबी आठ किलो मीटर्स आहे. पूर्वी या किल्ल्यास पन्नासवर बुरूज होते, पण ते आता बहुतेक नष्ट झाले आहेत. रुद्रदेवाने बांधलेल्या या किल्ल्याभोवती रुद्रकादेवीने खंदक खणून घेतला होता. आजही या किल्ल्यात थोडी वस्ती आहे. वरंगळ किल्ल्यापासून दीड किलो मीटर्स अंतरावर भद्रकाली मंदिर आहे. जवळच एक मोठी अखंड शिळा आहे. तेराव्या शतकात बांधल्या गेलेल्या या मंदिरातील मूर्ती भव्य आहेत. अष्टभुजा देवीच्या या मूर्तीची उंची नऊ फूट आहे. राक्षसाच्या देहावर ती उभी आहे. बाहेरच्या आवारात अनेक नागमूर्ती आहेत. काकतीय राजांची ही कुलदेवता असल्याने हे मंदिर विशेष महत्त्वाचे आहे.


❑

# ६. वरंगळ ते श्रीशैलम्

वरंगळहून परत येताना हणमकोंडा येथील सहस्रस्तंभ मंदिर लागते. एखाद्या मंदिराला एक हजार खांब असावेत ही गोष्ट मोठी नवलाईची वाटते, पण प्रत्यक्ष मंदिर पाहिल्यानंतर मात्र सहस्रस्तंभ हे त्याचे नाव फसवे आहे हे लक्षात येते. कारण हजार खांब असतील इतके हे मंदिर मुळीच भव्य नाही. हे मंदिर एकतीस मीटर लांब व पंचवीस मीटर रुंद आहे. चबुतऱ्यावर बांधले गेलेले हे मंदिर कलात्मक आहे. मंदिराबाहेर दोन दगडी नंदी आहेत. मंदिराच्या बाहेरच्या भिंतीवर जे कोरीव काम आहे, त्यात अनेक मूर्ती आणि अनेक लहान लहान स्तंभ कोरलेले आहेत. मंदिराच्या भोवती कोरलेल्या या सर्व स्तंभांची बेरीज एक हजार होत असेल म्हणून त्याला हे नाव पडले. हे मंदिर प्रथम रुद्रेश्वर मंदिर या नावाने विख्यात होते. ते रुद्रदेव राजाने बांधले.

मंदिरात अनेक कलात्मक सुंदर मूर्ती आहेत. त्यात द्वारपाल, चौरीश्वर सूर्य इत्यादी लक्षणीय आहेत. विशेष म्हणजे येथील नंदी हा शिवलिंगापुढे नसून विष्णूपुढे आहे. त्याचे कारण या मंदिरातील शिव हा रुद्र स्वरूपात असल्याने नंदी हा विष्णूपुढे उभा आहे ! सहस्रस्तंभ मंदिरासमोर अर्धवट कलंडलेला एक करामत मंडप आहे. त्याचा पाया एका बाजूने खचलेला आहे. हा मंडप काहीसा ओबडधोबड आहे.

हणमकोंडापासून सत्तर किलो मीटर्सवर रामप्पा मंदिर आहे. या मंदिराचा उल्लेख ब्रायटेस्ट स्टार इन गॅलेक्सी ऑफ द मेडिव्हल टेंपल्स (मध्ययुगीन मंदिराच्या तारकापुंजातील सर्वात प्रकाशमान तारा) असे केले आहे. वरंगळ- मुलंग रस्त्यावर पालमपेठ या लहानशा गावकुसाबाहेर हे मंदिर आहे. काकतीय राजा गणपती देव याने हे मंदिर बांधले. इ. स. ११७३ साली सुरुवात झाली व १२१३ साली हे मंदिर पूर्ण झाले. रामप्पा नावाच्या कलाकाराने या मंदिराचे काम केले. हणमकोंडा येथील सहस्रस्तंभ मंदिराच्याच धर्तीवर हे रामप्पा मंदिर आहे. रामप्पा मंदिर हे रुद्रेश्वर मंदिर आहे. मात्र त्याचे नाव आतील देवाच्या मूर्तीवरून न पडता ते मंदिर



**सहस्रस्तंभ मंदिर**

बांधणाऱ्या कलावंताच्या नावावरून ओळखले जाते. रामप्पा मंदिराचा चबुतरा तारकाकृतीचा आहे. मंदिराच्या तीन प्रवेशद्वारांपैकी पूर्वीकडील द्वार हे मुख्य आहे. त्यातून आत गेल्यावर नंदी व त्याच्याभोवती मंडप दिसतो. नंदीची ही मूर्ती एकाच अखंड शिलेतून कोरलेली आहे. अशा अनेक मूर्ती कर्नाटकात दिसतात. तंजावर येथे बृहदीश्वर मंदिरासमोरही असाच प्रचंड नंदी व मंडप आहे. या नंदीच्या अंगावर नक्षीची झूल व गळयात अलंकार आहेत.


मंदिराच्या बाहेर कोरलेल्या देखण्या शिल्पांचा आस्वाद अवश्य घेतला पाहिजे. ही शिल्पे इतकी कलात्मक आहेत की हळेबीड-बेलूर येथील होयसाळ मंदिरांची आठवण होते. भिंतीच्या तळाच्या भागावर डौलदार हत्तींची रांग कोरलेली आहे. विशेष म्हणजे यातील प्रत्येक हत्तीची पोज वेगळी आहे. ही हत्तींची रांग एवढी मोठी आहे की बाहेर दिसणारी रांग वास्तविक मंदिराच्या आतल्या बाजूला सुरू होते. बाहेरून संपूर्ण मंदिराला वेढा देते आणि परत आत जाते. हत्तींच्या रांगेवर सिंहांची रांग आहे. त्याशिवाय निरनिराळ्या आविर्भावात नृत्य करणाऱ्या मदनिका, ग्रीक

योद्धे, मुष्टियुद्ध व मल्लयुद्ध करणारे जवान आपले लक्ष वेधून घेतात.

रामप्पा मंदिराचा सर्वात कलात्मक व प्रेक्षणीय भाग म्हणजे त्याचे ब्रॅकेट्स. स्तंभापासून छतापर्यंत जाणारे हे ब्रॅकेट्स अतिशय सुंदर युवतींच्या मूर्तींनी विभूषित केलेले आहेत. प्राचीन भारतीय शिल्पकलेच्या आदर्शाप्रमाणे या मूर्ती कमनीय व सुंदर आहेत. भरतनाट्य करणाऱ्या तरुणीचे कोरीव काम अत्यंत नाजुक आणि आकर्षक असे आहे. शिकारीवर निघालेली एक युवती वीररसाची मूर्तीच आहे. तसेच नागिणीने विळखा घातलेली एक नागकन्याही या ब्रॅकेटवर आहे. ती विवस्त्र असून तिचे अंगप्रत्यंग इतके कलात्मक आहे की हिच्या आदर्श प्रमाणबद्धतेने आपण थक्क होऊन जातो. त्या नंतरच्या चार नर्तिकांपैकी एकीचे हातपाय तुटलेले आहेत. एक तरुणी मृदंग वाजवीत आहे. एका तरुणीचे वस्त्र एक माकड ओढीत असल्याने ती लज्जित झाली आहे. हाच विषय खजुराहोमधील मंदिरावरील शिल्पांतही हाताळला आहे. या मूर्तीचाही एक हात भग्न झालेला आहे. या मंदिरातील मानवी आकृती संगीत व नृत्य या विषयाभोवतीच कोरल्या गेल्या आहेत.

मंदिराच्या पश्चिमेकडील गर्भगृहांच्या दरवाजावरही अतिशय नाजुक व कलात्मक कोरीव काम आहे. त्यात तांडव नृत्य करणारा शिव आपले लक्ष वेधून घेतो. जवळच एक सिंह व हत्तीही आहे. तळाशी मुरलीधर कृष्णाची मूर्ती आहे. तसेच नृत्य करणाऱ्या गोपीही आहेत. येथील पाच दगडांवर प्रहार केला तर सारेगम इत्यादी सूर निघतात. मंदिराचे घाटही अत्यंत सुंदर अशा कोरीव कामाने सुशोभित करण्यात आले आहेत. मंडपातील स्तंभावरील नक्षी आपले मन मोहून टाकते या ठिकाणी समुद्रमंथनाचे कोरलेले दृश्य विलोभनीय आहे. या मंदिराच्या आवारात एक प्रचंड कोरी शिला आहे. मंदिराच्या बाहेरील आवारात गणपती, विष्णू, भद्रकाली इत्यादींची मंदिरे आहेत.

हैद्राबाद ते श्रीशैलम् या वाटेवर श्रीशैलम् विद्युत प्रकल्प लागतो. येथे कृष्णा नदीवर प्रचंड बंधारा घालून त्या पाण्यावर विजेची निर्मिती होते. या भागात बस डोंगराच्या एका टोकावरून वळणे घेत खोल खोल जाते, मग बांधावरून पलीकडे जाते आणि पुन्हा डोंगर चढून दुसऱ्या टोकाला जाते. हे सर्वच दृश्य छाती दडपून टाकण्यासारखे अतिशय रम्य आहे. हे धरण



**श्री. मल्लिकार्जुन मंदिर**

श्रीशैलम्पासून चौदा किलो मीटर्सवर आहे. या धरणापासून जी वीज तयार होते, ती वाहून नेण्यासाठी जे विजेचे मनोरे बांधले आहेत ते इतके मोठे आहेत की त्यांच्या चार खांबांमधून बस जाते. हे धरण १७०० फूट लांब व ३५० फूट उंच आहे. ९०० कोटी रुपये खर्चाचा हा प्रकल्प तेलगू गंगा या नावाने ओळखला जातो. या धरणामुळे तयार झालेल्या जलाशयातून चारशे किलो मीटर्सचा कालवा काढण्यात आला असून त्यामुळे सात लाख एकर जमिनीला पाणी मिळते.

श्रीशैलम् हे तीर्थस्थान आहे. तिथे मंदिर, धर्मशाळा आणि यात्रेकरूंना उपयोगी सामानाची दुकाने व खानावळी याशिवाय फारसे काही नाही. देवालयाचे ब्लॉक्स उत्तम आणि माफक भाड्याचे आहेत. देवालयीन कचेरीपासून दोन मिनिटांच्या अंतरावर बसस्टेशन आहे.

श्रीशैलम् हे तीर्थस्थान बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक आहे. कृष्णा नदीच्या काठावर नीतमलय् जंगलात श्रीशैल पर्वतावरील या पवित्र स्थानात

मल्लिकार्जुन आणि भ्रमरांबा ही प्रमुख देवालये आहेत. विष्णूची पत्नी श्री हिने या ठिकाणी तपस्या केली होती आणि शंकर प्रसन्न झाला तेव्हा हिने वर मागितला की आपले नाव या पर्वताशी नेहमी निगडित असावे. त्याप्रमाणे हा पर्वत श्रीपर्वत, श्रीशैलम् या नावाने ओळखला जाऊ लागला. स्कंद पुराणात श्रीशैलश खंड नावाचे स्वतंत्र प्रकरण या पर्वताचा इतिहास सांगते. हिरण्यकश्यप ह्या ठिकाणी शंकराची पूजा करीत होता आणि येथून शंभर मैलांवर अहोबलिम् येथे त्याचा दरबार भरत असे. त्रेतायुगात श्रीराम व सीता यांनी या क्षेत्रास भेट दिली होती आणि येथे सहस्र लिंगांची स्थापना केली होती. व्यापार युगात पांडव अज्ञातवासात असताना येथे काही दिवस त्यांनी वास्तव्य केले होते. अजूनही भीमकुंड नावाचे एक कुंड श्रीशैलशवर पाहावयास मिळते. या भागास असमासुर नावाचा राक्षस लोकांना फार त्रास देत असे, पण भ्रमरांबा देवीने भ्रमरांचे रूप घेऊन त्याचा वध केला म्हणून तिला येथे भ्रमरांबा असे नाव पडले. भ्रमरांबा मंदिराच्या मागच्या बाजूला भुंग्यांचा आवाज येतो असे सांगण्यात येते, पण बहुधा तो उंचावर वाहणारे वारे झाडांच्या पानांतून वेगाने जात असता पानांची सळसळ होते त्याचा आवाज असावा.

श्रीशैलम् येथे स्वयंभू शिवलिंग आहे. त्याची कथा अशी की कार्तिकेय हा शिव-पार्वतीवर रागावून या पर्वतावर राहायला आला. त्याला शोधण्यासाठी शिव-पार्वती येथे येत आहेत हे समजताच कार्तिकेय क्रौंच पर्वतावर गेला. पण शिव-पार्वती मात्र येथेच राहिली. अनेक वर्षांनी चंद्रावती गावच्या राजकन्येला या स्वयंभू शिवलिंगाचा शोध लागला. हिने मल्लिका व अर्जुनी या फुलांनी त्यांची पूजा केली. मल्लिका म्हणजे जाई व अर्जुनी म्हणजे जुई. हिच्या भक्तिभावाने शंकर प्रसन्न होऊन त्यांनी तिला साक्षात दर्शन दिले. तेव्हा तिने मल्लिका व अर्जुनी या फुलांचा हार त्यांना अर्पण केला. त्या वेळेपासून येथील स्वयंभू शिवलिंग मल्लिकार्जुन या नावाने ओळखले जाऊ लागले. रावण हा परम शिवभक्त होता. लंकेच्या युद्धात रामाने रावणाला मारल्यावर आपला भक्त मारला गेला म्हणून शिव संतापेल या विचाराने राम येथे आले आणि त्यांनी पापक्षालनार्थ शिवांची तपस्या केली. नागार्जुन हे बौद्ध स्वामी या ठिकाणी लोखंडापासून सोने तयार करीत. येथे त्यांनी इतरही रासायनिक प्रयोग केले, तेव्हा त्यांना

‘रससिद्ध’ ही पदवी मिळाली. आदि शंकराचार्यही येथे आले होते. त्यांनी श्रीशैलम्पर्वतावरील वास्तव्यात ‘शिवानंदलहरी’ आणि ‘भ्रमरांबा अष्टक’ ही काव्ये रचली. महानुभाव पंथाचे श्रीचक्रधर स्वामी यांनीही येथे वास्तव्य केल्याचे उल्लेख आहेत.

महाराष्ट्राच्या दृष्टीने श्रीशैल क्षेत्राचे विशेष महत्त्व आहे. कारण छत्रपती शिवाजी महाराज येथे येऊन देवीचे व मल्लिकार्जुनाचे दर्शन घेऊन गेले होते. भ्रमरांबाने या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांना विजयी तलवार दिली होती आणि त्यानंतर महाराजांचा कधीही पराभव झाला नाही. आजही भ्रमरांबा देवीच्या मंदिराजवळ लहानशा बागेत एक मंदिर आहे. त्या मंदिरात भ्रमरांबा देवी शिवाजी महाराजांना विजयी तलवार देत असल्याची प्रतिमा आहे. महाराष्ट्राचे थोर क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके हेही अज्ञातवासात असताना श्रीशैलम् येथे आले होते. त्यांचेही असेच स्मारक होणे आवश्यक आहे. परप्रांतात महाराष्ट्राच्या पराक्रमांच्या अशा खुणा पाहताना आपल्याला विशेष अभिमान व आनंद होतो. छ. शिवाजी महाराज येथे केव्हा व कशासाठी आले होते याची चौकशी केली तेव्हा कळते की तंजावरला जाताना ते १६६७ साली श्रीशैलम्वर आले होते. त्यावेळी त्यांना असे आढळून आले की मुसलमानांनी मंदिराची बरीच मोडतोड केली असून मंदिर दुर्लक्षित आहे. तेव्हा महाराजांनी मंदिराची डागडुजी केली आणि त्याच्या संरक्षणासाठी सैन्यही ठेवले. इतकेच नव्हे, तर उत्तरेकडील भव्य गोपुरही शिवाजी महाराजांनी बांधून घेतले. हे आडादी शिवाजी गोपुर म्हणून ओळखले जाते. श्रीशैलम्पासून पाच किलो मीटर्सवर शंकराचार्यांनी तप केले; तेथे कांचीच्या शंकराचार्यांनी आद्य शंकराचार्यांचा संगमरवरी पुतळा बसविला आहे. मल्लिकार्जुनाच्या दर्शनानंतर अनेक भक्त शंकराचार्यांच्या या मूर्तीच्या दर्शनासाठी जातात. हे ठिकाण अत्यंत निवांत आणि निसर्गसुंदर आहे.

मल्लिकार्जुन मंदिराकडे जाण्यासाठी पश्चिमेकडे भव्य गोपुर आहे. बरेच चालून गेल्यावर मंदिराकोपटीचा तट लागतो. दर्शनासाठी मोठी रांग असते. दर्शनासाठी दोन रुपयाचे एक तिकिट घ्यावे लागते. मंदिराबाहेर तसा फलकही लावलेला आहे. पण एखाद्याने तिकिट घेतले नाही तर तेथील सेवकासमोरील हुंडीत दोन रुपये टाकले तरी चालते. गाभारा लागण्यापूर्वी

डावीकडे गणपतीची भव्य देखणी मूर्ती आहे. तसेच नटराज आणि ःबंदी यांच्याही मूर्ती आहेत. गाभाऱ्याचा दरवाजा नक्षीदार चांदीचा आहे. गर्भगृहात शिवलिंग आहे. त्यावर टांगलेल्या पात्रातून पाण्याचा अभिषेक होतो. पिंडीवर चंदनाचा लेप दिला होता. तसेच पाच फण्यांच्या नागाने पिंडीवर छत्र धरल्याचे मोहक दृष्य दिसत होते. एक काळ असा होता की येथे शिवलिंगासमोर भक्त आत्मार्पण करीत. कोणी भक्त पर्वतावरून उडी मारूनही आत्मार्पण करीत. कारण येथे मरण आले तर माणसाला मुक्ती मिळते अशी कल्पना होती. येथे मानवी बळी देण्याची सातव्या शतकात पद्धत होती असे भयकूतीने 'माहासी माधव' या काव्यात म्हटले आहे. महाराष्ट्राच्या दृष्टीने याच मंदिरात व याच गाभाऱ्यात एक अत्यंत करुणोदात्त प्रसंग घडला आहे. तो असा की, छत्रपती शिवाजी महाराज येथे आले, तेव्हा कौटुंबिक बिकट परिस्थितीमुळे ते अत्यंत विकल मन:स्थितीत होते, त्यांनी स्वतः येथे आत्मार्पण करण्यासाठी तलवार उपसली, पण त्यांचे कारभारी रघुनाथपंत आणि त्यांचे सहकारी यांनी ती तलवार वरच्या वर धरून महाराजांना या आतताई कृतीपासून परावृत्त केले. मल्लिकार्जुनाच्या भक्तीत महाराजांच्या मनावरचे नैराश्य गेले आणि भ्रमरांबाने दिलेली विजयी तलवार घेऊन ते महाराष्ट्रात परतले. छ. शिवाजी महाराजांचा पुर्नजन्म ज्या ठिकाणी झाला, ती ही जागा सर्वांना वंदनीय असावी यात काहीच आश्चर्य नाही.

मल्लिकार्जुनापुढे आत्मार्पण करणाऱ्यांचा जहाल पंथ काही शतकांपूर्वीपर्यंत येथे होता. त्या पंथाला अक्कगयी पंथ असे नाव होते. श्रीशैलम् पर्वतातील एका गुहेत कपाल भैरव हा या पंथाचा देव अजूनही आहे. तेथे आत्मार्पण आणि नरबळी हे प्रकार तीनशे वर्षांपूर्वीपर्यंत चालू होते, पण भ्रमरांबाच्या भक्तीने ते आसुरी प्रकार बंद केले. नरबळी देणाऱ्या पंथाच्या लोकांनी आद्य शंकराचार्यांचाही बळी देण्याचा प्रयत्न केला होता. पण तो यशस्वी झाला नाही. या कथांचा मनावर पगडा असल्याने मल्लिकार्जुनाच्या दर्शनातील सौंदर्यावर भीषणतेचा एक पदर सतत वावरत असल्याची जाणीव होते.

श्रीशैलम् येथील मंदिरापासून कृष्णा नदीचा घाट जवळजवळ दोन मैल लांब आहे. तो रिक्षाच्या किंवा मोटारीच्या वाटेने. पायवाटेने बराच जवळ

म्हणजे एक किलो मीटर आहे. कृष्णा नदी येथे पाताळगंगा या नावाने ओळखली जाते. हा घाट अन्नवर्मन रेड्डी यांनी पाचशे वर्षांपूर्वी बांधलेला आहे. घाट खूप खोल आहे. त्याच्या साडेआठशे पायऱ्या उतरणे व परत चढणे ही सोपी गोष्ट नाही, पण भक्तगण पवित्र पाताळगंगेत स्नान करण्यासाठी हे कठीण काम आनंदाने करतात. हा परिसर अत्यंत निसर्गसुंदर आहे. उंच उंच डोंगर, त्यापासून अप्रतिहत वाहणारी कृष्णा, आजूबाजूला हिरवी गर्द झाडी आणि मध्येच मानवनिर्मित सुबक घाट, घाटावरचे जीवन हे एक रम्य हृद्य जीवन असते. इथेतर महातीर्थ म्हणून मानल्या गेलेल्या श्रीशैलचे भक्त मंदिरात जाण्यापूर्वी पवित्र होण्यासाठी स्नान करतात. त्यांना पूजाअर्चा करण्यासाठी काठावर एक शिवमंदिर आहे. धर्मकर्मे करण्यासाठी ब्राह्मण हातात पळीपंचपात्रे-ताम्हण घेऊन फिरत असतात. कृष्णा नदीला इथे पाताळगंगा म्हणतात. तसेच श्रीशैलम् पर्वताला नीलगंगा म्हणतात. या दोन गंगांच्या दरम्यान कृष्णा नदी उत्तरवाहिनी झाली आहे. या ठिकाणी श्री नरसिंह सरस्वती यांनी जिवंत समाधी घेतली होती. ते दत्ताचे अवतार आहेत असे त्यांचे भक्त मानतात. या ठिकाणी कृष्णा नदी जमिनीपासून पाचशे फूट खोल आहे म्हणून तिला पाताळगंगा हे नाव पडले.

कृष्णा नदी श्रीशैलम् पर्वताच्या पायथ्याशी का आली, याची एक उद्‌बोधक कथा आहे. अवंतीपूरमध्ये एक ब्राह्मण राहत होता. त्याने ब्रह्मचर्य पाळून वेदाभ्यास करण्याची प्रतिज्ञा केली होती. पण इतरांनी त्याला सांगितले की विवाह करून तुला मुलगा झाला नाही तर तुला मोक्ष मिळणार नाही. म्हणून त्याने स्वतःच्या इच्छेविरुद्ध एका ब्राह्मणकन्येशी विवाह केला. तिला घेऊन तो काशीला गेला. त्याची पत्नी एकदा काशीला घाटावर स्नानाला गेली असता घाटावरच्या एका तरुणावर ती भाळली. त्याच्याबरोबर तिचा संबंध आला, पण त्यानंतर दुसऱ्या दिवशी जेव्हा ती स्नानासाठी गेली तेव्हा गंगेने तिला म्हटले, ''थांब, तुझ्यासारख्या व्यभिचारी स्त्रीने मला स्पर्श केला तर मी मलीन होईन.'' तेव्हा त्या बाईला पश्चाताप झाला आणि असे कूकर्म आपण पुन्हा करणार नाही असे तिने वचन दिले. गंगेने तिला क्षमा केली आणि तिला स्नान करू दिले. पण गंगा मलीन झाली. हे अपावित्र्य घालविण्याचा एकमेव उपाय म्हणजे

श्रीशैलम्‌ला जाणे. म्हणून गंगा ही कृष्णा नदीच्या रूपाने श्रीशैलम्‌ला आली. अशी ही कथा आहे.

श्रीशैलम्‌ हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक आहे. ही बाराही ज्योतिर्लिंगे स्वयंभू आहेत. ती अशी :

१. सोमनाथ (सौराष्ट्र), २. मल्लिकार्जुन (श्रीशैलम्‌), ३. महांकाळेश्वर (उज्जैन), ४. ओंकारेश्वर (ओंकारेश्वर मध्यप्रदेश), ५. केदारेश्वर (मंदाकिनी नदीच्या काठी हिमालयात), ६. भीमाशंकर (सह्याद्रीवर) ७. विश्वेश्वर (काशी), ८. त्र्यंबकेश्वर (नाशिक), ९. वैजनाथ (अलाहाबाद-प्रयाग), १०. नागेश्वर (द्वारका), ११. रामेश्वर (रामेश्वर), १२. घस्मेश्वर (हरिद्वार)

मल्लिकार्जुन मंदिराच्या आवारात इतर अनेक मंदिरे आहेत. पंच पांडव मंडप नावाचा मंडप आहे. तो व्यापारयुगात पांडवांनी बांधला असे सांगण्यात येते. या मंडपास पाच नंदी आहेत. तसे पाहिले तर मल्लिकार्जुन मंदिराच्या आसपास इतके नंदी आहेत की त्यांची मोजदाद करणे सुलभ नाही. नंदी तर शिखरावर स्थानापन्न झाले आहेत. नंदी मंडप हे त्याचे एक उदाहरण आहे. वीरभद्रस्वामी मंदिरातील मूर्तीला बत्तीस हात आहेत. ही या आसमंताची संरक्षण देवता आहे. वृद्ध मल्लिकार्जुन स्वामी या नावाची लहानशी मूर्ती आहे. हिला अजरामर असेही म्हणतात. या मूर्तीची स्थापना अनंत काळापूर्वी झाली, असे मानण्यात येते. सांगळ बासवप्पा या नावाचा एक विशाल नंदी आहे. तो दगडाचा आहे. तेथील पुजारी सांगतात की, जेव्हा हा बसवप्पा नंदी हंबरडा फोडेल तेव्हा कलियुगाचा अंत होईल. येथील उद्यानात नर्तन करणाऱ्या नटेश्वरांची पंचधातूंची भव्य मूर्ती आहे. तिला जरीचा पितांबर नेसविण्यात येतो. रत्नगर्भ गणपतीच्या मूर्तीच्या पोटात अमोल रत्ने ठेवली आहेत असे तेथील मार्गदर्शक सांगतात. या आवारात त्रिफळ वृक्ष या नावाचा वृक्ष असून या आवारात दत्तात्रय महामुनी तप करीत होते. बनारसप्रमाणेच येथेही साक्षी गणपती आहे. त्याचे दर्शन घेतले असता तो आपण आल्याची नोंद करतो व पुण्य आपल्या खाती जमा करतो असे भक्त मंडळी मानतात. नंदी मंडपाप्रमाणेच बृंगी मंडपावरही नंदीच्या अनेक मूर्ती आहेत. लांबून २७३० फूट उंचीच्या कैलास शिखराचे दर्शन घडते. या शिखरावर नंदीवर आरूढ झालेल्या

शंकराचार्यांची मूर्ती आहे.

मुख्य मंदिरापासून अर्ध्या किलो मीटरवर छ. शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक बांधले जाणार आहे. त्या नियोजित इमारतीचा फलक बसस्टँडजवळ लावलेला आहे. या शिवस्फूर्ती स्थानाची मूळ योजना पंचवीस लक्ष रु. ची होती. श्री. वसंतदादा पाटील हे मुख्यमंत्री असताना त्यांनी या ठिकाणास भेट दिली होती आणि महाराष्ट्र शासनातर्फे या स्मारकास अडीच लक्ष रु. चे अनुदान दिले होते. आता ही योजना वाढविण्यात आली असून तिच्यावर एक कोटी रु. खर्च होणार आहे. श्री शैलम् सारख्या शांत, निवांत व पवित्र ठिकाणी शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक होत आहे याचा कोणाही महाराष्ट्रीयनास आनंद व अभिमान वाटेल. आंध्रच्या दौऱ्यात श्रीशैलम् हे मनाला विसावा, शांतता व स्फूर्ती देणारे ठिकाण ठरले.

❑

# ७. विजयवाडा आणि तिरुपती

विजयवाडा हे आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक दृष्ट्या आंध्र प्रदेशातील एक अत्यंत महत्त्वाचे शहर आहे. आंध्र प्रदेशातील सर्वात मोठे रेल्वे स्टेशन विजयवाड्याचे आहे. या शहराचा सांस्कृतिक इतिहास उज्ज्वल व प्रदीर्घ आहे. राजकीयदृष्ट्या हे सर्वात प्रगत व सतत जागृत असलेले शहर आहे. हवामानाच्या दृष्टीने याच्याइतके सुखद शहर आंध्रप्रदेशात दुसरे नाही. येथून जवळच असलेल्या इंद्राकाली पर्वतावर अर्जुनाने तपश्चर्या करून शिवास प्रसन्न करून विजय हस्तगत केला म्हणून या गावास विजयवाडा हे नाव पडले अशी आख्यायिका आहे.

गावाच्या सुरुवातीलाच टी. प्रकाशम् बार्ज हा कालवा आहे. असे तीन कालवे गावात आहेत. विजयवाडा आणि हॉलंडमधील ॲमस्टरडॅम ही शहरे कालव्यांच्या बाबतीत सारखीच आहेत असे वाटू लागले. कृष्णा नदीवरचा हा बंधारा १२२४ मीटर्स लांब आहे. दोन टेकड्यांच्या मधे हा बंधारा कम पूल १९५७ साली बांधला गेला. कलकत्ता, मद्रास हा मार्ग या प्रशस्त बंधाऱ्यावरून जातो. बंधाऱ्याच्या कालव्यांमुळे बारा लाख एकर जमिनीला पाणी मिळते. एका बाजूने वाहनांची ये- जा होते, दुसऱ्या बाजूने पादचारी जात असतात आणि खालून अनेक भक्कम दगडी खांबांमधून पाण्याचे अजस्त्र लोट वाहत असतात हे दृश्य अविस्मरणीय वाटते.


या बंधाऱ्याजवळच शहराच्या बाजूच्या टोकाला कृष्णा नीदचा घाट आहे. घाटावर नेहमीप्रमाणे अनेक मंदिरे आहेत. घाटावर भाविक लोक स्नान करीत असतात. कोणी धर्मकृत्ये करीत असतात. नाशिकसारख्या गावी घाटावर अशीच दृश्ये दिसतात. जवळच्याच टेकडीवर कनकदुर्गा मंदिर आहे. वाटेत तीन गुंफा आहेत. त्यापैकी दोन गुंफा अकन्ना व मादन्ना यांच्या आहेत. कुतुबशहा तानशहा यांचे ते सरदार होते. तिसऱ्या गुंफेत ब्रह्मा, विष्णू, महेश यांच्या मूर्ती आहेत. अनेक भक्त पायी किंवा वाहनाने वर चढतात. लांबूनच कनकदुर्गा मंदिराचा वैशिष्ट्यपूर्ण कळस दिसतो. तो एकाच शिखराचा नसून त्यावर जैन मंदिराप्रमाणे अनेक लहान लहान

शिखरे व गोपुरे आहेत. गुजरातेत मृत्युंजय पर्वतावरील मंदिरावर ही कला उत्कर्षास पोचलेली आहे. कनकदुर्गा मंदिराचा भव्य कल्याण मंडप ओलांडून आत गेल्यावर गर्भगृहात कनकदुर्गा देवीची पितळी मूर्ती आहे. ती अष्टभुजा असून तिने एका राक्षसाचा वध केलेला दाखविला आहे. मूर्तीवर रत्नजडित मुकुट आहे. हातात परशू, गदा वगैरे विविध आयुधे आहेत. आदि शंकराचार्यांनी या मंदिरास भेट दिली होती. त्यांनी येथे स्थापन केलेले श्रीचक्र अजूनही पाहावयास मिळते.

जवळच्या गांधी हिलवरून विजयवाडा शहराचे प्रसन्न विहंगम दृश्य दिसते. याच टेकडीच्या दुसऱ्या बाजूने विजयवाडा रेल्वेस्टेशनचे भव्य व सदा गजबजलेले दृश्य दिसते. गांधी टेकडीवर ५२ फूट उंच स्तूप आहे. लालसर जयपुरी रंगाच्या दगडाचा हा स्तूप १९६८ साली बांधण्यात आला. स्तूपावर चौकोनी स्तंभ आहे. त्यावर भारतीय लोकजीवनातील काही दृश्ये कोरलेली आहेत. त्यात मुसळाने धान्य कांडणाऱ्या महिला, सूत काँतणाऱ्या स्त्रिया, जात्यावर दळणाऱ्या स्त्रिया वगैरे दृश्ये आहेत. त्यावरच्या चबुतऱ्यावर अहिंसा, सत्य, स्वदेशी, सर्वधर्मसमभाव इत्यादी गांधीजींच्या तत्त्वातील शब्द कोरलेले आहेत. तसेच हातात काठी घेऊन ती जमिनीवर टेकत चाललेली गांधीजींची आकृतीही कोरलेली आहे. या टेकडीवर गांधी-साहित्याचे ग्रंथालय आहे. मुलांच्यासाठी छोटी आगगाडी आहे. प्लॅनेटोरियमही आहे. या टेकडीवरून विजयवाड्याचे मनोरम दृश्य दिसते. ते थेट पुण्यासारखे वाटते. हवामानही तसेच. मुळामुठेऐवजी इथे कृष्णा नदी व तिचे कालवे आहेत. प्रकाशम् बॅरेज हा खेळण्यातल्या किंवा मॉडेलमधील धरणासारखा टेकडीवरून दिसतो.

विजयवाडा ते तिरुपती हे अंतर चारशे किलो मीटर्सचे आहे. या देवस्थानमध्ये राहण्यासाठी उत्तम व्यवस्था आहे. तिरुपती देवस्थान ज्या पर्वतावर आहे, त्या पर्वताचे नाव अनेक युगांत वेगवेगळे होते. द्वापार युगात हा पर्वत शेषाचल म्हणून प्रसिद्ध होता. त्रेतायुगात हा पर्वत अंजनाचल आणि कृतयुगात वृषभाचल म्हणून ओळखला जात होता. पुराणातील कथेनुसार प्राचीन काळी हा पर्वत म्हणजे स्वर्गातील मेरू पर्वताचा एक भाग होता, या पर्वतावर अधिराज्य कोणाचे यावरून आदिशेष हा सर्पांचा राजा आणि वायू यांच्यात वाद निर्माण झाला. वायूने

आपल्या प्रचंड झोताने मेरू पर्वताची शिखरे पाडून टाकण्याचा प्रयत्न केला असता शेषाने त्यावर छाया धरून ही शिखरे वाचविली तेव्हा शेष आणि वायू यांचा प्रचंड संघर्ष झाला. या संघर्षात मेरू पर्वताचे जे तुकडे पृथ्वीवर पडले, त्यांपैकी एक म्हणजे हा व्यंकटाचल पर्वत. व्यंकटेश्वराच्या निवासामुळे हा व्यंकटाचल म्हणून ओळखला जाऊ लागला.



**तिरुपतीचे बालाजी मंदिर**

तिरुपतीचे बालाजी मंदिर हे भारतातील सर्वात श्रीमंत देवस्थान. दीडशे वर्षांपूर्वी म्हणजे १८३३ साली या मंदिराचे वार्षिक उत्पन्न दोन लाख रुपये आणि खर्च ७३ हजार रु. होता. आता या रकमा कोट्यवधी रुपयांच्या घरात आहेत. आंध्रचे मुख्यमंत्री यांनी देवाला एक कोटी रुपयांचा सोन्याचा मुकुट अर्पण केला आहे. रोख रकमा, सोने, चांदी याशिवाय उंची वस्त्रे, धान्य, तूप, दूध, तेल अशा इतर लक्षावधी रुपयांच्या वस्तू प्रतिवर्षी देवाला वाहिल्या जातात. या सर्वात अगदी वेगळी वस्तू वाहिली जाते ती म्हणजे केस. बालाजीचे भक्त येथे मुंडण करून घेऊन देवाला केस वाहतात, गंगावने, टोप इत्यादींसाठी या केसांचा उपयोग होतो. लक्षावधी वारकऱ्यांचे व वारकरी स्त्रियांचे केस विकून मंदिराला प्रचंड रकमा येतात.

आंध्रच्या एका टोकाला, मद्रासपासून अधिक जवळ असलेल्या तिरुमलवर श्री विष्णूचे वास्तव्य कसे झाले याची आख्यायिका अशी आहे : एकदा सर्व ऋषी-मुनींत असा वाद निर्माण झाला की सर्वश्रेष्ठ देव कोण ? ब्रह्मदेव, श्रीविष्णू, शंकर अशा विविध देवांचे वेगळेवगळे भक्त होते. त्यांनी आपलाच देव सर्वश्रेष्ठ असा दावा केला. शेवटी भृगु ऋषींच्याकडे सर्वजण गेले आणि या प्रश्नावर त्यांनी निर्णय द्यावा अशी विनंती करण्यात आली. भृगुऋषींनी या तिन्ही देवांना समक्ष भेटून या प्रश्नाची तड लावायची असे ठरवले. ते ब्रह्मदेवाकडे गेले आणि त्यांनी ब्रह्मदेवाचे गुणगान केले व त्याला साष्टांग नमस्कार घातला. पण ब्रह्मदेवाने त्यांच्याकडे लक्ष दिले नाही तेव्हा भृगुऋषींनी त्याचे नाव सर्वश्रेष्ठ देवांच्या यादीतून काढून टाकले. त्यानंतर ते कैलासाला गेले आणि त्यांनी शंकराची स्तुतिस्तोत्रे गायली, पण त्या वेळी शंकर हे पार्वतीबरोबर सारीपाट खेळत होते. त्यांनीही भृगुऋषींकडे दुर्लक्ष केले. अर्थातच भृगुऋषींनी त्याचेही नाव सर्वश्रेष्ठ देवांच्या यादीतून काढून टाकले. मग ते श्रीविष्णूकडे गेले. श्रीविष्णू त्या वेळी शेषावर आराम करीत होते. भृगुऋषींनी श्रीविष्णूची स्तुती आरंभली, पण विष्णूने तिकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले. तेव्हा मात्र भृगुऋषींना अतिशय राग आला आणि त्यांनी श्रीविष्णूच्या छातीवर जोरात लाथ मारली.

पण श्रीविष्णूचा मोठेपणा असा की, भृगुऋश्रषींनी त्याला लाथ मारली असतानाही त्यांनी त्याचा राग धरला नाही. उलट, भृगुऋषींचा पाय धरून श्रीविष्णू म्हणाले, ''आपल्या पायाला लागले तर नाही ? मी आपली सेवा

करू का ?'' हे पाहून भृगुऋषी प्रसन्न झाले आणि त्यांनी श्रीविष्णूंना सर्वश्रेष्ठ देव ठरवले. श्री विष्णूंना त्याचा आनंद झाला, तरी आपल्या पतीला भृगुऋषींनी लाथ मारलेली लक्ष्मीला मात्र खपली नाही. ती संतप्त झाली आणि वैकुंठाचा त्याग करून ती पृथ्वीवर आली. त्यावेळी श्रीविष्णूही वैकुंठ सोडून पृथ्वीवर या व्यंकटाचल पर्वतावर येऊन राहिले.

भारताच्या पश्चिम किनाऱ्याशी समांतर अशी सह्याद्रीची रांग महाराष्ट्रात आहे, तशी पूर्व किनाऱ्यावर तेथील किनाऱ्याशी समांतर अशी जी डोंगरांची रांग आहे, तीवर तीन प्रमुख देवस्थाने आहेत. श्रीशैलम् हे मल्लिकार्जुनाचे स्थान, त्यानंतर मध्यावर अतोबल नारसिंह हे नरसिंहाचे स्थान व त्याखाली वेंकटाचलावर हे श्रीवेंकटेशाचे स्थान. या पवित्र स्थळाबद्दल श्री. श्री. ना. बनहट्टी यांनी म्हटले आहे, ''वेंकट हा शब्द मराठीत फार पूर्वीपासून योजिलेला आढळतो. 'जे खळांची वेंकटी सांडो' असा ज्ञानेश्वरीच्या पसायदानात एक पाठ आहे. वेंकटी म्हणजे वाकडेपणा, कुटिलता, वेंकट म्हणजे वाकडे, वाईट, ते नष्ट करणारा देव तो वेंकटेश्वर. व्यंकटेशाचे दर्शन हा एक अविस्मरणीय अनुभव आहे. आपल्या देशात आपल्या धर्माची जी पवित्र आणि रमणीय स्थाने आपल्या अंतःकरणात कोरल्यासारखी अढळ राहतात त्यात हरिद्वारची हरीची पायरी, वाराणसीची विशाल गंगा यांच्याप्रमाणेच गिरीचे व्यंकटेश्वर मंदिर याची गणना केली पाहिजे. हे ठिकाण रमणीय, तेथपर्यंत पोचण्याचा मार्ग रमणीय आणि तेथील देवाचे दर्शन रमणीय. एकाच दृष्टीभेटीने ते अंतःकरणात स्थिर होते.''

(जोडयात्रा : प्रथमा पृष्ठ १०)

पल्लव, चौल, पांड्य अशा अनेक राजघराण्यांनी या मंदिराला अमाप द्रव्य दिले आहे. नागपूरचे मराठ्यांचे सेनापती रघोजी भोसले यांनीही व्यंकटेश्वराला बहुमोल हार अर्पण करून देवस्थानच्या पूजा-अर्चेसाठी आर्थिक व्यवस्था केली आहे.

व्यंकटेश्वर बालाजी हे श्रीविष्णूचे स्वयंभू स्थान आहे. यादवांच्या काळी शैव आणि वैष्णव यांच्यात हे देवस्थान कोणाचे असा संघर्ष निर्माण झाला. त्या वेळी रामानुजांनी अशी तोड सुचविली की मंदिराचे दरवाजे बंद करून रात्रभर ते तसेच ठेवायचे. आत शंकर आणि विष्णू या दोन्ही देवतांची

आयुधे ठेवायची. सकाळी ज्या देवाची आयुधे व्यंकटेश्वराच्या अंगावर असतील त्या पंथाचे ते देवस्थान आहे असे ठरवायचे. त्याप्रमाणे आत आयुधे ठेवण्यात आली आणि रात्रभर रामानुज पहारा करीत बसले. सकाळी सर्वांसमक्ष मंदिराचे दरवाजे उघडण्यात आले, तेव्हा देवाच्या अंगावर शंख, चक्र इत्यादी विष्णूचीच आयुधे दिसली तेव्हा हे वैष्णवपंथीयांचे मंदिर आहे असा निर्णय रामानुजांनी दिला. ते वैष्णवपंथीय पीठ मानले जाऊ लागले.

मंदिराकडे जाताच, देवदर्शन घेऊन कोण आले व अजून दर्शन घेणारे कोण आहेत हे स्पष्टपणे लक्षात येते. कारण दर्शन घेऊन आलेले स्त्री-पुरुष व मुले यांचे मुंडण केलेले असते. ज्यांचे केस शाबूत आहेत त्यांना अद्याप देवदर्शन झालेले नाही हे ओळखावे. आत गेल्यावर एका मोठ्या मंडपात सामुदायिक मुंडण करण्याचे प्रचंड कार्य चाललेले दिसते. त्यापुढे एक कुंड आहे. त्यात भक्तलोक स्नान करीत असतात. स्नान करून मुख्य मंदिराकडे जाणारे लोक 'व्यंकटरमणा', 'गोविंदा' अशा गर्जना करीत प्रचंड गर्दीतून पुढे सरकत असतात.


तिरुपती मंदिरात अनेक मंडप आहेत. येथील कल्याण मंडपात विवाहोत्सव साजरा करण्याची प्रथा आहे. ही परंपरा साडेतीनशे वर्षांची आहे. येथे उत्सवमूर्तीचा दोन वधूंशी विवाह करण्यात येतो व त्या वेळी विवाहाचे मंत्र वगैरे म्हटले जातात व वरातही निघते. सोळाव्या शतकात दोन विवाह करण्याची प्रथा होती. अशा तऱ्हेच्या विवाहाचा उल्लेख १५४६ सालच्या एका शिलालेखात आहे. त्याशिवाय ब्रह्मोत्सव, कल्याणोत्सव, सहस्रनाम उत्सव, कोडाई तिरुनल उत्सव, सहस्रकलाभिषेक उत्सव, रथसप्तमी उत्सव असे अनेक उत्सव येथे साजरे होतात. रंगनायकूल मंडपाजवळच्या मंडपाला प्रतिमा मंडप म्हणतात. त्यात व्यंकटापतिराज याचा पुरुषभर उंचीचा पुतळा आहे. या मंडपात विजयनगरचे राजे व राण्या यांच्या देखण्या मूर्ती आहेत. सम्राट कृष्णदेवराय त्यांच्या राण्या चित्रादेवी आणि तिरुमलादेवी, अच्युतराय व राणी वरदराजी यांच्या या मूर्ती आहेत. त्यापुढे तिरुमलराय मंडप आहे. या मंडपातील स्तंभावर पुराणातील अनेक दृश्ये कोरली आहेत. ती पाहून कर्नाटकातील होयसाळ मंदिरांची आठवण होते. हळेबीड व बेलूर येथे असे स्तंभ आहेत.

तिरुमलराय मंदिरात मुरलीवादन करणारा श्रीकृष्ण, कोदंडधारी राम, श्रीकृष्ण व गोपी यांच्या मूर्ती स्तंभावर आहेत. काही अंतरावर सम्राट अकबराचा प्रधान तोडरमल आणि त्याची राणी यांच्या तांब्याच्या मूर्ती आहेत. ते दोघे व्यंकटेश्वराचे भक्त होते.

मंदिराच्या आवारात वेदांताच्या विशिष्टाद्वैत पंथाचे संस्थापक रामानुजाचार्य यांचे मंदिर आहे. वेंकटेश्वराची पूजा, स्तोत्रपठण, अर्चना इत्यादींची प्रथा रामानुजाचार्य यांनी जशी घालून दिली, तशीच आजही चालू आहे. व्यंकटेश्वराची बहुतेक स्तोत्रे रामानुजाचार्य यांनी रचली असून उरलेली त्यांच्या शिष्यांनी लिहिली आहेत. दक्षिणेत सर्वत्र मंदिराच्या आवारात दिसणारा ध्वजस्तंभ येथेही आहे. जवळच आयने महाल आहे. ध्वजस्तंभ मंडपातील एका स्तंभावर त्रिमूर्ती आहे. ती हंसारूढ आहे. ध्वजस्तंभ भक्कम सागवानाचा असून त्यावर तांब्याचा पत्रा आहे. या पत्र्यावर कालियामर्दन व पुराणातील इतर अनेक दृश्ये कोरलेली आहेत. कल्याण मंडपातही उत्कृष्ट आणि विपुल शिल्पाकृती आहेत. हंपी येथील विठ्ठल मंदिराची ही शिल्पे पाहताना आठवण होते.

या कल्याण मंडपाचे वैशिष्ट्य असे की, याच ठिकाणी व्यंकटेश्वराचा विवाह झाला असे सांगतात. त्यामुळे या मंडपात वर्षातून केव्हाही विवाह करता येतो. त्यासाठी मुहूर्ताची आवश्यकता नसते. येथून गर्भगृह जवळच आहे. 'व्यंकटरमणा' 'गोविंदा' या घोषणांनाही जोर चढतो. गर्भगृहाच्या प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूंना जयविजय हे द्वारपाल आहेत. या मूर्ती भव्य असून तांब्याच्या आहेत. गर्भगृहात शिरल्याबरोबर बालाजीची दहा फूट उंचीची मोठी मूर्ती चटकन नजरेत भरते. त्याच वेळी मूर्तीच्या मुखावर डोळे व नाक झाकणारी पांढरी पट्टीही आपले लक्ष वेधून घेते. व्यंकटेश्वराच्या डोळ्यांचे तेज इतके तीव्र व उग्र आहे की, मानवांना ते सहन होणार नाही म्हणून डोळ्यांवर पट्टी घातली आहे. मात्र पुराणात याची दुसरीही उपपत्ती सांगितली आहे. ती अशी की, जेव्हा भृगुऋषींनी श्रीविष्णूच्या छातीवर लाथ मारली, तेव्हा लक्ष्मी रागाने कैलास सोडून पृथ्वीवर आली. तिचा शोध घेण्यासाठी श्रीविष्णू शेषाचल पर्वतावर आले. तेथे ते एका बिळात जाऊन जप करीत बसले. ब्रह्मदेवाने गायीचे रूप घेतले व ती गाय बिळात जाऊन श्रीविष्णूंना दूध देऊ लागली. गायीचे दूध कमी का होते याचा शोध

घेण्यासाठी एकदा गायीचा मालक तिच्या मागून गेला व ती दुसऱ्याला



श्री. बालाजीची मूर्ती

चोरून दूध देते ते त्याने पाहिले. तेव्हा त्याने रागाच्या भरात कुऱ्हाड उचलली आणि ती गाईच्या मस्तकावर तो मारणार तोच श्रीविष्णूंनी मधे पडून तो घाव झेलला. त्या घावाने कपाळावर झालेली जखम झाकण्यासाठी ही पट्टी लावली आहे.

व्यंकटेश बालाजीची शालिग्रामाची मूर्ती दहा फूट उंच असून ती कमळावर उभी आहे. कानात कर्णफुले, खांद्यावर नाग आणि आणि केशसंभार आहे. ती प्रसन्नवदन आहे. मूर्ती चार हातांची असून एका हातात चक्र व दुसऱ्या हातात शंख आहे. एक हात भक्तांना अभय देणारा आहे. मूर्तीच्या पायात नक्षीदार साखळ्या आहेत. मूर्तीच्या अंगावर इतके दागिने व फुलांच्या माळा असतात की मूर्तीचे मूळ सौंदर्य नजरेस पडत नाही. व्यंकटेश्वराचे अनेक मुकुट आहेत. त्यात हिरे, पाचू, माणिक वगैरे बहुमोल रत्ने आहेत. १५१३ साली विजयनगरचा सम्राट श्रीकृष्णदेवराय याने रत्नजडित सुवर्णमुकुट देवाला अर्पण केला होता. पुराणकथानुसार व्यंकटेशाचा विवाह पद्मावतीशी झाला, तेव्हा वधूपित्याने बहुमोल मुकुट अर्पण केला होता. तिरुपतीहून पाच किलो मीटर्सवर पद्मावतीचे मंदिर आहे.

❑

# ८. राजमहेंद्री आणि विशाखापट्टम्

राजमहेंद्री हे आंध्रमधील एक महत्त्वाचे शहर आहे. या ठिकाणी गोदावरी नदीवर जो पूल आहे तो इतका लांब आणि भव्य आहे की हा भारतातील सर्वात अधिक लांबीचा पूल म्हणून मान्यता पावला आहे. या ठिंकाणी गोदावरीचे पात्र नेत्रदीपकपणे रुंदावल्याने हा पूल रुंदीलाही बराच मोठा आहे. गोदावरी नदीच्या काठी आणि शहराच्या इतर भागात शेकडो मंदिरे आहेत. घाटावरून नदीचे जे दर्शन होते ते चांगलीच छाप टाकून जाते. इथे गोदावरीचे पात्र अतिशय रुंद आहे हे एक कारण आहेच. पण नदीवरचा डबलपूल हेही एक वेगळे दृश्य आहे. आगगाडी आणि मोटारी यांच्यासाठी एकाखाली एक असे इथे दोन पूल आहेत. त्यावरची वाहतूक खेळण्यातल्यासारखी वाटते. नदीच्या काठच्या गोदावरी मंदिरातील मूर्ती अत्यंत सुबक व देखणी आहे. त्याशिवाय उभा मार्कंडेय मंदिर, चैतन्य प्रभू मंदिर, पांडुरंग मंदिर, नंदी मंदिर व इतर अनेक लहान मंदिरे आहेत. इतर धार्मिक स्थळाप्रमाणे येथेही पुरोहित धर्मकृत्ये करताना दिसतात. गोदावरी मंदिरापासून पुलाच्या दिशेने काठावरून गेल्यावर डावीकडे बांबूचा मोठा बाजार दिसतो. उजवीकडे नदीच्या पात्रात असंख्य बांबू तरंगताना दिसतात. नदीच्या उगमाच्या दिशेने काठावरच्या जंगलातून हे बांबू तोडून नदीत टाकले जातात व प्रवाहाच्या गतीने येथवर आल्यावर नावेतील नोकर हे बांबू कडेला आणून बांधून ठेवतात किंवा वर काढून बाजारात विक्रीसाठी ठेवतात, हे दृश्य गमतीचे वाटते.

राजमहेंद्रीच्या म्युनिसिपल मार्केटसमोर श्रीराम मंदिर आहे. जवळच रामकृष्ण मिशनचे केंद्रही आहे. अंजनेय मारुती, तिरुपती ही राजमहेंद्रीची आणखी काही उल्लेखनीय मंदिरे. स्थानिक बस स्टँडजवळचे राममंदिर लहान व बरेच दुर्लक्षित आहे. तिरुपती व्यंकटेश्वरच्या मंदिराला मोठे नक्षीदार गोमुख आहे. या मंदिराच्या आवारात काशी विश्वेश्वर मंदिर आहे, पण महाराष्ट्रापासून इतक्या दूर कोल्हापूरच्या महालक्ष्मीचेही मंदिर या आवारात असल्याचे पाहून आनंद वाटतो. मध्वाचार्य आणि राघवेंद्राचार्य यांचेही मठ आहेत. वांकायलवर भागात शृंगेरी जगद्गुरूंचे शारदापीठ आणि गोपालस्वामी मंदिर ही भक्तांची

खास आकर्षणे आहेत. सुगराय वस्तुसंग्रहालयात प्रेक्षणीय दगडी मूर्ती आहेत. राजमहेंद्रीपासून आठ किलो मीटर्सवर भद्राचलम् देवस्थान आहे.

राजमहेंद्रीपासून विशाखापट्टम् हा रस्ता सुमारे साडेपाच तासांचा आहे. विशाखापट्टम् हे भारतातील एक प्रमुख बंदर आहे.

विशाखापट्टणम् हे समुद्रकिनारी, डोंगराच्या कुशीत खूपच अस्ताव्यस्त पसरलेलं असं संमिश्र शहर आहे. विझाग हे त्याचं सुटसुटीत व प्रचारातलं नाव आहे. या शहराचा इतिहास फार जुना- महाभारत काळापासूनचा- आहे. भीमाने या भागातील दगडांनी अनेक राक्षसांना मारले होते आणि जवळच्या भीनली पट्टम् येथे भीमाचे वास्तव्य होते अशी आख्यायिका आहे. गौतम बुद्धाच्या काळातही येथे वस्ती होती व त्या काळातील काही अवशेष येथे सापडले होते. वाराणसीजवळ सारनाथ येथे गौतम बुद्धाने पहिले प्रवचन दिले. त्या वेळी वाराणसी ऊर्फ काशी आणि विशाखापट्टण यांच्यात दळणवळण होते. विशाखापट्टणम् हे लांबलचक नाव या गावाला कसे पडले, तर पट्टणम् याचा अर्थ बंदर असा आहे. अकराव्या शतकात वेंगी या राजाच्या अमलाखाली हा प्रदेश होता, तेव्हा वैशाखा या देवीचे मंदिर त्याने बांधले. वैशाखा ही कालीसारखी शौर्याची देवता आहे. ही वैशाखा देवी आणि बंदर या अर्थी पट्टणम् मिळून विशाखापट्टणम् हे नाव या शहराला पडले, प्रत्यक्ष बोलण्यात शेवटचा 'म्' कोणी वापरीत नाही.

हे उत्तम बंदर असल्याने युरोपमधून भारतात आलेल्या फ्रेंच, डच आणि ब्रिटिश यांची नजर साहजिकच या शहराकडे गेली. प्रथम फक्त मासेमारीसाठी उपयुक्त असलेल्या या बंदरात युरोपियनांनी व्यापारी वखारी उघडल्या, जहाजदुरुस्तीचे कारखाने सुरू केले व हळूहळू या लहान गावाचे प्रचंड औद्योगिक शहरात रूपांतर झाले. विशाखापट्टणम्मध्ये फिरताना एक अगदी वेगळी गोष्ट लक्षात येते ती ही की, एखाद्या प्रचंड अजगराने विळखा घालावा तसा नऊ किलो मीटर्सचा दीर्घ लांबीचा कन्व्हेवर बेल्ट गावात जागोजागी दिसतो. उंच लोखंडी पायाडावर उभारलेला हा बेल्ट बंदरातील सामानाच्या वाहतुकीसाठी आणि हिंदुस्थान शिपयार्डच्या कामासाठी आवश्यक आहे. आशियातील सर्वात मोठा असा कन्व्हेयर बेल्ट शहराला अनेक ठिकाणी विळखे घालून जातो. डॉल्फिन नोज या टेकडीवरून तो बेल्ट दिसतो. या टेकडीवरील व्यंकटेश मंदिर लक्षात राहण्यासारखे आहे. विशेषतः तेथील गरूड युतीवर

असलेली ग्रीक शैलीची मुद्रा हिचे पाश्चात्याशी नाते सांगते. कारण कॅप्टन ब्लॅकमूर याने ब्रिटिश अमदानीत हे मंदिर बांधले. जवळच दुसऱ्या टेकडीवर रोमन कॅथालिक चर्च आणि इसाक मदिना दर्गा ही प्रार्थना स्थळे असल्याने या शहरातील मिश्र वस्तीची कल्पना येते.

डॉल्फिन नोज या नावाने प्रसिद्ध असलेल्या टेकडीचा आकार डॉल्फिन माशाच्या मुखासारखा आहे म्हणून त्याला हे नाव पडले आहे. सुमारे एक हजार फूट उंच व समुद्रकाठी असलेली ही टेकडी दीपगृहासाठी आदर्श ठिकाण आहे. म्हणून १९५७ साली येथे एक भव्य दीपगृह उभारले. त्यावरच्या दिव्यांची शक्ती सत्तर लाख कॅण्डल्सची आहे. आसपासच्या सत्तर किलो मीटर्स भागातील समुद्रात फिरणाऱ्या जहाजांना व बोटींना या दीपगृहाचे मार्गदर्शन मिळते. आपल्याकडे पुण्याला पर्वती चढण्यासाठी पायऱ्या आहेत, तशा या टेकडीवर चढण्यासाठी पायऱ्या आहेत. या टेकडीवरच व्यंकटेश मंदिरही आहे. येथून विशाखापट्टणमचे अतिशय मनोहर असे विहंगम दृश्य दिसते. नौकानयन व नौकांची दुरुस्ती यासाठी येथे डोंगर फोडून समुद्राचे पाणी आत घेतले आहे. दूरवर निळ्या सुंदर समुद्रात अक्षरशः शेकडो लहान- मोठ्या नावा व बोटी तरंगताना दिसतात, हे दृश्य आपल्या मनावर छाप पाडते.

भारतातील सर्वात मोठी जहाजबांधणी व दुरुस्ती कारखाना ‘हिंदुस्थान शिपयार्ड’ हा विशाखापट्टममध्ये आहे. या अवाढव्य कारखान्याने तेवीस हेक्टर जागा व्यापली आहे. या कारखान्याची उभारणी मुख्यतः वालचंद हिराचंद यांनी केली. कारखान्यात जहाजबांधणी व जहाजदुरुस्ती बरोबरच पाणबुड्यांच्या निर्मितीचेही केंद्र आहे. हजारो कामगार काम करताना प्रचंड आवाज आणि सर्वत्र जहाजांचे भाग तयार होत असल्याचे, हळूहळू सरकत जाणारा अवाढव्य बेल्ट इत्यादी पाहून या कारखान्याचे अजस्र स्वरूप आपल्या लक्षात येते. कोणत्याही प्रगत देशाला अभिमान वाटावा असा हा कारखाना आहे.


विशाखापट्टणमजवळचे एक महत्वाचे प्रेक्षणीय आणि धार्मिक स्थळ म्हणजे सिंहाचलम्. सिंहगिरी या टेकडीवर असलेले हे मंदिर दरसाल लाखो भाविकांना आकर्षित करते. विशाखापट्टणम शहरापासून हे ठिकाण बारा किलो मीटर्सवर आहे. रिक्षा टेकडीच्या पायथ्यापर्यंतच जाते, पण तेथे बस स्टँड आहे आणि अल्प दरात टेकडीवर आणि मंदिरासमोर जाणारी बस लगेच मिळते. ही

सिंहगिरी टेकडी आठशे मीटर्स उंच आहे. ज्या भक्तांना टेकडी चढून जायचे आहे, त्यांच्यासाठी एक हजार पायऱ्यांचा वेगळा रस्ता आहे. घाट रस्त्याने जाताना खाली रमणीय दृश्य दिसते. हिरवीगार झाडी आणि अधूनमधून तीतून दिसणारी कौलारू घरे हे घरेलू दृश्य मोहक दिसते.

तेथे बस-स्टँडवरच देवस्थान कमिटीकचेरी आहे. तेथे तिकीट घ्यावे आणि मग मंदिरात जाण्यासाठी रांगेत उभे राहायचे अशी व्यवस्था असे. या बस स्थानकापर्यंत येईपर्यंत मंदिरांच्या भैरवद्वार आणि हनुमानद्वार अशा दोन कमानी लागतात. मुख्य मंदिराकडे जाताना इतर सर्व मंदिरांप्रमाणे नारळ, हळदी-कुंकू, हार, फुले, खेळणी यांची दुकाने लागतात. प्रथम पायऱ्या, मग रांग धरण्याचे रेलिंग लागते. मंदिराबाहेर उंचच उंच ध्वजस्तंभ आहे. तो सुमारे साठ फूट उंच असावा. मंदिराभोवती उंच तटबंदी आहे. कन्याकुमारी, श्रीशैलम् येथील मल्लिकार्जुन मंदिर या मंदिरासारखीच ही तटबंदी आहे. सर्व मंदिरे पूर्वाभिमुख असतात, पण हे मंदिर पश्चिमेकडे मुख असलेले आहे. या मंदिराचा शिल्पकार आपल्या गावाहून मंदिर बांधण्यासाठी निघाला, तेव्हा त्याची पत्नी गरोदर होती. मंदिर बांधण्यासाठी अनेक वर्षे लागली. तरी तो मूर्तीकार परत आपल्या गावी गेलाच नाही. दरम्यान त्याचा मुलगा मोठा झाला. मंदिर बांधणाऱ्या कलाकाराने हे मंदिर दगडी रथावर बांधले होते व तेव्हा ते मंदिर पूर्वाभिमुख होते. या दगडी रथाला दगडी घोडेही जोडलेले होते. मंदिर बांधणाऱ्या कलाकाराचा मुलगा मोठा झाला व आपल्या पित्याला भेटण्यासाठी सिंहगिरीवर आला. मंदिर पाहून तो अत्यंत प्रभावित झाला. इतके सुंदर मंदिर आपल्या मातेने पाहावे असे त्याला वाटले. त्याने आपल्या मंत्रशक्तीने मंदिराचे दगडी घोडे जिवंत केले आणि मंदिर फिरवून पश्चिमाभिमुख केले. कारण त्याच्या आईचे गाव पश्चिमेस होते. जेव्हा मंदिराचा शिल्पकार तेथे आला, तेव्हा तो अत्यंत संतप्त झाला. मंदिर फिरविणारा आपला मुलगा आहे हे त्याला माहीत नव्हते. त्याने क्रोधाच्या भरात मुलाला व घोड्यांना ठार केले. तेव्हा मंदिर फिरण्याचे थांबले व तसेच पश्चिमाभिमुख राहिले अशी या मंदिराची कथा आहे.

या कथेप्रमाणेच सिंहाचलम् मंदिराशी इतरही अनेक पौराणिक कथा व लोककथा निगडित आहेत. येथील मूळ मंदिर भक्तप्रल्हाद याने बांधले होते असे सांगतात. याच सिंहगिरीवरून प्रल्हादचा बाप हिरण्यकश्यपू याने

प्रल्हादला खाली फेकले होते. कारण प्रल्हाद विष्णूचा भक्त होता. नंतर विष्णूने नरसिंहाचे रूप घेऊन हिरण्यकश्यपूचे पोट फाडून त्याचा वध केला. ही कथा प्रसिद्धच आहे. नंतर अनेक वर्षे हे मंदिर दुर्लक्षित राहिले. राजा पुरुरवा हा उर्वशीसह रथातून जात असता आकाशवाणी झाली व त्याला या मंदिराचा पुनरुद्धार करण्याचा संदेश मिळाला. इतिहासकाळात कलिंग देशचा राजा नरसिंहदेवराज याने या मंदिराचे पुन्हा पुनरुज्जीवन केले. त्यानेच कोणार्कचे सुप्रसिद्ध सूर्यमंदिर बांधले आहे. हे मंदिर मुळात शैवांचे होते, पण रामानुज या वैष्णव संताच्या प्रभावाने ते वैष्णवांचे मंदिर झाले. मंदिरातील वराह नरसिंह



**सिहाचलम् मंदिर**

मूर्तीला चंदनाचा लेप देण्याची दीर्घ परंपरा आहे. त्याच्या दोन उपपत्ती ऐकायला मिळाल्या. दीर्घ परंपरा आहे. त्याच्या दोन उपपत्ती ऐकायला मिळाल्या. एक अशी : हिरण्यकश्यपूवर रागावल्यामुळे विष्णूला झालेला कोप शमन करण्यासाठी चंदनाचा लेप देण्यात येतो. दुसरी उपपत्ती अशी की रामानुज यांनी शैवांची मूर्ती वैष्णवांची करण्याची आज्ञा दिल्यामुळे गवंड्यांनी जेव्हा फोडण्यास सुरुवात केली तेव्हा तिच्यातून रक्त येऊ लागले, म्हणून चंदन लावण्याची प्रथा पडली.

या मंदिराला अनेक मंडप आहेत आणि ते नक्षीदार स्तंभ व छतांनी सुशोभित केलेले आहेत. वायव्य दिशेला वैशाख आणि ज्येष्ठ मंडप आहेत, ते

खास समारंभासाठी बांधलेले आहेत. कल्याण मंडप हा खास विवाहासाठी आहे. चैत्र महिन्याच्या एकादशीस या मंडपात नरसिंहाचा विवाह होतो. सभामंडपात सोळा नक्षीदार स्तंभ आहेत. मंदिराच्या गाभाऱ्याच्या प्रवेशद्वाराजवळ नवगृह कोरलेले आहेत. गाभाऱ्यातून आत गेले की, शिवलिंगासारखी मूर्ती दिसते, पण ती नरसिंहमूर्ती असून तिच्यावर चंदनाचा भारी लेप लावल्यामुळे मूळ मूर्तीचे दर्शन होत नाही. फक्त वैशाख तृतियेला लेप काढण्यात येतो व मूर्तीचे दर्शन घडते. तेव्हा येथे उत्सव होतो व लाखावर जत्रा जमते. वराह नरसिंह मूर्तीच्या मंडपाला प्रल्हाद मंडप असेही म्हणतात. मूळ मूर्तीला वराहाचे मुख असून त्रिभंगी अवस्थेत ती दिसते. वराहाचे मुख असले तरी मूर्तीचे शरीर मानवी आहे व तिला दोन हात आहेत. रथसप्तमीला ही मूर्ती बाहेर पोर्चमध्ये आणून तिची खास पूजा होते.

कप्पुस्तंभ नावाचा एक स्तंभ मंदिराच्या आवारात आहे. त्या स्तंभाला मिठी मारून देवाकडे काहीही मागितले तरी ते मिळते अशी भक्तांची समजूत आहे. या स्तंभाला मिठी मारण्यासाठी पाच रुपयाचे तिकीट काढावे लागते. निपुत्रिकांनी या स्तंभाला मिठी मारून पुत्रप्राप्तीची मनोकामना व्यक्त केली तर ती पूर्ण होते या समजुतीने अनेकजण या स्तंभाचे तिकीट काढतात. मंदिराच्या गाभाऱ्याच्या भिंती बाहेरूनही उत्कृष्ट शिल्पाने सजलेल्या आहेत. या भागात नरसिंहाच्या अनेक रूपांतील मूर्ती प्रेक्षणीय आहेत. कनकनरसिंह, योग नरसिंह, वीरनरसिंह, भूवराह अशा विविध रूपांतील या नरसिंहमूर्ती आहेत. हिरण्यकश्यपूचे पोट फाडतानाची नरसिंहाची पारंपरिक मूर्तीही येथे आहे. मंदिराच्या आवारातील दगडी रथ कोनार्कच्या रथाची आठवण करून देतो. असाच एक दगडी रथ हंपी येथील विजयनगर साम्राज्याच्या अवषेशातही आहे. सिंहाचलम्‌चा हा रथ १४ फूट लांब व ११ फूट रुंद आहे. उंची आठ फूट आहे. मंदिराचा कल्याण मंडप सर्वात मोठा म्हणजे १०४ फूट लांब व ४५ फूट रुंद आहे. या मंडपात वाद्ये वाजवितानाच्या वादकांच्या सुबक मूर्ती आहेत. मंडपाला ७८ स्तंभ आहेत. नरसिंहदेव राजाच्या सेनापतीने हा कल्याण मंडप बांधला. नागस्तंभ, चौरोधारी युवतीचा स्तंभ असे अनेक कलात्मक स्तंभ प्रेक्षणीय आहेत. तिरुपतीप्रमाणे या मंदिराच्या आवारातही केशवपनाची व्यवस्था आहे.

❑

# ९. सांस्कृतिक आंध्र

आंध्र आणि कर्नाटक या राज्यांत नाटकांचा सर्वात जुना प्रकार म्हणजे यक्षगान. या प्रकारात साहित्य, संगीत आणि नृत्य यांचे सुखद मिश्रण असते. कथा बहुतेक देवादिकांच्या असतात. आंध्रमधील यक्षगान हे एक हजार वर्षांपूर्वीपासून चालत आले आहे. त्यावेळच्या राजे-महाराजांनी यक्षगानाला उदार आश्रय दिल्याने त्यांची उत्तम वाढ झाली. सुग्रम्या यांचा १५५० सालचा 'सुग्रीव विजय' याची साक्ष देतो. मात्र सुरुवातीचे यक्षगान लिखित स्वरूपात नव्हते. ते निरनिराळ्या कलावंतांनी आपल्या वाडवडिलांच्याकडून शिकून पुढील पिढ्यांपर्यंत पोचविलेले असे. विधी या नावाचाही एक नाट्यप्रकार पूर्वी असे. ही नाटके पद्यरुपात होती. कालिदासांच्या 'अभिज्ञान शाकुंतल' चा पद्यमय अनुवाद तेलगूत झाला होता, तसेच 'प्रबोध चंद्रदोय' या नाटकाचाही पद्यमय अनुवाद झाला होता.

आंध्रमध्ये आणि कर्नाटकमध्ये नाटकमंडळ्या स्थापन होण्यास सुरुवात झाली. ती 'धारवाड नाटक समाजा' च्या स्थापनेने. या कंपनीने हिंदी नाटके रंगभूमीवर आणली. 'रास्कूट नाटक कंपनी' हे नावही महत्त्वाचे आहे. या दोन कंपन्यांच्या काळात नाटक पद्यावरून गद्यावर आले. सुरुवातीच्या तेलगू गद्य नाटकात संस्कृत आणि इंग्रजी नाटकांचेच अनुवाद प्रामुख्याने होते. हळूहळू नेपथ्य, प्रकाशयोजना यांचाही वापर होऊ लागला. त्यामुळे नाटकाचे नाटकपण प्रेक्षकांच्या मनावर अधिक परिणामकारकरीत्या ठसले. नाटक या माध्यमाची लोकप्रियता वाढली, तसे नवीन नवीन नाटक कंपन्या आणि नाटक समाज यांचे प्रमाणही वाढले. त्यांना आजच्या प्रथेत नाट्यक्लब म्हणता येईल. नाटक मंडळी आणि क्लबमध्ये महत्त्वाचा फरक असा की, नाटक मंडळ्या या व्यावसायिक होत्या आणि आपला प्रपंच घेऊन त्या गावोगाव प्रयोग करीत. उलट नाटक समाज या हौशी लोकांच्या संस्था होत्या. इतर नोकरी अथवा उद्योग करून ते केवळ हौस म्हणून नाटके करीत व त्यांचे प्रयोग बव्हंशी गावातल्या गावातच होत असत. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरपर्यंत आंध्रमध्ये नाटकांची ही स्थिंती होती.

१८६० साली कोराड रामचंद्र शास्त्री यांनी लिहिलेले 'मंजरी मधुकरीयसु' हे तेलगूमधील पहिले स्वतंत्र नाटक होते. या नाटकाचे कथानक काल्पनिक होते आणि त्या नाटकाची शैली 'वेणीसंहार' च्या धर्तीवर होती. १८७५ साली रंगाचर्हायू यांनी कालिदासाच्या शाकुंतल या नाटकाचा तेलगू अनुवाद करण्यास प्रारंभ केला, पण ते कार्य त्यांच्या हातून पूर्ण झाले नाही. याच सुमारास कोपकोड वेंकटरत्न यांनी 'नरकासुर विजय' आणि 'प्रसन्न राघव' या संस्कृत नाटकांचे तेलगूमध्ये अनुवाद केले. वीरेश लिंगम् पंतलू यांनी 'रत्नावली', 'शाकुंतल', 'मालविकाग्निमित्रम्', 'प्रबोध चंद्रोदय' या संस्कृत नाटकांचे अनुवाद केले. तसेच 'कॉमेडी ऑफ एरर्स' या इंग्रजी नाटकाचाही 'चमत्कार रत्नावली' या नावाने तेलगूमध्ये अनुवाद केला. त्यांनी अनेक स्वतंत्र नाटके किंवा प्रहसने लिहिली. मात्र त्यांचा उद्देश नाटकांचा कलात्मक आनंद देण्याचा नसून सामाजिक सुधारणा करावी हा होता. त्यांच्या या नाटकात 'प्रल्हाद', 'दक्षिण गोग्रहण', 'हरिश्चंद्र', 'महारण्य पुराधिपत्यमु', 'नाटकोज्जिवकसमाज' इत्यादींचा समावेश आहे. पौराणिक कथानकातही त्यांनी आधुनिक समाजापुढे आदर्श ठेवून समाजाची जडण-घडण करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या प्रगतीशील नाटकांनी समाजातील सनातनी आणि प्रस्थापित लोकांना राग आला, पण सर्वसामान्य लोक मात्र या नाटकावर खूष होते. अनैतिकता, अंधश्रद्धा, जुल्म-जबरदस्ती यांचे बुरखे फाडणारी ही प्रहसने अतिशय लोकप्रिय झाली. 'बलात्कार गान विनोद', 'अपूर्व ब्रह्मचर्य', 'कलहप्रिया' इत्यादी प्रहसनांचा यात खास उल्लेख केला पाहिजे. 'महावंचक', 'योगनिद्रा', 'असहासुर प्रहसन', 'पुनर्मरम' ही प्रहसनेही त्यांच्या प्रतिभेची साक्षी आहेत. त्यांच्या नाटकात संस्कृत आणि इंग्रजी नाटकांचा मोहक संगम झाला आहे. नाटकाच्या माध्यमातून राष्ट्रीय जागृती करण्याचे प्रथम श्रेय तेलगूमध्ये वीरेशलिंगम् पंतलू यांच्याकडे जाते.

वीस नाटके लिहून ती आंध्रमध्ये लोकप्रिय करणारे चिलकमूर्ती लक्ष्मीनरसिंहम् हे तेलगूतील एक महत्त्वाचे नाटककार आहेत. 'गयोपाख्यान' या त्यांच्या नाटकाच्या पाच लाख प्रती खपल्याची नोंद आहे. पिठापुरम् येथील यानगुंटी लक्ष्मीनरसिंहम् यांनी सुमारे चाळीस नाटके लिहिली. त्यात ऐतिहासिक, पौराणिक व सामाजिक नाटकांचा समावेश आहे. 'राधाकृष्ण' आणि 'विप्रनारायण' ही त्यांची नाटके वैष्णवभक्तीवर आधारलेली आहेत. 'कंठाभरणम्' हे त्यांचे नाटक त्या काळी अतिशय गाजले होते. 'प्रचंडचाणक्य',

'बुद्धबोध सुधा' आणि 'चूडामणी' ही त्यांची खास उल्लेखनीय ऐतिहासिक नाटके आहेत. 'कन्याशुलकम्' हे गुजराड अप्पाराव यांचे नाटक अत्यंत खळबळजनक ठरले. आंध्रमध्ये त्या काळी मुलींची विक्री होत असे. त्या क्रूर पद्धतीवर या नाटकात कोरडे ओढले होते. या नाटकाचा आणखी एक विशेष असा की, त्याची भाषाशैली अलंकारिक नसून सर्वसामान्यांना समजेल अशी साधी व सोपी होती. आंध्रमधील लोकजीवनाचे वास्तव प्रतिबिंब या नाटकात आढळते. हे नाटक म्हणजे आजच्या नवनाट्याची प्रभातच आहे. याच काळात श्रीपादकृष्णमूर्ती शास्त्री यांनी 'कलभाषिणी', 'श्रीनाथ', 'कविराजकिथ' इत्यादी नाटके लिहिली. तसेच कूची नरसिंह यांनी 'रूपलता' बापिराजू यांनी 'सागरिका' आणि श्रीनिवासाचार्युलू यांनी 'कानडांगी' ही नाटके लिहून तेलगू नाट्यवाङ्मय मोलाची भर घातली.

एकोणिसाव्या शतकाचे अखेरचे दशक म्हणजे तेलगू रंगभूमीवरचा परिवर्तनाचा काळ. याकाळात पौराणिक आणि ऐतिहासिक नाटके मागे पडली, तशीच केवळ करमणूकप्रधान सामाजिक नाटकेही मागे पडली. समस्याप्रधान, वास्तव, सामाजिक नाटकांना प्राधान्य मिळू लागले. व्यक्तींच्या जीवनातील भावनिक व बौद्धिक समस्यांवरील नाटके लोकप्रिय होऊ लागली. तिरुपती वेंकट यांची 'पांडवोद्योगमु', 'पांडवविजम्' ही त्याकाळची लोकप्रिय नाटके आजही आंध्रमध्ये गर्दी खेचतात. तिरुपती वेंकट यांनी महाभारतातवर पाच नाटके लिहिली आणि त्यांत महाभारताचा आधुनिक काळाशी संदर्भ त्यांनी प्रस्थापित केला. दुर्माक राजशेखर यांनी 'राजाप्रताप चरित्र' लिहिले, ते लोकप्रिय झाले. त्यांनी 'सीताकल्याणमु', 'सीताहरणमु' आणि 'पद्मावती विजयमु' ही नाटकेही लिहिली. विश्वनाथ सत्यनारायण यांच्या 'नर्तनशास्त्र', 'अनारकली', 'त्रिशूलम्' आणि 'वेनुराज' या नाटकांना याकाळात उत्तम प्रतिसाद मिळाला. याशिवाय इच्छापुरम् यज्ञनारायण, पिंगत्रिनागेंद्रराय, नलिजेंपालिल, लक्ष्मीकांतम्, रामानुजराय इत्यादी नाटककारांनीही महत्त्वाचे योगदान केले.

आंध्रमध्ये आता नाट्यक्षेत्रात नवे चैतन्य येत होते. विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकात नव्या दमाचे नाटककार आणि अभिनेते उदय पावले. मात्र याच सुमारास चित्रपटाने नाटकांना शह देण्यास सुरुवात केली. महाराष्टातही हीच परिस्थिती होती, पण ती थोड्या नंतरच्या काळात उद्‌भवली. पूर्वी आंध्रमधील नाटके आपल्याकडील नाटकाप्रमाणेच सहा-सात तास चालणारी होती, पण

पाश्चात्य रंगभूमीवरील अडीच-तीन तास चालणाऱ्या नाटकांचा प्रभाव पडून तेलगूमधील नाटकेही त्याच लांबीची झाली. याचवेळी एकांकिका हा सुटसुटीत प्रकारही सुरू झाला. 'कला' व 'ज्वाला' या तेलगू नियतकालिकांनी एकांकिकांना प्रोत्साहन दिले. यात प्रसिद्ध झालेल्या एकांकिका रंगमंचावरही सादर होऊ लागल्या. राजमन्नार यांची 'निप्पेकरिदी' म्हणजे 'चूक कोणाची' या नाटिकेने तेलगूमध्ये नाटिकांचे नवे पर्व सुरू केले. प्रदीर्घ नाटकांना चित्रपटांचे ग्रहण लागल्यानेही आटोपशीर अशा नाटिकांनी याकाळात चांगले मूळ धरले.

१९३० नंतरच्या काळात बलास्तरी राघवाचार्यलू हे नामवंत तेलगू कलाकार पाश्चात्य देशांचा दौरा करून आले. आतापर्यंत तेलगू रंगभूमीवर पडलेल्या पाश्चात्य नाटकांचा प्रभाव पुस्तकांच्या द्वारेच पडला होता, पण आता पाश्चात्य रंगमंच प्रत्यक्ष पाहून राघवार्यलू यांनी त्यातली नवी तंत्रे व विषय रंगभूमीवर आणण्याकडे लक्ष केंद्रित केले. इब्सनेचा तेलगू रंगभूमीवर प्रभाव हा त्याचा एक महत्त्वाचा परिणाम. गोगेल या रशियन नाटककाराची नाटकेही तेलगू रंगभूमीवर या काळात आली. पु. ल. देशपांडे यांनी याच नाटककाराचे एक नाटक 'अंमलदार' या नावाने मराठीत अनुवादित केले आहे. १९३० नंतरच्या काळात नभोनाट्यांचा प्रारंभ झाला. रंगमंच हा जरी चित्रपटांच्या चढाओढीमुळे मागे पडत होता, तरी तेलगू नाटकांना नभोनाट्यांनी संजीवनी दिली.

गेल्या महायुद्धात जपानने विशाखापट्टणम्‌वर बॉंबफेक केली, तिचे आंध्रच्या सांस्कृतिक जीवनावर दूरगामी परिणाम झाले. आंध्र विद्यापीठाचे स्थानांतर होऊन ते विशाखापट्टणम्‌हून अधिक सुरक्षित अशा गुंतूरला नेण्यात आले. आंध्र विद्यापीठाचे रजिस्ट्रार डॉ. के. बी. गोपालस्वामी यांनी तेलगू नाट्याला फार मोठे प्रोत्साहन दिले. त्यांनी विविध नाट्यस्पर्धा आयोजित केल्या. ते स्वतः नाटकांचे दिग्दर्शक असल्याने त्यांनी या क्षेत्रात अनेक नाटककार, कलाकार वगैरेंना उत्तेजन दिले. कर्ल वेंकटेशराव यांनी ग्रामीण नाटकांचा नवा प्रवाह सुरू केला. त्यांच्या चौदा निवडक एकांकिका 'कोनगुड्डा' या नावाने प्रसिद्ध झाल्या. या एकांकिकांत त्यांनी ग्रामीण जीवन आणि शेतकऱ्यांच्या समस्या यावर भर दिला आहे. कुटुंबराव यांनी दलित, पीडित अशा वर्गावर नाटके लिहिली. आता तेलगू रंगभूमी ही सर्व विषयांना स्पर्श करणारी आणि आधुधिक तंत्रांचा वापर करणारी प्रगतीशील अशी रंगभूमी आहे.

अलीकडच्या काळात आंध्रमधील एका नाटककार नटाने जागतिक विक्रम करून आपले नाव गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डस्‌मध्ये आणले आहे. त्यांचे नाव बब्बन खान. ते हैद्राबादमध्ये राहतात. माझ्या हैद्राबाद भेटीत मी त्यांना भेटण्याचा प्रयत्न केला, पण ते त्या वेळी आपले नाटक घेऊन परदेशात दौऱ्यावर गेले होते. मात्र काही दिवसांनी त्यांचे नाटक मुंबईला आले आणि माझ्या घराजवळ 'दीनानाथ नाट्य मंदिरा'त त्याचा प्रयोग झाला, तेव्हा मी बब्बन खान यांना भेटलो. ते म्हणाले, ''माझं 'आद्रक के पंजे' हे नाटक मी पंचवीस वर्षांपूर्वी लिहिले. त्या वेळी माझी आर्थिक परिस्थिती इतकी वाईट होती की घरात दिवे पेटवण्यासाठी तेल नसल्यामुळे आम्हाला सूर्यास्तापूर्वीच संध्याकाळचे जेवण उरकून घ्यावे लागे. माझ्या कुटुंबात खूपच मुले होती आणि उत्पन्नाचे साधन अगदीच नाममात्र होते. मी हे नाटक रात्री म्युनिसिपालिटीच्या दिव्याच्या उजेडात फूटपाथवर बसून लिहिले. १९६५ पासून आतापर्यंत या नाटकाचे जगभर ७,३०० प्रयोग झाले आहेत. या नाटकाला नेपथ्य नाही. ज्याला नाटकाची प्रॉपर्टी म्हणतात, त्याचे एकंदर किंमत फक्त पंचवीस रुपये आहे ! एक छत्री आणि मोकळा जेवणाचा डबा एवढीच ही प्रॉपर्टी आहे. एकाच व्यक्तीने केलेल्या नाटकाचे जगात जास्तीत जास्त प्रयोग म्हणून माझी व या नाटकाची आता गिनिज बुकमध्ये नोंद आहे.''

प्रतिकूल परिस्थितीने नाडलेला एक गृहस्थ आपल्या देणेकऱ्यांना चुकविण्यासाठी कोणत्या युक्त्या प्रयुक्त्या करतो त्याचे विनोदी दर्शन या नाटकात घडते. नायकाशिवाय त्याचा सासरा, पत्नी, देणेकरी आणि काही मुले यांच्या या नाटकात भूमिका आहेत.

चित्रपट हे तेलगूमधील अत्यंत प्रभावी माध्यम आहे. तामिळनाडूमध्ये एम. जी. रामचंद्रन हे चित्रपटाच्या माध्यमातूनच मुख्यमंत्री झाले, तसेच आंध्रमध्येही एन. टी. रामाराव हे पौराणिक चित्रपटांचे नायक म्हणून लोकप्रिय झाले आणि त्या लोकप्रियतेचा फायदा राजकारणासाठी घेऊन मुख्यमंत्री झाले. कमल हसन हे भारतात अत्यंत लोकप्रिय झालेले अभिनेतेही आंध्रचेच. 'राजपाटवई' हा त्यांचा पहिला तेलगू चित्रपट. त्यानंतर 'विक्रम', 'नयगान' असे अनेक चित्रपट त्यांनी तयार केले. 'एक दुजे के लिये' या हिंदी चित्रपटातील त्यांच्या नायकाच्या भूमिकेने त्यांना अखिल भारतीय स्तरावर नेले. 'इंद्रडु चंद्रडु' या तेलगू चित्रपटातील भूमिकेमुळे त्यांनी फिल्मफेअरचे सर्वश्रेष्ठ अभिनेत्याचे पारितोषिक

मिळविले. 'अपूर्व सहोदरर्गळू' या तेलगू चित्रपटाने त्यांना कीर्तीच्या शिखरावर नेले. त्याची हिंदी आवृत्ती 'अप्पू राजा' अनेक विक्रम मोडून लोकप्रियतेच्या लाटेवर विराजमान झाली.

नृत्याच्या क्षेत्रातही आंध्रचे वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. आंध्रमधील कुचिपुडी या गावावरून 'कुचिपुडी' हा नृत्याचा प्रकार रूढ झाला आहे. १४ व्या शतकापासून या गावाची नृत्याविषयी प्रसिद्धी आहे. प्राचीन काळी कुचिपुडी हे गाव कुशल नृत्याच्या वैशिष्ट्यामुळे कुशीलपुडी हे नाव रूढ झाले. भरतनाट्याप्रमाणेच कुचिपुडी हे नृत्यही देवदासींच्याकडून मंदिरात सादर केले जाई. सिद्धेंद्र योगी या संताने ब्राह्मण मुलांना स्त्रीवेष देऊन कुचिपुडी नृत्य त्यांच्याकडून करवून घेण्यास सुरुवात केली. कुचिपुडीप्रमाणेच आंध्रमध्ये केलिका, यक्षगान, कुरापंजी असे इतरही नृत्याचे प्रकार प्रचलित आहेत. लोकनृत्ये हा आंध्रमधील नृत्याचा महत्त्वाचा प्रकार आहे. त्यात दप्पु नृत्य, माधुरी नृत्य, बघ कम्मा, कुम्मी नृत्य, कोलहाटम, गदबानृत्य, पोरोजा, शिद्दी नृत्य इत्यादींचा समावेश आहे. विविध आदिवासी जमातीत ही नृत्ये प्रचलित आहेत.

आंध्रच्या तेलगू भाषेत दोन साहित्यिकांना आतापर्यंत ज्ञानपीठ पारितोषिक देण्यात आले आहे. दोन्ही साहित्यिक कवी आहेत. त्यांपैकी एकाचे नाव डॉ. विश्वनाथ सत्यनारायण आणि दुसऱ्याचे आहे डॉ. सी. नारायण रेड्डी. डॉ. विश्वनाथ सत्यनारायण यांना १९७१ साली ज्ञानपीठ पारितोषिक देण्यात आले. त्यांचा जन्म १८१५ साली आंध्रमधील नंदमूर या गावी झाला. त्यांनी कादंबरी, नाटक, काव्य, समीक्षा अशा विविध क्षेत्रात महत्त्वाचे योगदान केले आहे, पण त्यांना ज्ञानपीठ देण्यात आले ते 'श्रीरामायण कल्पवृक्षमु' या महाकाव्यासाठी.

शाळेत असतानाच विश्वनाथ सत्यनारायण हे वयाच्या बाराव्या वर्षापासून काव्य लिहू लागले. मच्छलीपट्टम् येथे त्यांचे शालेय शिक्षण झाले, पण म. गांधींच्या असहकाराच्या चळवळीत त्यांनी भाग घेतल्याने अनेकदा त्यांचे शिक्षण खंडित झाले. त्यांनी कारावासही अनेकदा भोगला. तरीही खंडित होत जाणारे शिक्षण सत्यनारायण यांनी पूर्ण केले. १९१९ मध्ये ते बी. ए. झाले व मच्छलीपट्टम् येथे तेलगूचे प्राध्यापक म्हणून ते काम करू लागले. गुंतूर येथे ख्रिश्चन कॉलेजमध्येही त्यांनी तेलगूचे प्राध्यापक म्हणून काम केले. दरम्यान त्यांचे काव्यलेखन चालूच होते. १९६२ साली त्यांच्या 'विश्वनाथ मध्यवकरुलु' या काव्यसंग्रहास साहित्य ॲकॅडमीचे पारितोषिक मिळाले. 'येयी पडगलु' ही त्यांची

कादंबरीही प्रसिद्ध झाली आणि तिला आंध्र विद्यापीठाने पारितोषिक तर दिलेच, पण सन्माननीय डॉक्टरेटही सत्यनारायण यांना दिली.

'श्रीरामायण कल्पवृक्षमु' हे डॉ. विश्वनाथ सत्यनारायण यांचे महाकाव्य आधारित नसून स्वतंत्र प्रतिभेची श्रेष्ठ कलाकृती आहे. वाल्मिकीच्या रामायणावर अनेक वर्षे संशोधन आणि चिंतन करून त्यांनी हे महाकाव्य लिहिले आहे. युद्धकांडातील दोन हजार पदे त्यांच्या स्वतंत्र प्रतिभेची साक्ष देतात. मूळ रामायणातील काही व्यक्ती आणि प्रसंग यांना त्यांनी वेगळी परिमाणे दिली आहेत. उदाहरणार्थ, कैकयीचे वेगळे व स्वतंत्र चित्र त्यांच्या महाकाव्यात दिसते. रामाचा द्वेष करून त्याला शिक्षा द्यावी आणि त्याच्याऐवजी आपल्या मुलाला अयोध्येच्या सिंहासनावर बसवावे अशी राक्षसी महत्त्वाकांक्षा बाळगणारी खलनायिका सत्यनारायण यांनी रंगविलेली नाही. उलट, त्यांनी रंगविलेली कैकयी रामाला परमेश्वराचा अवतार मानते. त्याने सुखलोलुप होऊन एखाद्या सामान्य राजाप्रमाणे राज्य करीत रहावे असे तिला वाटत नाही. रामाने खडतर जीवनाचा अनुभव घेऊन खलांना ताडन करावे हा तिचा रामाला वनात पाठविण्यामागचा हेतू होता असे सत्यनारायण यांनी दाखविले आहे. रामाने कठोर कर्तव्य करावे, संसारी जीवनात अडकून पडू नये या उद्देशानेच तिने त्याला वनवासात पाठविले असे या महाकाव्यात म्हटले आहे.

डॉ. विश्वनाथ सत्यनारायण यांना आंध्रविषयी सार्थ अभिमान आहे. 'आंध्रपौरुषम्' आणि 'आंध्रप्रशस्ती' या त्यांच्या काव्यातून तो उफाळून आला आहे. आंध्रमधील ऋतुचक्राची उत्तम वर्णने त्यांनी 'ऋतुसप्तरमु' या काव्यासंग्रहात केली आहेत. राधा व कृष्ण यांच्यावरील प्रेमकाव्ये हा प्राचीन काळापासून भारतीय कवींच्या काव्याचा विषय झाला आहे. डॉ. सत्यनारायण यांनीही 'शृंगारवीथी' या काव्यात या विषयाची हळुवार हाताळणी केली आहे. कविकुलगुरू कालिदास यांच्या 'मेघदूत' च्या धर्तीवर डॉ. सत्यनारायण यांनी 'शशिदूतम्' हे खंडकाव्य लिहिले आहे.

भारतीय संस्कृती आणि विचार यांना डॉ. सत्यनारायण हे शिरोधार्य मानतात. त्यामुळे अत्याधुनिक असे काही समीक्षक त्यांच्यावर 'सनातनी' असा शिक्का मारतात. पण डॉ. सत्यनारायण यांच्या मते भारतीय श्रेष्ठ परंपरेतील सांस्कृतिक मूल्ये ही कायमची असल्याने त्यांचा आदर करण्यात मागासलेपणा नाही. उलट, डॉ. राधाकृष्णन् यांच्यासारख्या आंतराष्ट्रीय कीर्तीच्या तत्त्वज्ञाने

भारतीय संस्कृतीची महत्ता साऱ्या जगाला पटवून दिली आहे. रामायणासारख्या प्राचीन ग्रंथावर महाकाव्य लिहिणाऱ्या डॉ. सत्यनारायण यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्यात भाग घेऊन आपली कर्तव्यपरायणता सिद्ध केली आहे.

तेलगू कहाणी समृद्ध करणाऱ्या साहित्यिकांत इल्लिंदल सरस्वती देवी यांचे महत्त्वाचे योगदान आहे. त्यांचा जन्म पश्चिम गोदावरी जिल्ह्यातील नरसापूर येथे १९१८ साली झाला. १९८३ साली त्यांना साहित्य ॲकॅडमीचा पुरस्कार मिळाला, तेव्हा त्यांच्याकडे आंध्रमधील आणि आंध्रबाहेरच्या रसिकांचे विशेष लक्ष वेधले. आपल्या कहाणीच्या माध्यमातून त्यांनी आंध्रमधील जनमानसाचे मनोहर दर्शन घडविले आहे. माणसामाणसांतील द्वेश, मत्सर, प्रेम, करुणा इत्यादी भावना त्यांनी सखोलतेने चित्रीत केल्या आहेत. कोणत्याही वादात त्या अडकून पडत नाहीत. ही कथा वास्तववादी आहे, ती कथा साम्यवादी आहे किंवा अमुक कथा निरीश्वरवादी आहे, असे त्यांच्या कथांचे वर्गीकरण करता येणार नाही. आपली कथा ही मूर्तिभंजक आहे किंवा मूर्तिपूजक आहे असा सरस्वती देवींचा दावा नाही. मूलभूत मानवी भावभावनांचा आविष्कार करणाऱ्या त्या कथा आहेत. 'स्वर्णकमलालु' या त्यांच्या संग्रहात त्यांच्या शंभर कथा ग्रंथित करण्यात आल्या आहेत. याच संग्रहाला साहित्य ॲकॅडमीचा पुरस्कार मिळाला आहे.

डॉ. दाशरथी हे आधुनिक तेलगू काव्यातील महत्त्वाचे वास्तववादी कवी आहेत. तेलगू कवितेला आकाश आणि तारे यांच्या जगातून वास्तव जगात आणण्याचे बरेचसे श्रेय डॉ. दाशरथी यांच्याकडे जाते. ज्ञानपीठ पारितोषिक विजेते प्रा. सी. नारायण रेड्डी हे आधुनिक तेलगू साहित्यातील एक श्रेष्ठ प्रतिभावंत कवी आहेत. हे नामवंत शिक्षणतज्ज्ञही आहेत आणि आंध्र प्रदेश खुल्या विद्यापीठाचे उपकुलगुरू आहेत. त्याशिवाय ते अव्वल दर्जाचे समीक्षक, निबंधकार आणि नाटककारही आहेत. उदात्त विचार आणि नादमाधुर्य ही त्यांच्या काव्याची वैशिष्ट्ये आहेत. त्यांनी तेलगू महाकाव्यात महत्त्वाची भर घातली असून ज्ञानपीठ पारितोषिकाचे संभाव्य विजेते म्हणून त्यांचा उल्लेख अनेकांनी निकाल जाहीर होण्यापूर्वीच केला. मी त्यांना त्यांच्या खुल्या विद्यापीठाच्या कचेरीत भेटलो. त्यांची कचेरी श्री. रामोजीराव यांच्या 'इनाडू' या दैनिकाच्या कचेतीसमोरच आहे. खुल्या विद्यापीठाविषयी बोलताना डॉ. रेड्डी म्हणाले, '' इंग्लंडमधील खुल्या विद्यापीठाच्या धर्तीवर या विद्यापीठाची उभारणी करण्यात आली आहे. आंध्रप्रदेश सरकार आणि युनिव्हर्सिटी ग्रँट्स कमिशन यांच्या

आर्थिक साहाय्यावर हे विद्यापीठ काम करते. एकंदर ४८ हजार विद्यार्थी विद्यापीठात शिक्षण घेत आहेत. एकवीस वर्षांवरील कोणालाही या विद्यापीठात प्रवेश घेता येतो. ज्यांना शिक्षण मध्येच सोडावे लागले, त्यांची परीक्षा घेऊन गुणवतत्तेनुसार त्यांना प्रवेश देण्यात येतो. विद्यापीठतर्फे बी. ए., बी. एस्सी. वगैरे पदव्या देण्यात येतात व इतर विद्यापीठांच्या बरोबरीनेच या पदव्यांनाही मान्यता आहे. आमच्या विद्यापीठाची हैद्राबादमध्ये १२ आणि आंध्रमध्ये इतरत्र ५७ केंद्रे आहेत. १९८२ साली राष्ट्रपती झैलसिंग यांच्या हस्ते खुल्या विद्यापीठाचे उद्घाटन झाले.

प्रा. सी. नारायण रेड्डी यांनी उसमानिया विद्यापीठातून एम्. ए. व पीएच्. डी. या पदव्या घेतल्या. 'ऋतु-चक्रम्' या त्यांच्या दीर्घ काव्याला आंध्र प्रदेश साहित्य ॲकॅडमीचे पारितोषिक मिळाले. १९७४ साली दिल्लीच्या साहित्य ॲकॅडमीने त्यांच्या 'मंतलु-मानकुदु' या काव्यसंग्रहास पारितोषिक दिले. 'रामप्पा' हे त्यांचे संगीत नाटक भारतातील चौदा भाषांतून नभोवाणीवरून प्रक्षेपित करण्यात आले. म. गांधींच्या वचनाचे त्यांनी 'गांधेयम्' या नावाने तेलगू भाषांतरही केले आहे. दीर्घकाव्य हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. 'नागार्जुनसागर', 'विश्वनाथ नायडू', 'कर्पूर वसंतरयलु', 'जाहिररत्नम्', 'ऋतुचक्रम्', 'भूमिका', 'विश्वंभरा' इत्यादी त्यांची दीर्घकाव्ये म्हणजे तेलगू भाषेचा अमोल ठेवा आहे. 'मध्यंतर गती मंदहासम्', 'मंतलु-मानदुदु', 'मृत्यूक मुंजी', 'रेक्कालु', 'तोजसु ना तापसु' आणि 'नडक नास थायी' या मुक्त छंदातील काव्यसंग्रहांनी श्री. रेड्डी यांनी तेलगू साहित्यावर मोठाच प्रकाश पाडला आहे. त्याशिवाय गेय कविता, संगीतिका, समीक्षा, निबंध, गझल, भाषांतरे या क्षेत्रातही त्यांनी महत्त्वाची भर घातली आहे.

हैद्राबाद शहरात जेवढी विद्यापीठ आहेत, तेवढी भारताच्या इतर कोणत्याही शहरात नसतील, उस्मानिया विद्यापीठ, आंध्र प्रदेश खुले विद्यापीठ, आंध्र प्रदेश तेलगू विद्यापीठ, जे. एन. टी. विद्यापीठ, आंध्र विद्यापीठ, श्री. कृष्णदेवराय विद्यापीठ, आंध्र प्रदेश कृषिविद्यापीठ व हैद्राबाद सेंट्रल विद्यापीठ अशी विद्यापीठे येथे आहेत. तेलगू विद्यापीठाशिवाय तेलगू ॲकॅडमी नावाची स्वतंत्र संस्थाही आहे.

"आपल्या युगातील सामाजिक व सांस्कृतिक अंतर्विरोध, आर्थिक व राजकीय कूटे, पीडित जनतेची पीडा, क्षोभ, आकांक्षा यांना अभिव्यक्त करणे हा

समकालीन तेलगू लेखकाचा धर्म असतो. त्यासाठी निर्मिती घडताना व घडविताना त्याला अनेक यातनांतून जाणे क्रमप्राप्त असते. आपल्या या कर्तव्याची परिपूर्ती करण्यासाठी समकालीन कवी आपल्या छंदोमयी व अक्षर वाणीने समाजाशी चैतन्यपूर्ण संवाद साधतो.

चेर बंड राजू यांनी गेल्या दोन दशकांत तेलगू साहित्यात वादळ निर्माण केले. ते स्वतःच एक लोकविलक्षण वादळ होते. त्यांचा जन्म १९४० चा. त्यांने 'आमचा गाव' या अर्थाच्या शीर्षकाची कादंबरी लिहिली.

१९४० साली जन्मलेले चेर बंड राजू हे तेलगुतील बंडखोर कवी होते. ज्वालामुखी, निविलेश्वर आणि भैरवण्णा हे आणखी काही विद्रोही कवी. त्यांच्या क्रांतिकारक कवितेतील काही शद्ब शिष्ट समाजाला धक्का देतात, पण त्यांना जो आशय व्यक्त करायचा आहे, तो गोडगोड, रेशमी, मुलायम शद्बांत व्यक्त करता येणारच नाही. त्यासाठी अग्निकुलांचेच शब्द हवेत.


हैद्राबादमध्ये तेलगू विद्यापीठ आहे. तेलगू भाषा व साहित्य यांच्या सर्वांगीण विकासाठी १९८६ साली या स्वतंत्र विद्यापीठाची स्थापना झाली. या विद्यापीठाचे उपकुलगुरू डॉ. दोनप्पा यांना मी भेटलो. ते म्हणाले, ''मराठी व तेलगू या भाषांचे जिव्हाळ्याचे संबंध आहेत. ओनामा, अडकित्ता असे अनेक तेकगू शद्ब मराठीत आत्मसात केले आहेत. तेलगू भाषकांची संख्या सुमारे सहा कोटी आहे. त्यांपैकी पाच कोटी आंध्रमध्ये व एक कोटी लोक आंध्रबाहेर आहेत.

❑

REFBK-0028374

REFBK-0028374

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
प्रवेश ७९२
क्र. २८३७४
...शाखा (...)



कृष्णा गोदावरीचा
तेलगु देशम
**आंध्रप्रदेश**